# अध्याय अठरावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमोप्रकाशका । सद्विद्याविधिविवेका । कर्मधर्मप्रतिपाळका । जगन्नायका गुरुवर्या ॥ १ ॥ वर्णाश्रमादि मर्यादा । त्याचा सेतू तूं गोविंदा । तूं कारण वेदानुवादा । विवादसंवादा तूं मूळ ॥ २ ॥ तूं शुद्धशब्दसृष्टीचा अर्कू । तूं वेदगुह्यप्रकाशकू । तूंचि एकला अनेकू । व्याप्य व्यापकू तूंचि तूं ॥ ३ ॥ तूंचि तूं विधिविधान । तूं बोलका तूं मौन । एका आणि जनार्दन । दोनीं संपूर्ण तूं गुरुराया ॥ ४ ॥ यालागीं श्रीभागवता । तूंचि अर्थ तूं कविता । तूंचि अर्थावबोधकता । हेंहि बोलविता तूंचि आम्हां ॥ ५ ॥ जैशीं आपुलींचि उत्तरें । पडसादें होती प्रत्युत्तरें । तेवीं माझेनि मुखांतरें । तूंचि कवित्वद्वारें बोलका ॥ ६ ॥ बोलका श्रीभागवतीं । श्रीकृष्ण कृपामूर्ती । तेणें वर्णाश्रमउत्पत्ती । यथा-स्थिती सांगीतली ॥ ७ ॥ सप्तदशाध्यायीं श्रीकृष्णें सुगम । सांगीतले ब्रह्मचर्यधर्म । गृहस्थाचे स्वधर्मकर्म । नित्यनेम निरूपिले ॥ ८ ॥ आतां अष्टादशाध्यायीं जाण । वानप्रस्थाश्रमलक्षण । संन्यासधर्माचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ९ ॥

श्री० भ०–वनं विविक्षुः पुत्रेषु भार्यां न्यस्य सहैव वा । वन एव वसेच्छान्तस्तृतीयं भागमायुषः ॥ १ ॥

---

हे अखिल कर्मांचा प्रकाश करणाऱ्या, सद्विद्येच्या विधीच्या विवेका, कर्म-धर्मांचें पालन करणाऱ्या जगन्नायका, गुरुवर्या ! तुला नमस्कार असो. १ हे गोविंदा ! वर्णाश्रमादि धर्मांची जी मर्यादा त्याचा आधार तूंच आहेस. वेदानुवादाचें तूंच कारण आहेस, वितंडवाद व ज्ञानसुखदायकसंवाद यांचें मूळ तूं आहेस. २ तूं शुद्धशब्द-सृष्टीचा सूर्य आहेस. तूं वेदाचें गुह्यरहस्य प्रकाशित करणारा आहेस. तूंच एक असून अनेक आहेस. व्याप्य व व्यापक तूंच आहेस. ३ विधि व विधान तूंच आहेस. बोलका व मौन दोन्ही तूंच आहेस. हे गुरुराया ! एकनाथ आणि जनार्दन हे दोघेहि पूर्णपणें तूंच आहेस. यास्तव श्रीभागवतांतील कविता व अर्थ हीं दोन्हीं तूंच आहेस. त्यांतील अर्थज्ञान तूंच आहेस. ४ आणि माझ्याकडून तें बोलविणाराहि तूंच आहेस. ५ आपण उच्चारलेल्या शब्दांचा जसा प्रतिध्वनि उठतो, त्याप्रमाणें माझ्या तोंडून तूंच कवित्वाच्या द्वारानें हें बोलत आहेस. ६ श्रीभागवतांतील वक्ता जो परम कृपाळु श्रीकृष्ण त्यानें वर्णाश्रमाची उत्पत्ति यथाविधि सांगितली. ७ सतराव्या अध्यायांत श्रीकृष्णानें ब्रह्मचर्यधर्म, गृहस्थाचें स्वधर्मकर्म व नित्य नेम यांचें सोप्या रीतीनें निरूपण केलें. ८ आतां अठराव्या अध्यायांत वानप्रस्थाश्रमाचें लक्षण व संन्यासधर्माचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ९.

[ अठराव्या अध्यायांत वानप्रस्थ व यति यांचे धर्म आणि अधिकारभेदानें धर्मभेदहि सांगितले आहेत. ]

—आतां क्रमप्राप्त वानप्रस्थाचे धर्म सांगतात—

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान् म्हणाले, वनं विविक्षुः–वनांत जाण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें, पुत्रेषु भार्यां न्यस्य सह एव वा–पुत्रांच्या ठिकाणीं भार्येचा न्यास करून म्ह० पुत्रांपाशींच रहाण्याची तिची इच्छा असल्यास तिला त्यांच्या स्वाधीन करून, किंवा तिची वनांत येण्याची इच्छा असल्यास तिला बरोबर घेऊन, आयुषः तृतीयं भागं शान्तः वने एव वसेत्–आयुष्याच्या तिसऱ्या भागांत म्हणजे पन्नास ते पंचाहत्तर वर्षेंपर्यंत शांतचित्तानें वनांतच वास करावा. [ त्यानंतर ज्याचीं इंद्रियें अतिशय शिथिल झालीं आहेत अशा यानें थोडीशी विरक्ति असली तरी संन्यास करावा. त्याला संन्यासाचाच अधिकार आहे, असा याचा भावार्थ. ] १.

आतां अनुक्रमें निरूपण । वानप्रस्थाचें आलें जाण । त्यासी वनास निघावया कारण । आयुष्यलक्षण विभाग ॥ १० ॥ शतायुःपुरुषमर्यादा श्रुती । त्याच्या तृतीयभागाची स्थिती । सासष्टी क्रमिल्या अंतीं । वनाप्रती निघावें ॥ ११ ॥ निघावया वनाप्रती । भार्या देऊनि पुत्राचे हातीं । आपण निघावें शीघ्रगती । वानप्रस्थीं वनवासा ॥ १२ ॥ भार्या साध्वी पतिव्रता सती । ईश्वरस्वरूप मानी पती । भ्रतार निघतां वानप्रस्थीं । जे पुत्राप्रती राहेना ॥ १३ ॥ सांडितां भ्रतारसेवेसी । कल्पांत हों पाहे जिसी । जे भ्रतारचरणांची दासी । ते सवें वनासी आणावी ॥ १४ ॥ जो पुरुष स्त्रीसमवेत । वनीं झाला वानप्रस्थ । तेणें स्त्रीकामासी अलिप्त । व्हावें दृढव्रत ते आश्रमीं ॥ १५ ॥ जो वानप्रस्थ वनवासी । तेणें दृढ धरावी शांति मानसीं । नातळावें कामक्रोधांसी । हेंही व्रत त्यासी आवश्यक ॥ १६ ॥

कन्दमूलफलैर्वन्यैर्मेध्यैर्वृत्तिं प्रकल्पयेत् । वसीत वल्कलं वासस्तृणपर्णाजिनानि च ॥ २ ॥

वनींचीं कंदमूलफळें । जीं निपजलीं ऋतुकाळें । तींही अतिपवित्रें निर्मळें । आहार तेणें मेळें करावा ॥ १७ ॥ वनवासीं वस्त्रें जाण । वल्कलें व्याघ्रमृगाजिन । अथवा नेसावीं केवळ तृण । कां पर्णाभरण वृक्षांचें ॥ १८ ॥ वानप्रस्थीं नेमग्रहण । ऐक त्याचेंही लक्षण । त्या नेमाचें निरूपण । स्वयें नारायण सांगत ॥ १९ ॥

केशरोमनखश्मश्रुमलानि बिभृयाद्दतः । न धावेदप्सु मज्जेत त्रिकालं स्थण्डिलेशयः ॥ ३ ॥

केश म्हणिजे मस्तकींचे । श्मश्रु बोलिजे मुखींचे । रोम ते कक्षोपस्थींचे । छेदन यांचें न करावें ॥ २० ॥ मस्तकीं न करावें वपन । न करावें श्मश्रुकर्म जाण । न करावें लोमनखच्छेदन । दंतधावन न करावें

---

आतां क्रमानेंच प्राप्त झालेल्या वानप्रस्थाच्या लक्षणाचें निरूपण करितों. त्याच्या वनवासाचा काळ त्याच्या आयुष्यावर विभागिलेला आहे. १० पुरुषाच्या आयुष्याची मर्यादा श्रुतीनें शंभर वर्षें सांगितली आहे. तिचा तिसरा हिस्सा म्हणजे वयाला सरासरी सासष्ट वर्षें पूर्ण झालीं कीं, वनांत जाण्यास निघावें. ११ भार्येला पुत्राच्या स्वाधीन करून आपण वानप्रस्थाश्रमासाठीं सत्वर वनांत जाण्यास निघावें. १२ पण साध्वी पतिव्रता स्त्री पतीला ईश्वरस्वरूप मानिते. ती पति वनांत जाण्यास निघाला असतां पुत्राजवळ रहात नाहीं. १३ पतिसेवा अंतरली म्हणजे तिला कल्पांत ओढवल्याचें दुःख होतें. ती पतिचरणांची केवळ दासीच असते. अशा तिला आपल्याबरोबर वनांत न्यावें. १४ जो पुरुष स्त्रीसह वनांत जाऊन वानप्रस्थ होतो, त्यानें स्त्रीसंगापासून दूर रहावें. आश्रमाचें दृढव्रत धरावें. १५ जो वनांत राहून वानप्रस्थ होतो, त्यानें मनांत दृढ शांति ठेवावी. काम-क्रोधाला कधीं स्पर्शहि करूं नये. हेंहि व्रत त्यानें आवश्य पाळलें पाहिजे. १६.

**वन्यैः मेध्यैः कन्दमूलफलैः**—वनांतील पवित्र कन्दमुलफलांवर, **वृत्तिं प्रकल्पयेत्**—निर्वाह करावा. **वल्कलं वासः वसीत**—वल्कल हें वस्त्र नेसावें. **तृणपर्णाजिनानि च**—गवत, पानें व हरिण, व्याघ्र इत्यादिकांचें चर्म यांचा शय्या, आसन व आच्छादन यांकडे उपयोग करावा. २.

त्या वानप्रस्थानें निरनिराळ्या ऋतूंमध्यें होणारीं वनांतील अति पवित्र, निर्मळ कंदमुळें व फळें जमा करून त्यांचा आहार करावा. १७ वल्कलें, वाघाचें किंवा हरिणाचें कातडें किंवा केवळ तागाचीं वस्त्रें किंवा झाडाचीं पानें हींच वनवासांतील नेसण्याचीं वस्त्रें होत. १८ वानप्रस्थाश्रमांत जे नेम पाळावे लागतात त्या नेमांचेंहि लक्षण ऐक, असें म्हणून स्वतः श्रीकृष्ण त्यांचें निरूपण करीत आहे. १९.

**केश-रोम-नख-श्मश्रुमलानि बिभृयात्**—केंस, रोम, नखें व श्मश्रु हे मल धारण करावेत. ( ते काढूं नयेत. ) **दंतः न धावेत्**—दातांना दंतमंजनादिकांनीं घासूं नये. **अप्सु त्रिकालं मज्जेत्**—पाण्यामध्यें त्रिकाल मुसलाप्रमाणें स्नान करावें. **स्थण्डिले शयः**—भूमीवर शयन करावें. ३.

मस्तकावर वाढणारे केंस, मुखावरील श्मश्रु, खांकेंतील वगैरे इतर भागावर वाढणारे रोम अशीं त्यांस नांवें आहेत. शरीराच्या कोणत्याहि भागावरील केंस कापूं नयेत. २० मस्तकाचें वपन व मुखाची श्मश्रु करूं नये.

**॥ २१ ॥ स्नान मुसलवत् केवळ । आवश्य करावें त्रिकाळ । प्राक्षाळावे ना शरीरमळ । व्रत प्रबळ वनस्था ॥ २२ ॥ केवळ भूमीवरी शयन । सदासर्वदा करावें जाण । तळीं घालावें ना तृण । मग वस्त्रास्तरण तें कैंचें ॥ २३ ॥ यापरी वानप्रस्थें जाण । दृढ धरूनि व्रतधारण । करावें तपाचरण । तें तपलक्षण अवधारीं ॥ २४ ॥**

ग्रीष्मे तप्येत पञ्चाग्नीन् वर्षास्वासारषाड्जले । आकण्ठमग्नः शिशिर एवंवृत्तस्तपश्चरेत् ॥ ४ ॥

**उष्णकाळीं पंचाग्नी । अग्निकुंडें चहूं कोणी । पांचवा रवि माध्याह्नीं । ऐसा पंचाग्नी साधावा ॥ २५ ॥ माळा करोनि उच्च प्रदेशीं । घन वर्षतां धारावर्तेसीं । तेथ व्हावें आकाशवासी । वर्षाकाळीं ऐसी तपप्राप्ती ॥ २६ ॥ आलिया हेमंतऋतूसी । आखंठमग्न जळवासी । जळवास करावा अहर्निशीं । हे वानप्रस्थाशी तपक्रिया ॥ २७ ॥ हे तपक्रिया प्रतिवरुषीं । विहित वानप्रस्थासी । वयसापरत्वें भक्षणासी । हृषीकेशी सांगत ॥ २८ ॥**

अग्निपक्कं समश्नीयात्कालपक्वमथापि वा । उलूखलाश्मकुट्टो वा दन्तोलूखल एव वा ॥ ५ ॥

**अग्नीस्तव पाका आलीं । कां काळें जीं परिपक्व झालीं । तीं तापसालागीं भलीं । आहारीं विहिलीं उदरार्थ ॥ २९ ॥ दांत असलिया बळी । फळें खावीं तेणें सगळीं । कां गेलिया दांत समूळीं । कांडूनि उखळीं सुखें खावीं ॥ ३० ॥ जरी उखळ न मिळे वनीं । तरी खावीं दगडें ठेंचुनी । नाहीं चाड गोडपणीं । क्षुधानिवारणीं आहारार्थ ॥ ३१ ॥**

---

नखें काढूं नयेत, दांत घांसूं नयेत. २१ अंग चोळून स्नान करूं नये. नुसती बुडी मारून मुसळासारखें पाण्यांतून बाहेर यावें. असें स्नान दिवसांतून तीन वेळां करावें. वानप्रस्थाचें व्रत मोठें कठिण आहे. २२ नेहमीं नुसत्या भूमीवर निजावें. खालीं गवतहि आंथरूं नये. मग वर वस्त्र कोठचें ! २३ याप्रमाणें वानप्रस्थानें दृढ व्रत धारण धरून तपाचरण करावें. त्या तपाचें लक्षण ऐक. २४.

**ग्रीष्मे पञ्चाग्नीन् तप्येत**—ग्रीष्म ऋतूंत पंचाग्नीनें आपल्याला तापवावें. ( मस्तकावर सूर्य व चार दिशांत चार अग्नि ठेवून आपल्याला तापवावें असा याचा भावार्थ ) **वर्षासु आसारषाड्**—वर्षा ऋतूंत उघड्या जागेंत उभें राहून वृष्टीचा धारासंपात सहन करावा. ( याप्रमाणें अभ्रावकाश या नांवाचें व्रत आचरावें. ) **शिशिरे जले आकण्ठमग्नः**—शिशिर ऋतूमध्यें जलांत कंठापर्यंत बुडून उदकवास नांवाचें व्रत करावें. **एवंवृत्तः तपः चरेत्**—अशा प्रकारच्या वृत्तीनें तप करावें. ४

उन्हाळ्यांत पंचाग्नि साधन करावें. व्रतस्थानें बसून आपल्या सभोंवार चार बाजूला चार अग्निकुंडें पेटवावीं व डोकीवर माध्यान्हीचा सूर्य तळपत असावा, असें पंचाग्निसाधन करावें. २५ पावसाळ्यांत मुसळधार पाऊस पडत असतां उंच जागीं माळा बांधून त्यावर त्या वृष्टींत बसावें. हें पावसाळ्यांतील अभ्रावकाश तप झालें. २६ हिवाळ्यांत गळ्यापर्यंत पाण्यांत बुडून रहावें. याला उदकवास म्हणतात. अशी वानप्रस्थाची तपश्चर्या आहे. २७ वानप्रस्थाला पंचाग्निसाधन, अभ्रावकाश व उदकवासहि त्रिविध तपश्चर्या दरवर्षी विहित आहे. आतां वयपरत्वें आहार कसा असावा, हें श्रीकृष्ण सांगत आहे. २८.

**अग्निपक्कं अथापि वा कालपक्वं समश्नीयात्**—अग्नीनें शिजविलेलें किंवा कालानें पिकविलेलें कंद-मूल-फलादि भक्षण करावें. **उलूखलाश्मकुट्टो वा दन्तोलूखलः एव वा**—भक्ष्य पदार्थ उखळांत कुटून किंवा दगडावर ठेंचून खावे किंवा दातांनीं चावून खावे. [ म्हणजे मुखालाच उखळ कल्पून दातांनीं चांवावे. ] ५.

विस्तवांत भाजलेलीं कंदमुळें व झाडावरच पिकलेलीं वनांतील फळें तापसाच्या उदरनिर्वाहाला योग्य होत. २९ त्याचे दांत जर बळकट असतील तर त्यानें तीं फळें दातांनीं चावून खावीं. पण दांत जर कां पडले असले तर उखळांत कुटून खावीं. ३० वनामध्यें उखळ मिळालें नाहीं तर तीं दगडानें ठेंचून खावीं. त्याच्या चवीकडे लक्ष ठेवूं नये. केवळ भुकेचें निवारण होण्यासाठीं आहार करावा. ३१.

स्वयं संचिनुयात्सर्वमात्मनो वृत्तिकारणम् । देशकालबलाभिज्ञो नाददीतान्यदाहृतम् ॥ ६ ॥

**ऋतुकाळीं फळें संपूर्णें । तीं कालांतराकारणें । संग्रहो सर्वथा न करणें । व्रता धारणें वनस्था ॥ ३२ ॥ पूर्व दिवसीं फळें आणिलीं । अपरदिवसीं जरी उरलीं । तीं अवश्य पाहिजे त्यागिलीं । नाहीं बोलिलीं आहारार्थ ॥ ३३ ॥ प्रत्यहीं आहारार्थ जाण । फळें आणावीं नूतन । जीर्ण फळांचें भक्षण । निषिद्ध जाण वानप्रस्था ॥ ३४ ॥ आणिकें फळें जीं आणिलीं । तीं अंगीकारा निषिद्ध झालीं । जीं स्वकष्टें अर्जिलीं । तीं वहिलीं आहारार्थ ॥ ३५ ॥ देश काळ वर्तमान । इत्थंभूत कळलें ज्ञान । तरी संग्रह न करावा जाण । अदृष्टधारण निर्धारें ॥ ३६ ॥ पराचा प्रतिग्रहो पूर्ण । सर्वथा न करावा आपण । प्रतिग्रह घेतां जाण । व्रतखंडन वानप्रस्था ॥ ३७ ॥**

वन्यैश्चरुपुरोडाशैर्निर्वपेत्कालनोदितान् । न तु श्रौतेन पशुना मां यजेत वनाश्रमी ॥ ७ ॥

**जो वानप्रस्थ स्त्रीसमवेत । त्यासी अग्निहोत्र झालें प्राप्त । तेव्हां कर्म जें वेदोक्त । तें करावें समस्त वनवासीं ॥ ३८ ॥ वनीं जीं फळें ज्या ऋतूंस । तोचि कल्पावा चरुपुरोडाश । तेणें यजावा मी यज्ञपुरुष । सावकाश मंत्रोक्त ॥ ३९ ॥ परी श्रौतकर्मविधान । यागार्थ पशुहनन । तें वानप्रस्थासी नाहीं जाण । वनफळीं यजन यागाचें ॥ ४० ॥**

अग्निहोत्रं च दर्शश्च पूर्णमासश्च पूर्ववत् । चातुर्मास्यानि च मुनेराम्नातानि च नैगमैः ॥ ८ ॥

---

**आत्मनः वृत्तिकारणं सर्वं स्वयं संचिनुयात्**—आपल्या उपजीविकेचें साधन असें कंदमूलादि सर्व स्वतःच आणावें. **देशकालबलाभिज्ञः अन्यदा आहृतं न आददीत**—देश, काल व बल यांस जाणणाऱ्या वानप्रस्थानें कालांतरीं आणलेल्या भक्ष्याचा कालांतरीं उपयोग करूं नये. [ नवें अन्न मिळालें असतां जुनें अन्न टाकून द्यावें, असें नारदानें सांगितलें आहे. ] ६.

फळा-मुळांच्या हंगामांत, त्यांचा त्यांचा मोसम आला असतां फळें मुळें अतिशय पिकतात. पण व्रतधारण केलेल्या वानप्रस्थानें दुसऱ्या काळासाठीं त्यांचा संग्रह करून ठेवूं नये. ३२ आज आणलेलीं फळें जरी उरलीं असलीं, तरी तीं दुसऱ्या दिवसासाठीं ठेवूं नयेत. आहार करून अधिक राहिलेलीं फळें टाकून द्यावीं. ३३ रोज आहारासाठीं ताजीं फळें तोडून आणावीं. वानप्रस्थाला शिळ्या फळांचा आहार निषिद्ध आहे. ३४ किंवा दुसऱ्यानें आणून दिलेल्या फळांचा स्वीकार करणेंहि वानप्रस्थाला निषिद्ध आहे. त्यानें स्वतःच्या मेहनतीनें मिळवून आणलेलींच फळें त्याच्या आहाराला विहित आहेत. ३५ देश, काल व वर्तमान यांचें यथार्थ ज्ञान जरी झालें तरी कोणत्याहि प्रकारचा संग्रह करूं नये. प्रारब्धावरच निश्चित विश्वास ठेवावा. ३६ कोणीं कसलेंहि दान दिलें तरी त्याचा स्वीकार करूं नये. दानाचा स्वीकार करितांच वानप्रस्थाचा व्रतभंग होतो. ३७.

**कालनोदितान् वन्यैः चरुपुरोडाशैः निर्वपेत्**-त्या त्या काळीं विहित असलेल्या आग्रयणादिकांचा वनांतील चरुपुरोडाशांनीं निर्वाह करावा. **वनाश्रमी तु श्रौतेन पशुना मां यजेत**-पण वानप्रस्थानें श्रुत्युक्त पशूनें माझा याग करूं नये. ७.

जो वानप्रस्थ स्त्रीसह वनांत जातो त्याला अग्निहोत्र ठेवणें प्राप्त आहे. तेव्हां त्यानें वनवासांत सर्व वेदोक्त कर्म करावें. ३८ ज्या ऋतूंत वनामध्यें जीं फळें मिळतील, त्यांचा चरु, पुरोडाश कल्पून त्यानें यथाशास्त्र यज्ञपुरुषाची मंत्रोक्त पूजा करावी. ३९ परंतु वेदानें सांगितलेली यज्ञांतील पशुहिंसा वानप्रस्थानें करूं नये. त्यानें वनांतील फळांनींच यज्ञांतील बलि द्यावा. ४०.

**अग्निहोत्रं च दर्शः च पूर्णमासः च नैगमैः मुनेः आम्नातानि चातुर्मास्यानि च पूर्ववत्**—अग्निहोत्र, दर्श, पूर्णमास व वेदवेत्त्यांनीं अशा वानप्रस्थ मुनीसाठीं सांगितलेले चातुर्मास्य याग वर सांगितल्याप्रमाणें वन्य पदार्थांनींच संपादन करावें. ८.

**पूर्वीं अग्निहोत्रकर्में जैशीं । गृहीं होतीं गृहस्थासी । तींचि चालवावीं वनवासीं । वेदाज्ञेसीं वनस्थें ॥ ४१ ॥ आम्नायें आगमनिगमांसी । जाणोनि करावें यागासी । दर्शपौर्णमासचातुर्मास्यासी । निष्कामतेसी वेदाज्ञा ॥ ४२ ॥ ऐसा मुनीश्वर वनवासी । तपस्वी तेजोराशी । त्याचिये फळप्राप्तीसी । स्वयें हृषीकेशी सांगत ॥ ४३ ॥**

एवं चीर्णेन तपसा मुनिर्धमनिसन्ततः । मां तपोमयमाराध्य ऋषिलोकादुपैति माम् ॥ ९ ॥

**ऐसें वेदोक्त तप साचार । आस्तिक्यभावें अत्यादर । साक्षेपें करितां निरंतर । अस्थिमात्र देह उरे ॥ ४४ ॥ शुष्कशरीरपंजरा । त्वचेनें झांकिलिया शिरा । परी सामर्थ्यें अति खरा । न सरे माघारा तपोनिष्ठे ॥ ४५ ॥ ऐसें यावज्जन्म करितां तप । तो सबाह्य झाला निष्पाप । लाहोनि ज्ञान सद्रूप । माझें निजस्वरूप तो पावे ॥ ४६ ॥ अवशेष वासना असतां । सूक्ष्मरूपें प्रतिबंधकता । तपाभिमानें तत्त्वतां । देहअहंता अनुमात्र ॥ ४७ ॥ परी फळाशा पोटीं नाहीं । ऐसेनि निमाला जो देही । तो पावोनि ऋषिलोकाच्या ठायीं । तेथोनि पाहीं मज पावे ॥ ४८ ॥ जोऋषिलोकातें पावला । तो क्रमे मुक्तीच्या मार्गा आला । तेथूनि क्रमेंचि मज पावला । यापरी उद्धरला वनस्थ ॥ ४९ ॥**

यस्त्वेतत् कृच्छ्रतश्चीर्णं तपो निःश्रेयसं महत् । कामायाल्पीयसे युञ्ज्याद्बालिशः कोऽपरस्ततः ॥ १० ॥

---

पूर्वाश्रमांत गृहस्थाला जीं अग्निहोत्रादि कर्में होतीं, तींच वानप्रस्थानें वेदाज्ञेप्रमाणें चालवावीं. वेदाच्या आधारानें शास्त्रविधि जाणून यज्ञ करावा. ४१ दर्श, पूर्णमास व चातुर्मास्यें हीं कर्में निष्कामतेनें करावीं, अशी वेदाची आज्ञा आहे. ४१ असा जो वनांत राहणारा तेजस्वी, श्रेष्ठ, मुनीश्वर, तपस्वी असतो त्याला कसली फलप्राप्ति होते, तेंच श्रीकृष्ण सांगत आहे. ४३.

—अशी निष्काम तपश्चर्या करणाराला मिळणारें फल सांगतात—

**एवं चीर्णेन तपसा धमनिसन्ततः मुनिः**—याप्रमाणें आचरिलेल्या तपानें शिरांनीं व्यापिलेला म्ह० यावज्जीव केलेल्या तपानें ज्याच्या शरीरांतील सर्व मांस शुष्क होऊन केवळ शिरा अवशिष्ट राहिल्या आहेत असा मुनि, **तपोमयं मां आराध्य**—तपोमय अशा माझी आराधना करून, **ऋषिलोकात् मां उपैति**—ऋषिलोकांतून महर्लोकादि क्रमानें मला प्राप्त होतो. [ अंतःकरणशुद्धि व भक्ति यांच्या द्वारां तो येथेंच मुक्त होतो, पण मुक्तीला कांहीं प्रतिबंध असल्यास पूर्वोक्त क्रमानें मुक्त होतो, असा याचा भावार्थ. ] ९.

याप्रमाणें वेदोक्त तप श्रद्धापूर्वक अति आदरानें सतत आचरीत असतां त्याच्या देहाचा निव्वळ अस्थिपंजर तेवढा उरतो. ४४ शरीर सुकून अंगावर त्वचेनें झांकलेलें नुसत्या शिरांचें जाळें जरी असलें तरी त्याचें सामर्थ्य फार मोठें असतें. तो तपोनिष्ठेंत कधींहि माघार घेत नाहीं. ४५ आयुष्य संपेपर्यंत ( असें ) तप केलें असतां तो अंतर्बाह्य निष्पाप होतो. त्याला आत्मस्वरूपाचें ज्ञान होऊन तो माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. ४६ त्याची यत्किंचित् जरी वासना शिल्लक राहिली व तपाच्या अभिमानानें अणुमात्र जरी देहावरील अहंता असली तरी ती सूक्ष्मरूपानें प्रतिबंधक होते. ४७ परंतु मनांत फलाची आशा न ठेवितां जो मरण पावतो, तो ऋषींच्या लोकाला प्राप्त होऊन, तेथून मग मद्रूप होतो. ४८ जो ऋषींच्या लोकीं जातो तो क्रमानें मुक्तीच्या मार्गाला लागतो व येथून क्रमानें तो माझ्या स्वरूपाला येऊन मिळतो. हे उद्धवा ! अशाप्रकारें वानप्रस्थाचा उद्धार होतो. ४९.

—आतां सकाम वानप्रस्थाची निंदा करितात—

**यः तु एतत् कृच्छ्रतश्चीर्णं महत् निःश्रेयसं तपः अल्पीयसे कामाय युञ्ज्यात्**—पण जो हें मोठ्या कष्टानें व फार मोठें मोक्षफल देणारें तप अत्यंत क्षुद्र कामाकडे योजितो, ( त्याचा क्षुद्र विषयभोगाकडे विनियोग करितो ) **ततः अपरः कः बालिशः**—त्याहून दुसरा अधिक मूर्ख कोण आहे ! [ ब्रह्मलोकापर्यंतचे सर्वहि भोग मोक्षाच्या अपेक्षेनें क्षुद्रच आहेत, असा याचा भावार्थ. ] १०.

**एवं वानप्रस्थ अतिकष्टीं । तपादिसाधनसंकटीं । भोगफळाशेच्या तुटीं । मोक्षपरिपाटी पावेल ॥ ५० ॥ जें हाता आलें मोक्षफळ । आविरिंच्यादि मंगळ । तें तपादिसाधन निर्मळ । कामार्थ केवळ कल्पिती ॥ ५१ ॥ जेवीं कां चिंतामणीचियेसाठीं । मागे चातीलागीं खापरखुंटी । कां परीस देवोनि पालटी । काळी गोमटी वीट मागे ॥ ५२ ॥ तेवीं मनुष्यपणाचियें स्थितीं । उत्तम जन्में तपःप्राप्ती । ते तपःक्रिया व्यर्थ करिती । काम वांछिती ते मूर्ख ॥ ५३ ॥ त्या मूर्खांचें मूर्खपण । किती सांगावें गा गहन । मोक्षप्राप्तीचें साधन । कामलिप्सा जाण नाशिलें ॥ ५४ ॥ असो हें मूर्खांचें कथन । वानप्रस्थाचेंचि लक्षण । पुढील सांगेन संपूर्ण । शास्त्रार्थ जाण सुनिश्चित ॥ ५५ ॥ जो वानप्रस्थ आपण । तपादि साधनीं अतिक्षीण । झाला तरी वैराग्यज्ञान । ज्यासी जाण नुपजेचि ॥ ५६ ॥ पन्नास वर्षें गार्हस्थ्य । दोनी द्वादशें वानप्रस्थ । झाला तरी जो अप्राप्त । वैराग्ययुक्त निजज्ञान ॥ ५७ ॥ आयुष्याचे तीन भागवरी । वेंचले गा ऐशापरी । आतां चतुर्थ भाग उरल्यावरी । क्षीण शरीरीं जर्जर ॥ ५८ ॥ ऐसें शरीर झालिया क्षीण । अल्पही वैराग्य जाल्या जाण । करावें संन्यासग्रहण । कर्मचरण यथाशक्ती ॥ ५९ ॥ वानप्रस्थाश्रमीं झाल्याही । निःशेष वैराग्य अल्पही । सर्वथा नुपजे ज्याच्या ठायीं । त्याचा अधिकार पाहीं हरि बोले ॥ ६० ॥**

यदाऽसौ नियमेऽकल्पो जरया जातवेपथुः ।आत्मन्यग्नीन् समारोप्य न मच्चित्तोऽग्निं समाविशेत् ॥ ११ ।

---

याप्रमाणें वानप्रस्थ अतिशय कष्टकर तपादिसाधनांतील संकटें सोसून, योगफलाची आशा सोडून, निष्काम झाला असतां तो मोक्षमार्गाला प्राप्त होतो. ५० परंतु ज्या तपश्चर्येनें सत्यलोकप्राप्तीपर्यंत मोक्षफल हातीं येतें, त्या निर्मल तपादि साधनांचा उपयोग केवळ कामनापूर्तीसाठीं जे करितात, ५१ ते आपल्या हातचा चिंतामणी देऊन चातीसाठीं खापरखुंटी घेणाऱ्या किंवा परीस देऊन काळी कुळकुळीत वीट मागणाऱ्या मूर्खांसारखेच होत. ५२ त्याचप्रमाणें श्रेष्ठ मनुष्यजन्म लाभला असतां, उत्तम तपश्चर्येनें प्राप्त झालेलें मोक्षप्राप्तीचें फल व्यर्थ घालवून केवल विषयांची इच्छा करणारे खरोखरच मूर्ख होत. ५३ त्या मूर्खांचा मूर्खपणा काय सांगावा ! ते वासनेच्या लोभानें मोक्षप्राप्तीचें साधन नाहींसें करितात. ५४ ही मूर्खांची कथा आतां राहूं दे. मी तुला वानप्रस्थाचेंच पुढील शास्त्रोक्त व निश्चित लक्षण सविस्तर सांगतों, तें ऐक. ५५ तो वानप्रस्थ तपादिसाधनांनीं अति क्षीण झाला तरी त्याच्या मनांत वैराग्ययुक्त ज्ञान उत्पन्न होत नाहीं. ५६ पन्नास वर्षेंपर्यंत गृहस्थाश्रम व चोवीस वर्षें वानप्रस्थाश्रम करूनहि ज्याला वैराग्यपूर्ण आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं, ५७ त्यानें अशाप्रकारें तीन चतुर्थांश आयुष्य घालविलें असतां व आयुष्याचा चवथा भाग राहिला असतां त्याचें शरीर क्षीण व जर्जर होतें. ५८ असें शरीर जर्जर झाल्यावरहि एक क्षणभर जरी विरक्ति आली तरी तत्काल संन्यास ग्रहण करून त्यानें यथाशक्ति आश्रमकर्म करीत रहावें. ५९ वानप्रस्थाश्रम स्वीकारूनहि ज्याच्या मनाला खरें वैराग्य येत नाहीं, त्याचा अधिकार श्रीकृष्ण सांगत आहे. ६०.

—याप्रमाणें यावज्जीव तपश्चर्या करणाराला मोक्षच मिळतो. पण आयुष्याचा तिसरा भाग संपला असतां मंद वैराग्य जरी आलें तरी त्याला संन्यासाचा अधिकार आहे. परंतु आयुष्याचा तिसरा भाग संपण्यापूर्वींच वानप्रस्थ जर स्वधर्म आचरण्यास असमर्थ झाला तर त्यानें विरक्ती आली किंवा न आली तरी संन्यासच करावा. आतां या पुढील श्लोकांत त्यांतील अविरक्ताचें कर्तव्य सांगतात—

**यदा असौ नियमे अकल्पः जरया जातवेपथुः**—जेव्हां हा वानप्रस्थ आपल्या नियमाविषयीं असमर्थ असेल व जरेनें ज्याच्या शरीरांत कंप उत्पन्न झाला असेल त्यानें, **आत्मनि अग्नीन् समारोप्य**—आत्म्यामध्यें अग्नीचा समारोप करून, **मच्चित्तः अग्निं समाविशेत्**—माझ्या ठिकाणीं चित्त ठेवून अग्नीमध्यें प्रवेश करावा. ११.

**सर्वथा वैराग्य नुठी देहीं । जरा आदळली ठायींचे ठायीं । स्वधर्माचरणीं शक्ति नाहीं । कंप पाहीं सर्वांगीं ॥ ६१ ॥ ऐसा वानप्रस्थवनवासी । आत्मसमारोप करूनि अग्नीसी । मातें दृढ ध्याऊनि मानसीं । अग्निप्रवेशीं रिघावें ॥ ६२ ॥ वानप्रस्थाश्रमीं वनस्थ । अतिशयें झाला विरक्त । तयाचा उत्तरविधि समस्त । स्वयें भगवंत सांगतसे ॥ ६३ ॥**

यदा कर्मविपाकेषु लोकेषु निरयात्मसु । विरागो जायते सम्यङ्न्यस्ताग्निः प्रव्रजेत्ततः ॥ १२ ॥

**वानप्रस्थीं अनुष्ठान । तेणें वैराग्य अतिगहन । इंद्रचंद्रादिब्रह्मसदन । निरयासमान जो मानी ॥ ६४ ॥ ऐसा दृढ वैराग्यउठावा । तेणें विहिताग्नि बोळवावा । त्याग करूनि आघवा । अंगीकारावा संन्यास ॥ ६५ ॥ ते संन्यासग्रहणस्थिती । यथाशास्त्र यथापद्धती । सांगताहे श्रीपती । यथानिगुती विहितार्थें ॥ ६६ ॥**

इष्ट्वा यथोपदेशं मां दत्त्वा सर्वस्वमृत्विजे । अग्नीन्स्वप्राण आवेश्य निरपेक्षः परिव्रजेत् ॥ १३ ॥

**अष्टश्राद्धादि विधानें । प्राजापत्यनाम इष्टीनें । मज भगवंतातें यजूनें । सर्वस्वदानें ऋत्विजां ॥ ६७ ॥ मुख्यत्वें मूर्त जो अग्नी । तो निजहृदयीं संस्थापूनी । आशा निःशेष छेदूनी । संन्यास करूनी निरपेक्ष ॥ ६८ ॥ संन्यास करितेठायीं । विघ्नें अपार उठती कांहीं । तीं रगडूनियां पायीं । संन्यास पाहीं करावा ॥ ६९ ॥**

विप्रस्य वै संन्यसतो देवा दारादिरूपिणः । विघ्नान्कुर्वन्त्ययं ह्यस्मानाक्रम्य समियात्परम् ॥ १४ ॥

---

म्हातारपणामुळें शरीर जर्जर झालें, स्वधर्माचरण करण्याची शक्ति राहिली नाहीं, अंग थरथरां कापूं लागलें, तरीहि देहाविषयीं मुळींच विरक्ति उत्पन्न झाली नाहीं, ६१ तर अशा वानप्रस्थानें अग्नीचा आत्म्यामध्यें समारोप करून मनांत माझें दृढ चिंतन करून अग्निप्रवेश करावा. ६२ वनांत राहणारा वानप्रस्थ अतिशय विरक्त झाला असतां त्याचा पुढील प्रकार भगवान् स्वतः सांगत आहे. ६३.

—आतां विरक्ताविषयीं सांगतात—

**यदा कर्मविपाकेषु निरयात्मसु लोकेषु सम्यक् विरागः जायते**—जेव्हां कर्मफलभूत व नरकरूप लोकांविषयीं पूर्ण वैराग्य येतें, **ततः न्यस्ताग्निः प्रव्रजेत्**—तेव्हां अग्नीचा त्याग करून संन्यास करावा. १२.

वानप्रस्थांतील खडतर तपश्चर्येनें त्याचें वैराग्य इतकें तीव्र असतें कीं, तो इंद्रलोक, चंद्रलोक, सत्यलोक इत्यादि सर्वांना नरकासमान मानितो. ६४ असें तीव्र वैराग्य उत्पन्न झालें कीं, त्यानें विहित अग्नीचा समारोप करावा आणि सर्वस्वाचा त्याग करून संन्यास घ्यावा. संन्यासग्रहणाची ती शास्त्रीयपद्धति श्रीकृष्ण यथार्थ सांगत आहे. ६६.

—त्यांतील पहिलें कर्तव्य सांगतात—

**यथोपदेशं मां इष्ट्वा**—आठ श्राद्धें करून प्राजापत्य इष्टीनें माझें यजन करून, **ऋत्विजे सर्वस्वं दत्त्वा**—ऋत्विजाला सर्वस्व देऊन, **अग्नीन् स्वप्राणे आवेश्य निरपेक्षः परिव्रजेत्**-अग्नीचा आत्म्यामध्यें समारोप करून पुत्र, वित्त व लोक यांच्या एषणांचा त्याग करून संन्यास करावा. १३.

आठ प्रकारचीं श्राद्धें यथाविधि करून व प्रजापति नांवाची इष्टि करून, मज भगवंताच्या उद्देशानें यज्ञ करून ऋत्विजांना सर्व संपत्तीचें दान करावें. ६७ मुख्यत्वें करून स्वयंज्योति असलेल्या अग्नीची हृदयांत स्थापना करून आशा टाकून पूर्ण निरपेक्ष व्हावें व संन्यास करावा. ६८ संन्यास घेतेवेळीं असंख्य विघ्नें उद्भवतात, त्यांस पायांखालीं चिरडून टाकून तो करावा. ६९.

—संन्यासांत पुष्कळ विघ्नें येतात, पण त्या सर्वांना तुच्छ करून संन्यासच करावा, अशा आशयानें भगवान् म्हणतात—

**संन्यसतः विप्रस्य वै दारादिरूपिणः देवाः विघ्नान् कुर्वन्ति**—संन्यास करणाऱ्या ब्राह्मणाला पत्नी, पुत्र, इत्यादिरूप देव विघ्न करितात, ( ते कोणत्या आशयानें विघ्न करितात तें सांगतात— ) **अयं हि अस्मान् आक्रम्य परं समीयात्**—हा आमचें अतिक्रमण करून परब्रह्माला प्राप्त होईल, [ अशा आशयानें ते त्याला विघ्न करितात. ] १४.

संन्यास करिता जो ब्राह्मण। त्यासी समस्त देव मिळोन। नाना स्त्रियादि रूपें जाण। अनंत विघ्नें करूं येती ॥ ७० ॥ विघ्न करावया कारण। मनुष्य देवांचा पशु जाण। सदा अर्पी बळिदान। देवाधीन हा सर्वदा ॥ ७१ ॥ तो बळी नेदी येथूनि आतां। पाय देऊनि आमुचे माथां। घेऊं पाहे ब्रह्मसायुज्यता। यालागीं सर्वथा विघ्नें करिती ॥ ७२ ॥ तेथ वैराग्यबळें तत्त्वतां। विघ्नें हाणोनियां लाता। अवगणूनि देवां समस्तां। संन्यास सर्वथा करावा ॥ ७३ ॥ ऐसा वैराग्यें उद्भट। विवेकज्ञानें अतिश्रेष्ठ। संन्यासग्रहणें वरिष्ठ। विधिनिष्ठ विभागें ॥ ७४ ॥ एवं झाल्या संन्यासग्रहण। त्याचें विधीचें विधिविधान। स्वयें सांगताहे नारायण। स्वधर्मलक्षण संन्यासीं ॥ ७५ ॥

बिभृयाच्चेन्मुनिर्वासः कौपीनाच्छादनं परम्। त्यक्तं न दण्डपात्राभ्यामन्यत्किञ्चिदनापदि ॥ १५ ॥

भूतां अभयदानपुरस्कर। संकल्पपूर्वक प्रेषोच्चार। तैं उरलें दिसे देहमात्र। सर्वस्व येर त्यागिलें ॥ ७६ ॥ जो गुरुवाक्यश्रवणासरिसा। वस्तूचि होऊनि ठेला आपैसा। उडाला देहबुद्धीचा वळसा। तुटला फांसा कर्माचा ॥ ७७ ॥ त्यासी विधिविधानकर्तव्यता। बोलोंचि नये गा सर्वथा। नवनीत आलिया हाता। रितें ताक आतां कोण घुसळी ॥ ७८ ॥ कापूर मिळालिया वन्हीं। तो परतेना कापूरपणीं। तेवीं वस्तु झाला जो गुरुश्रवणीं। तो विधिकिंकरपणीं वर्तेना ॥ ७९ ॥ परी गुरुवाक्यें तत्त्वतां। ज्यासी ऐशी हे अवस्था। सत्य न बाणेचि सर्वथा। त्याची विधानता अवधारीं ॥ ८० ॥ गुरुवाक्याचें करितां मनन। नागिवेपणें लाजे मन। तरी लिंगमात्र आच्छादान। कौपीन जाण धरावी ॥ ८१ ॥ इतुकेन निर्वाह न सरे। ऐसें जाणवलें जैं पुरें। तैं वस्त्रखंड दुसरें। स्वाधिकारें धरावें

---

जो ब्राह्मण संन्यास घेण्यास तयार होतो, त्याला शेंकडों विघ्नें करण्यासाठीं सगळे देव मिळून स्त्रियांचें रूप घेऊन येतात. ७० त्याला विघ्न करण्याचें कारण इतकेंच कीं, मनुष्य हा देवांचा पशु आहे. तो नेहमीं देवांना बळिदान देऊन सतत त्यांच्या अधीन असतो. ७१ यानें संन्यास घेतला म्हणजे मग हा आपणांस बलि देणार नाहीं. आमच्या स्थानाहून श्रेष्ठ असें जें ब्रह्मपद त्यांतील सायुज्य मुक्तीला प्राप्त होईल, म्हणून देव त्याला विघ्नें करितात. ७२ यास्तव वैराग्याच्या बळानें विघ्नांना लाथा मारून, सगळ्या देवांची उपेक्षा करून, निःशंकपणानें संन्यास घ्यावा. ७३ अशा प्रकारें तीव्र वैराग्यानें, विवेकज्ञानानें व शास्त्रविधीमध्यें तत्पर होऊन संन्यास घेणारा अत्यंत श्रेष्ठ होय. ७४ अशी संन्यासदीक्षा घेतल्यानंतर त्याच्या विधीचें विधान सांगून संन्यासाचे स्वधर्म स्वतः नारायण सांगत आहे. ७५.

—याप्रमाणें संन्यास केलेल्या पुरुषाचे धर्म सांगतात—

**मुनिः परं कौपीनात् वासः बिभृयात् चेत् कौपीनाच्छादनं**—या मुनीला लंगोटीहून दुसऱ्या वस्त्राची जर अपेक्षा असेल तर त्यानें केवळ शरीराचा मध्यभाग झांकेल एवढेंच आच्छादन घ्यावें. **अनापदि दंडपात्राभ्यां अन्यत् किंचित् त्यक्तं न ( बिभृयात् )**—शरीराच्या स्वास्थ्यावस्थेंत दंड-पात्रादि अवश्य असलेल्या वस्तूंहून प्रेषोच्चाराच्या पूर्वी टाकिलेलें दुसरें कांहींहि घेऊं नये. १५.

भूतांना अभयदान देऊन संकल्पपूर्वक प्रेषोच्चार केला असतां त्या यतीचा देह मात्र उरलेला दिसतो. बाकी सर्वांचा त्यानें त्याग केलेला असतो. ७६ जो गुरूच्या मंत्रोपदेशाबरोबरच स्वभावतः ब्रह्मस्वरूप होतो, त्याच्या देहबुद्धीचें बंधन कधींच तुटलेलें असतें व कर्माचा फांसा मोडून गेलेला असतो. ७७ तो शास्त्रांनीं सांगितलेल्या कर्तव्यविधिविधानतेची कधीं गोष्टहि काढीत नाहीं. कारण एकदां लोणी काढून झाल्यावर मग निव्वळ ताक कोण घुसळीत बसतो ! ७८ कापूर एकदां अग्नीच्या रूपाला प्राप्त झाला कीं, मग पुनः कांहीं तो कापराच्या मूळच्या स्वरूपाला परत येत नाहीं. त्याप्रमाणें एकदा गुरूपदेशानें त्याला आत्मानात्मविवेक कळला कीं, मग तो विधींचा अंकित होऊन रहात नाहीं. ७९ परंतु गुरूच्या उपदेशानेंहि ज्याच्या मनांत ही अवस्था तत्त्वतः बाणत नाहीं, त्याच्या विषयींचें विधान आतां सांगतों, ऐक. ८० गुरूच्या वचनाचें मनन करीत असतां स्वतःच्या नग्न स्थितीविषयीं ज्याच्या मनाला लाज वाटत असते, त्यानें शरीराचा गुह्यभाग झांकण्यापुरतीच लंगोटी नेसावी. ८१ इतक्यानेंहि जर भागत नसलें तर आपल्या योग्यतेप्रमाणें

॥ ८२ ॥ दंड कमंडलु जंव आहे । तंव कौपीन बहिर्वास राहे । दंडाचिया त्यागासवें पाहें । त्याग होये वस्त्रांचा ॥ ८३ ॥ आपत्तिकाळीं संन्याशासी । रोग लागला होय ज्यासी । कां जरेनें व्यापिलें देहासी । तैं जें लागेल त्यासी तें द्यावें ॥ ८४ ॥ गुरुवाक्यें श्रवणमनन । ऐसें साधी जो साधन । त्या साधकाचें लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ८५ ॥

दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेज्जलम् । सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥ १६ ॥

दृष्टि ठायीं ठेऊनि जाण । पृथ्वी पाहूनि पावन । हंसगतीं करी गमन । अनुसंधान निजवृत्तीं ॥ ८६ ॥ जेथ जीवसंपदा दृष्टीं पडे । तैं प्राण गेल्या न चले पुढें । जीविता काढूनि कडे । पाऊल पडे अतिशुद्ध ॥ ८७ ॥ आधींच पवित्र गंगाजळ । त्याचे निर्मळ वस्त्रें निरसोनि मळ । यापरी करोनियां निर्मळ । गंगाजळ सेविती ॥ ८८ ॥ ज्याचे वाचेचे आळा । असत्याच्या तृणशाळा । जाळूनि वैराग्य-ज्वाळा । सत्याचा उगवला कल्पद्रुम ॥ ८९ ॥ ज्या कल्पद्रुमाचीं वचनफळें । परिपक्वें आणि सोज्ज्वळें । मधुररसेंसीं रसाळें । अतिनिर्मळें घमघमितें ॥ ९० ॥ जें श्रवणीं अतिगोड । पुरवी श्रोतयांचें कोड । निववी जीवाची चाड । सत्य सुरवाड वाचेचा ॥ ९१ ॥ हें सहजें संन्याशाचें ध्यान । अहमेव नारायण । तें दृढ धरोनि अनुसंधान । पवित्र मन करावें ॥ ९२ ॥ मन करोनि पावन । पृथ्वी विचरावी जाण । त्या मनाचें पवित्रपण । सर्वत्र आपण लक्षावें ॥ ९३ ॥ संन्याशाचे धर्मीं जाण । मुख्यत्वें हेंचि लक्षण । पवित्र करोनि अंतःकरण । सर्वत्रीं नारायण लक्षावा ॥ ९४ ॥ मनाचें पवित्रपण । उद्धवा या नांव जाण । आतां त्रिदंडाचें लक्षण । संन्यासचिन्ह तें ऐक ॥ ९५ ॥

---

दुसऱ्या वस्त्राच्या तुकड्यानें शरीर झांकावें. ८२ जोंपर्यंत संन्याशाजवळ दंड, कमंडलु असतो तोंपर्यंत त्यानें लंगोटी व छाटी वापरावी; परंतु दंडाचा त्याग केला कीं, वस्त्राचाहि अवश्य त्याग करावा. ८३ संन्याशावर एखादी आपत्ति येऊन त्याला कांहीं रोग जडला किंवा म्हातारपणामुळें शरीर जर्जर झालें. तर त्याला त्या आपत्कालीं जें लागेल तें द्यावें. ८४ आतां गुरुवचनाप्रमाणें जो श्रवण व मनन साधितो, त्या साधकाचें लक्षण श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ८५.

दृष्टिपूतं पादं न्यसेत्—पायाखालीं कोणी क्षुद्र जीव चिरडून मरूं नये म्हणून पायाखालीं चांगलें पाहून पाऊल ठेवावें. वस्त्रपूतं जलं पिबेत्—वस्त्रानें गाळून जल प्यावें. सत्यपूतां वाचं वदेत्—सत्यानें पवित्र अशीच वाणी उच्चारावी. मनःपूतं समाचरेत्—मनानें चांगला विचार करून शुद्ध आचरण करावें. १६.

खालीं दृष्टि ठेवून, पवित्र जमीन पाहून, आत्मवृत्तीचें चिंतन करीत, तो हंसगतीनें चालतो. ८६ जेथें जीवजंतु दृष्टीस पडतात, तेथें तो प्राण गेला तरी पाऊल टाकीत नाहीं. जीवरक्षणासाठीं ज्या बाजूनें हिंसा होणार नाहीं अशा बेतानें पाऊल टाकितो. ८७ गंगेचें जल आधींच पवित्र असतें, तें वस्त्रानें गाळून जास्त निर्मळ केलेलें जल तो प्राशन करितो. ८८ तो आपल्या वाणीच्या सभोंवार असलेला असत्यरूपी गवताचा पेंडा वैराग्यरूपी प्रखर अग्नीच्या ज्वालांनीं जाळून टाकितो. तेथें सत्याचा कल्पवृक्ष उगवतो. ८९ त्या कल्पवृक्षाचीं वचनरूपी फळें अतिशय पक्व झालेलीं, रसाळ, मधुर, अत्यंत निर्मळ व स्वादिष्ट असतात. ९० तीं वचनरूपी फळें श्रवणाला अति गोड असतात. तीं ऐकणारांची तृप्ति करितात. जीवांची इच्छा पुरवितात. इतका त्याच्या वाणींत सत्याचा सुकाळ असतो. ९१ 'मीच नारायण आहें' हेंच संन्याशाचें स्वाभाविक ध्यान आहे. त्याचेंच दृढ अनुसंधान करून मन पवित्र करावें. ९२ मन पवित्र करून पृथ्वीवर संचार करावा. सर्वत्र आत्मस्वरूप पहाणें हाच मनाचा पवित्रपणा आहे. ९३ अंतःकरण पवित्र करून सर्व ठिकाणीं नारायण स्वरूपाची भावना करणें, हेंच संन्यासधर्माचें मुख्य लक्षण आहे. ९४ यालाच मनाचा पवित्रपणा म्हणतात. उद्धवा ! आतां त्रिदंडी संन्यासाचें लक्षण सांगतों तें ऐक. ९५.

मौनानीहानिलायामा दण्डा वाग्देहचेतसाम् । न ह्येते यस्य सन्त्यङ्ग वेणुभिर्न भवेद्यतिः ॥ १७ ॥

**मौन अथवा सत्य भाषण । कां श्रीरामनामाचें स्मरण । हो कां ओंकाराचें उच्चारण । वाग्दंड जाण या नांव ॥ ९६ ॥ शरीरींचें जितुकें चळण । तें प्राणाचेनि बळें जाण । त्या प्राणाचें प्राणरोधन । करावें आपण प्राणायामें ॥ ९७ ॥ प्राणायामें निजप्राण । जिणोनि करावा स्वाधीन । या नांव देहदंड जाण । ऐक लक्षण मनोदंडाचें ॥ ९८ ॥ मनाचें चपळपण । संकल्प विकल्प जाण । त्याचें करावया छेदन । ब्रह्मानुसंधान करावें ॥ ९९ ॥ माझें स्वरूप सर्वगत । तेथ निश्चयें ठेवितां चित्त । मन संकल्पविकल्पें जाय जेथ । तेथ तेथ तें स्वरूप ॥ १०० ॥ ऐसें सावध राखतां मन । दृढ लागल्या अनुसंधान । तंव संकल्पविकल्प क्षीण । सहजचि जाण स्वयें होती ॥ १ ॥ देह वाचा आणि मन । या त्रिदंडांचें लक्षण । तुज म्यां सांगीतलें संपूर्ण । संन्यासत्व जाण येणें सत्य ॥ २ ॥ हे तिन्ही दंड नसतां जाण । केवळ वेणुदंडग्रहण । तेणें संन्यास न घडे जाण । देहविटंबन दंभार्थ ॥ ३ ॥ संन्याशाचा आहार विहार । आचार संचार विचार । स्वधर्मयुक्त साचार । स्वयें सारंगधर सांगतू ॥ ४ ॥**

भिक्षां चतुर्षु वर्णेषु विगर्ह्यान्वर्जयंश्चरेत् । सप्तागारानसंकॢप्तांस्तुष्येल्लब्धेन तावता ॥ १८ ॥

**पूर्वीं जाण संन्याशासी । चतुर्वर्णीं भिक्षा होती त्यासी । कलियुगीं गोष्टी झाली कैसी । ब्राह्मणापाशीं चतुर्वर्ण ॥ ५ ॥ ज्याची जीविका जेणें जाण । त्या ब्राह्मणाचा तोचि वर्ण । ऐका तेंही प्रकरण ।**

---

वाग्देहचेतसां मौनानीहानिलायामाः दण्डाः—वाणी, देह व चित्त यांचें क्रमानें मौन, काम्यकर्मांचा त्याग व प्राणायाम हे दंड आहेत. ( मौन हा वाणीचा दंड, काम्यकर्मांचा त्याग हा देहाचा दंड व प्राणायाम हा चित्ताचा दंड आहे. ) अङ्ग—हे उद्धवा ! यस्य एते न सन्ति सः वेणुभिः यतिः न भवेत्—ज्याच्यापाशीं हे तीन दंड नसतात, तो नुसत्या वेळूच्या दंडानें यति होत नाहीं. १७.

मौन धारण करणें किंवा सत्य भाषण करणें; श्रीरामनामाचें स्मरण किंवा ओंकाराचा उच्चार करणें, याला वाग्दंड असें म्हणतात. ९६ शरीराची जितकी हालचाल होते ती सर्वहि प्राणांच्या बळावर होते. त्या प्राणांचा प्राणायामानें विरोध करावा. ९७ प्राणायामानें प्राणांना जिंकून स्वाधीन ठेवणें याला देहदंड म्हणतात. आतां मनोदंडाचें लक्षण ऐक. ९८ संकल्प व विकल्प हेंच मनाचें चंचलत्व आहे, त्याचा निरोध करण्यासाठीं ब्रह्मानुसंधान करावें. ९९ माझें स्वरूप सर्वगत आहे. त्यांत निश्चयानें चित्त ठेविलें असतां मन संकल्प-विकल्प करीत जेथें जेथें जातें, तेथें तेथें त्याला माझें स्वरूपच दिसतें. १०० अशा प्रकारें मन सावध ठेविलें असतां व आत्म्याचें दृढ चिंतन केलें असतां संकल्प-विकल्प आपणच नाश पावतात. १ याप्रमाणें देह, वाचा व मन या त्रिदंडांचें लक्षण मीं तुला पूर्णपणें सांगितलें. यांच्या योगें खरें संन्यासत्व येतें. २ हे तीन दंड नसतां हातांत वेळूचा दंड घेऊन फिरण्यानें खरा संन्यास घडत नाहीं. ती केवळ दांभिक देहविटंबना आहे. ३ आतां संन्याशाचा स्वधर्मयुक्त आहार, विहार, आचार, संचार व विचार हे श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. १०४.

विगर्ह्यान् वर्जयन् चतुर्षु वर्णेषु भिक्षां चरेत्-दोषांचा ज्यांच्यावर आळ आला आहे असे व पतित यांना सोडून वृत्तिभेदानें चार प्रकारच्या ब्राह्मणाच्या घरींच भिक्षा मागावी. असंकॢप्तान् सप्तागारान्—या घरीं गेल्यास मला लाभ होईल अशाप्रकारें पूर्वींच योजून न ठेविलेल्या सात घरीं भिक्षेस जाऊन तेथें जें मिळेल, तावता लब्धेन तुष्येत्—तेवढ्याच मिळालेल्या अन्नानें तुष्ट व्हावें. १८.

पूर्वीं संन्याशांना चारी वर्णांपासून भिक्षा मिळत असे. पण कलियुगांत कसा बदल झाला पहा ! ब्राह्मणांतच चार वर्ण उत्पन्न झाले. ५ ज्या वृत्तीवर ब्राह्मणांची उपजीविका होते तोच त्याचा वर्ण झाला. ( एकनाथांनीं येथें ब्राह्मणांतीलच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार भेद केले आहेत. परंतु श्रीधरस्वामींनीं ब्राह्मणांतील प्रतिग्रह घेणारे, अध्यापन करणारे, कर्मानुष्ठान करणारे व शिलोञ्छवृत्तीवर रहाणारे असे चार भेद केले आहेत. ) आतां ब्राह्मणांच्या

जीविकालक्षण सांगेन ॥ ६ ॥ मुख्य ब्राह्मणाची वृत्ति जाण । शिलउंछ कां कोरान्न । अयाचित कां अध्यापन । अथवा याजन जीविकेसी ॥ ७ ॥ जो जीविकेलागीं निर्धारीं । शस्त्र घेऊनियां करीं । शूर-वृत्ती जीविका करी । जाणावा क्षत्रीं ब्राह्मणांमाजीं तो ॥ ८ ॥ जो वाणिज्यवृत्तीवरीं । नित्य जीविका आपुली करी । तो ब्राह्मणांमाझारीं । वैश्य निर्धारीं निश्चित ॥ ९ ॥ जो शूद्राचे शूद्रक्रियेवरी । सदा सर्वदा जीविका करी । तो ब्राह्मण शूद्रकर्म करी । शूद्रत्वधारी क्रियायोगें ॥ ११० ॥ जैं उत्तमोत्तम भिक्षा न लभे । तैं क्षत्रियब्राह्मणीं भिक्षा लाभे । क्षात्रब्राह्मणांचेनि अलाभें । वैश्यादि ब्राह्मणीं लाभे भिक्षा-ग्रहण ॥ ११ ॥ ब्राह्मणक्षत्रियवैश्यब्राह्मणीं । भिक्षेस अपात्र हे तिनी । तैं शूद्रजीविकाब्राह्मणीं । भिक्षा-ग्रहणीं अधिकारू ॥ १२ ॥ यांत निंद्य जे ब्राह्मणाआंतू । केवळ दोषी अथवा अभिशप्तू । ते भिक्षेसी न लावा हातू । हा स्वधर्मार्थू भिक्षेचा ॥ १३ ॥ तेही भिक्षा अतिनेमस्त । भिक्षेसी येतों हें कळों नेदित । मागावीं मविलीं घरें सात । जें भालें प्राप्त तेणें सुखी ॥ १४ ॥ जे सातां घरीं भिक्षा प्राप्त । ते भिक्षेचा धर्म विहित । स्वयें सांगे श्रीकृष्णनाथ । स्मृतिशास्त्रार्थप्रयोगें ॥ १५ ॥

बहिर्जलाशयं गत्वा तत्रोपस्पृश्य वाग्यतः । विभज्य पावितं शेषं भुञ्जीताऽशेषमाहृतम् ॥ १९ ॥

ग्रामाबाहेर गंगातीरीं । अथवा तडागाचे परिसरीं । भिक्षा धरोनियां करीं । आचमन तीरीं करावें ॥ १६ ॥ याचित जें भिक्षेचें अन्न । तें द्वादशप्रणवें अभिमंत्रून । तेणें मंत्रोदकें प्रोक्षितां जाण ।

---

निर्वाहाचा प्रकार सांगतों तो ऐक. ६ शील, उञ्छ, कोरान्न, अयाचित, अध्यापन व याजन यांवर उपजीविका करणें ही ब्राह्मणांची मुख्य वृत्ति होय. ७ जो ब्राह्मण हातांत शस्त्र घेऊन युद्धांत शौर्य गाजवून आपला निर्वाह करितो तो क्षत्रिय होय. ८ जो व्यापारावर चरितार्थ चालवितो, तो ब्राह्मणांतील वैश्य होय. ९ आणि शूद्रांची जी सेवावृत्ति स्वीकारून जो सदासर्वदा त्यावर आपलें पोट भरितो तो स्वतःच्या क्रियेमुळें ब्राह्मणांतीलच शूद्र होय. ११० जेव्हां ब्राह्मण्यानें रहाणाऱ्या ब्राह्मणांकडील उत्तमांतील उत्तम भिक्षामिळत नाहीं, तेव्हां क्षत्रियवृत्तीनें रहाणाऱ्या ब्राह्म-णांकडून भिक्षा घ्यावी. ज्या वेळीं त्यांच्याहिकडून ती मिळणें अशक्य होतें, तेव्हां वैश्यादि वृत्तीनें रहाणाऱ्या ब्राह्मणां-कडून भिक्षा घ्यावी. ११ ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य या तिघांकडूनहि भिक्षा मिळेनाशी झाली, म्हणजे शूद्रवृत्तीनें रहाणाऱ्या ब्राह्मणांकडील भिक्षा घेण्यास संन्याशाला अधिकार आहे. १२ वर सांगितलेल्या चार प्रकारच्या ब्राह्मणांत जे निंद्य, दोषी किंवा ज्यांवर आचरण शुद्ध नसल्याचा किंवा दुसरा कांहीं लोकापवाद असेल त्यांच्याकडील भिक्षेला स्पर्शहि करूं नये. असा भिक्षेविषयीं स्वधर्म आहे. १३ ती भिक्षाहि अगदीं नेमलेलीं असावी. 'भिक्षेला येणार आहें' हें कळूं न देतां मोजकीं सात घरें भिक्षा मागावी व तेथें जें मिळेल त्यांत समाधान मानावें. अशीं सात घरें मागून आणिलेल्या भिक्षेचा ग्रहणविधि स्मृति व शास्त्र यांनीं सांगितलेल्या प्रकारानें आतां श्रीकृष्णनाथ स्वतः सांगत आहे. ११५.

**बहिः जलाशयं गत्वा**—गांवाच्या बाहेर जलाशयावर जाऊन, **तत्र उपस्पृश्य**—तेथें आचमन करून, **वाग्यतः**—वाणीचें नियमन करून, **पावितं विभज्य**—प्रोक्षणादिकांनीं शुद्ध केलेलें भिक्षान्न विष्णु, ब्रह्मा, सूर्य व भूतें यांना भाग देऊन, **शेषं अशेषं आहृतं भुञ्जीत**—बाकी राहिलेलें सर्व अन्न मोठ्या आदरानें भक्षण करावें. [ श्लोकांत अशेषं असें जें म्हटलें आहे तें अधिक अन्न भिक्षा मागून आणूं नये या आशयानें म्हटलें आहे. 'याचितं' असा एक पाठ आहे. त्यावरून माधुकरी मागून आणिलेल्या अन्नाचा पूर्वोक्त विभाग करावा व राहिलेलें अन्न खावें. अयाचितादि चार उपायांनीं प्राप्त झालेलें अन्न विभागपूर्वक भक्षण करण्याचें कारण नाहीं, असें ठरतें. माधुकर म्ह० मधुकरी मागून आणलेल्या अन्नाचाच नैवेद्य दाखवावा. अन्य उपायांनीं मिळालेल्या अन्नाचा नैवेद्य दाखवूं नये. विष्णु ब्रह्मा, व सूर्य यांचा नैवेद्य पाण्यांत टाकावा. भूतांचा भाग जलाच्या बाहेर भूमीवर टाकावा किंवा 'याचितं' याचा अर्थ असा— त्यावेळीं कोणी याचना केली असतां त्यांतीलच अन्न त्याला देऊन बाकी उरलेलें आपण भक्षण करावें. ] १९.

गांवाबाहेर गंगेच्या काठीं, नदीच्या अथवा तळ्याच्या तीरावर आणलेली भिक्षा हातांत धरून अगोदर आचमन करावें. १६ भिक्षा मागून आणलेलें जें अन्न त्याचें बारा प्रणवांनीं अभिमंत्रित केलेल्या मंत्रोदकानें प्रोक्षण केलें

**होय पावन पवित्र ॥ १७ ॥ चतुर्धा करावें त्या अन्नातें । चार अधिकारी त्या भागातें । ब्रह्मा विष्णु अर्क आणि भूतें । अर्पण तेथें अवधारीं ॥ १८ ॥ विष्णुकल्पित जो भाग । तो जळीं घालावा सांग । भूतकल्पित जो विभाग । तो पृथ्वीवरी चांग ठेवावा ॥ १९ ॥ उरलें जे विभाग दोनी । यतीसी अधिकार सेवनीं । दीन मागों आलिया ते क्षणीं । भूतदयागुणी अन्न द्यावें ॥ १२० ॥ परी मी एक अन्नदाता । हें आठवोंहि नये चित्ता । आल्या दातेपणाची अहंता । अधर्मता संन्यासी ॥ २१ ॥ मधुकरीचें अवघड चिन्ह । समयीं मागों येतां दीन । येणें उद्देशें अधिका अन्न । सर्वथा जाण मागों नये ॥ २२ ॥ करितां मधुकरीभोजन । अधिक उरलिया अन्न । तें सांडितां अतिपतन । अवघेंच जाण भक्षावें ॥ २३ ॥ संन्यासधर्मीं लघु आहार । नित्य करावा निरंतर । अधिक आहारीं विकार । निद्रा आळस फार बाधिती ॥ २४ ॥ ज्यालागीं कीजे चतुर्थाश्रम । तो संन्याशाचा मुख्य धर्म । स्वयें सांगे पुरुषोत्तम । जेणें आत्माराम पाविजे ॥ २५ ॥**

एकश्चरेन्महीमेतां निःसङ्गः संयतेंद्रिया । आत्मक्रीड आत्मरत आत्मवान् समदर्शनः ॥ २० ॥

**सदा वैराग्य अंगीं पुरतें । जो अपेक्षीना सांगा त्यातें । निःसंग होत्साता चित्तें । सुखें पृथ्वीतें विचरतू ॥ २६ ॥ इंद्रियें बांधोनि चित्ताच्या पायीं । चित्त लावी चैतन्याच्या ठायीं । तेणें चिन्मात्र ठसावें पाहीं । देहत्व देहीं स्मरेना ॥ २७ ॥ ऐसा आत्मस्थितीचा उद्यम । तेणें आत्मक्रीडेचा आराम । आत्मसुखाचा संभ्रम । अनुभव परम तो ऐक ॥ २८ ॥ आत्मस्थिति निजात्मयुक्त । तेणें आत्मसुखें उल्हासत । सदा समदर्शनें डुल्लत । वोसंडत समसाम्यें ॥ २९ ॥ ऐशिया समसुखाची संपत्ती । भोगावया सुनिश्चितीं । सदा एकाकीं वसे एकांतीं । तेंचि श्रीपति सांगत ॥ १३० ॥**

---

असतां तें पवित्र होतें. १७ नंतर त्या अन्नाचे सारखे चार विभाग करावेत. त्या भागांचे ब्रह्मदेव, विष्णु, सूर्य, व भूतें हे चार अधिकारी आहेत. या चौघांना ते अर्पण करावेत. १८ विष्णूला अर्पण केलेला भाग जलांत टाकावा. भूतांचा भाग भूमीवर ठेवावा, १९ आणि राहिलेला दोन भाग सेवन करण्याचा यतीला अधिकार आहे खरा; परंतु त्यावेळीं एखादा कोणी दीन प्राणी तेथें आल्यास भूतदयेनें त्याला अन्न द्यावें. १२० तथापि तें अन्न देतेवेळीं 'मी अन्नदाता आहें' असा अभिमान मनांत येऊं देऊं नये. कारण दातृत्वाचा अभिमान उत्पन्न झाला कीं, संन्याशाला अधर्माचा दोष लागतो. २१ मधुकरीचा प्रकार फार अवघड आहे. प्रसंगीं कोणी अन्न मागावयास येईल या हेतूनें जास्त अन्न केव्हांहि मागून आणूं नये. २२ मधुकरी मागून आणलेलें अन्न जरी अधिक असलें तर तें टाकल्यानें अधःपात होतो. म्हणून असेल तें सगळें अन्न भक्षण करावें. २३ संन्यास धर्मांत अति अल्प आहार करावा. कारण जास्त आहार केल्यानें निद्रा व आळस हे विकार फार पीडा देतात. २४ ज्यासाठीं चतुर्थाश्रम करावयाचा तो संन्याशाचा मुख्य धर्म; त्यायोगें आत्मारामाची प्राप्ति होते. तेंच श्रीकृष्ण सांगत आहे. १२५.

**एतां महीं एकः निःसङ्गः संयतेन्द्रियः आत्मक्रीडः आत्मरतः आत्मवान् समदर्शनः चरेत्—या पृथ्वीवर एकाकी, सर्व आसक्ति सोडून, इंद्रियांचें संयमन करून, आत्म्यामध्यें ज्याची क्रीडा आहे, आत्म्यामध्येंच जो संतुष्ट आहे असा धीर व सर्वत्र समदृष्टि होऊन यतीनें संचार करावा. २०.**

ज्याच्या अंगांत पूर्ण वैराग्य बाणलें आहे, जो सोबत्याची अपेक्षा न करितां मनानें निःसंग होऊन खुशाल पृथ्वीवर फिरत असतो, २६ इंद्रियांना मनाच्या दोरीनें बांधून तें मन आत्मस्वरूपाकडेच लावितो, त्यामुळें चित्स्वरूप मनांत ठसतें व देहाच्या देहपणाचीहि आठवण रहात नाहीं, २७ त्याला अशा प्रकारच्या आत्मस्थितीविषयींच्या उद्योगानें आत्मक्रीडेंतच विश्रांति मिळते. त्याच्या आत्मसुखाचा श्रेष्ठ अनुभव सांगतों ऐक. २८ तो आत्मस्वरूपानें युक्त झाला म्हणजे आत्मानंदांतच निमग्न असतो. ऐक्यभावानें सर्वदा डुलत असतो व समरसानें भरून तें समत्व उतू जात असतें. २९ अशा समत्वसुखाचें ऐश्वर्य भोगावयास सांपडावें म्हणून तो एकांतांत जाऊन रहातो. त्याविषयींच आतां श्रीपति सांगत आहे. १३०.

विविक्तक्षेमशरणो मद्भावविमलाशयः । आत्मानं चिन्तयेदेकमभेदेन मया मुनिः ॥ २१ ॥

**पवित्र आणि विजन । प्रशस्त आणि एकांतस्थान । तेथें माझें अनुसंधान । मद्भावें जाण सर्वदा ॥ ३१ ॥ तेणें सांडून जनपद दुश्चित्त । सदा एकांतीं व्हावें निरत । मद्भावें सुनिश्चित । आत्मसुख प्राप्त साधकां ॥ ३२ ॥ ज्यासी निजात्मसुख झालें प्राप्त । तो होय अनन्यशरणागत । मीवांचूनि जगाआंत । आणिक अर्थ देखेना ॥ ३३ ॥ ऐसें अनन्य करितां माझें ध्यान । साधक विसरे मीतूंपण । तेव्हां अभेदें चैतन्यघन । मद्रूप जाण तो होय ॥ ३४ ॥ त्या मद्रूपाचे स्वरूपस्थिती । पाहों जातां निजात्मवृत्ती । मी ना तो ऐशी होय गती । अभेदप्राप्ती या नांव ॥ ३५ ॥ जंव असे द्वैतवार्ता । तंव भयाची बाधकता अभेदत्व आल्या हाता । निर्भयता साधकां ॥ ३६ ॥ अभेदप्राप्तीच्या ठायीं । बंधमोक्षांची वार्ता नाहीं । गडगर्जे बंधमोक्ष पाहीं । नांदती नवायी हरि बोले ॥ ३७ ॥**

अन्वीक्षेतात्मनो बन्धं मोक्षं च ज्ञाननिष्ठया । बन्ध इन्द्रियविक्षेपो मोक्ष एषां च संयमः ॥ २२ ॥

**ऐक्यें पावोनि एकात्मता । तेथूनि बंधमोक्ष पाहतां । दोहींची मिथ्या वार्ता । मायिकता निश्चित ॥ ३८ ॥ प्रवृत्तीमाजीं बंधमोक्षता । त्या दोहींची विभागता । इंद्रियांची जे विषयासक्तता । दृढबद्धता ती नांव ॥ ३९ ॥ काया वाचा चित्तवृत्ती । निःशेष विषयांची विरक्ती । या नांव साचार मुक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १४० ॥ ज्यासी साचार पाहिजे मुक्ती । तेणें करावी विषयनिवृत्ती । हेचि मुख्यत्वें उपायस्थिती । कृष्ण कृपामूर्ति सांगत ॥ ४१ ॥**

---

**विविक्तक्षेमशरणः**—ज्याचें स्थान निर्जन व निर्भय आहे, **मद्भावविमलाशयः मुनिः**—मद्भावनेनें ज्याचें चित्त विमल झालें आहे, अशा मुनीनें, **मया अभेदेन एकं आत्मानं चिंतयेत्**—माझ्याशीं अभेदानें एका आत्म्याचें चिंतन करावें. [ निर्जन व निर्भय स्थानीं राहून माझ्या भक्तीनें ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे, अशा यतीनें मद्रूप आत्म्याचेंच चिंतन करावें. ] २१.

पवित्र निर्जन, रम्य आणि एकांत अशा जागेंत सद्भावानें सतत माझें चिंतन करावें. ३१ त्यानें संसारांतील दुःखानें उद्विग्न झालेल्या लोकांना सोडून निरंतर एकांतांत जाऊन सुखानें रहावें. म्हणजे साधकाला मद्भावानें आत्मसुख निश्चयानें प्राप्त होतें. ३२ ज्याला आत्मसुख प्राप्त होतें तो मला अनन्य शरण होतो. त्याला मजवांचून जगांत दुसरा कोणताहि विषय दिसत नाहीं. ३३ असें माझें अनन्य ध्यान केलें असतां साधक 'मी तूं' पणा विसरतो व तो भेदरहित चैतन्यघन मद्रूपच होऊन जातो. ३४ त्या मद्रूपाची स्वरूपस्थिति पाहूं गेलें असतां, ते वास्तविक आत्मस्वरूपच आहे. 'मी' नाहीं व 'तो' नाहीं अशी स्थिति होणें यालाच अभेदप्राप्ति म्हणतात. ३५ जोंपर्यंत द्वैताची वार्ता असते, तोंपर्यंतच साधकाला भय बाधत असते. द्वैताचें निरसन होऊन ऐक्य झालें असतां तो निर्भय होतो. ३६ अभेदप्राप्ति झाली असतां बंध मोक्षाची वार्तीहि ऐकूं येत नाहीं. आतां बंध व मोक्ष याचें स्वरूप तूं पहा, असें म्हणून त्यांची आश्चर्यकारक स्थिति श्रीकृष्ण सांगत आहे. १३७.

**ज्ञाननिष्ठया आत्मनः बन्धं मोक्षं च अन्विक्षेत**—ज्ञाननिष्ठेनें आत्म्याला बंध कसा होतो व तो मुक्त कसा होतो, याचा विचार करावा, **इंद्रियविक्षेपः बंधः एषां च संयमः मोक्षः**—इंद्रियांचा विक्षेप म्ह० विषयप्रवृत्ति हाच बंध व इंद्रियांचा संयम हाच मोक्ष होय. २२.

ऐक्य भावनेनें जीव-ब्रह्मेची एकात्मता प्राप्त झाली म्हणजे मग बंध व मोक्ष हे दोन्ही मिथ्या मायिक होतात. ३८ प्रवृत्तीमध्यें बंध व मोक्ष यांचा असा विभाग केला आहे. इंद्रियांची जी विषयासक्ति तिला दृढबद्धता म्हणतात ३९ आणि शरीर, मन व वाणी यांच्या योगें विषयांची जी पूर्ण विरक्ति तिला खरी मुक्ति असें म्हणतात. असे हे उद्धवा ! तूं जाण. १४० कृपेची मूर्तिच असा श्रीकृष्ण, ज्याला ती खरी मुक्ति पाहिजे असेल त्यानें इंद्रियांना विषयांपासून निवृत्त करावें, हाच मुख्य उपाय सांगत आहे. १४१.

तस्मान्नियम्य षड्वर्गं मद्भावेन चरेन्मुनिः । विरक्तः क्षुल्लकामेभ्यो लब्ध्वात्मनि सुखं महत् ॥ २३ ॥

**येणें विचारें विचारितां । विषयासक्तीं दृढबद्धता । त्या विषयांचा त्याग करितां । निजमुक्तता सहजेंचि ॥ ४२ ॥ तेचि विषयांची विरक्ती । केवीं आतुडे आपुल्या हातीं । यालागीं वैराग्याची उत्पत्ती । साधकें निश्चितीं साधावी ॥ ४३ ॥ अंतरीं वासना दृढमूळ । विषयशाखा तेणें सबळ । ते वासना छेदावया समूळ । वैराग्य साधावें ॥ ४४ ॥ वैराग्यप्राप्तीचें कारण । स्वधर्मकर्म मदर्पण । सांडावें कर्माचें कर्तेपण । मदर्पण या नांव ॥ ४५ ॥ मदर्पणें कर्मस्थिती । तेणें माझ्या ठायीं उपजे प्रीती । माझें नाम माझी कीर्ती । चिंतन चित्तीं पैं माझें ॥ ४६ ॥ ऐशिया माझ्या परम प्रीतीं । होय वैराग्याची उत्पत्ती । तेणें विषयांची विरक्ती । माझी सुखप्राप्ती शनैःशनैः ॥ ४७ ॥ माझेनि सुखें माझें भजन । अत्यंत थोरावे पैं जाण । तेव्हां सर्वत्र मद्भावन । ब्रह्मत्व जाण ठसावे ॥ ४८ ॥ सर्वत्र ब्रह्मभावन । ब्रह्मसुखाचें अनुसंधान । धरूनि करावें पर्यटन । जंव निर्वासन मन होय ॥ ४९ ॥**

पुरग्रामव्रजान् सार्थान् भिक्षार्थं प्रविशंश्चरेत् । पुण्यदेशसरिच्छैलवनाश्रमवतीं महीम् ॥ २४ ॥

**पृथ्वी विचरणें विचित्र । पुण्यदेश कुरुक्षेत्र । सप्त पुऱ्या परम पवित्र । पुष्करादि थोर महातीर्थें ॥ १५० ॥ कृतमाला पयस्विनी । पुण्यरूप ताम्रपर्णी । गौतमी रेवा त्रिवेणी । परमपावनी गोमती ॥ ५१ ॥ कृष्ण वेण्या तुंगभद्रा । तपती पयोष्णी भिंवरा । यमुना भागीरथी नीरा । गंगासागरासंगमीं**

---

तस्मात् षड्वर्गं नियम्य—यास्तव मनासह पांच ज्ञानेंद्रियांचें नियमन करून, क्षुल्लकामेभ्यः विरक्तः आत्मनि महत् सुखं लब्ध्वा मुनिः मद्भावेन चरेत्—क्षुद्र कामांपासून विरक्त होऊन, आत्म्यांतील महत् सुखाला प्राप्त होऊन, संन्याश्यानें मद्भावनेनें संचार करावा. २३.

अशाप्रकारें विचार केला असतां विषयासक्तीनें दृढ बंधन प्राप्त होतें व त्या विषयांचा त्याग केला असतां सहजच मुक्ति प्राप्त होते. ४२ ही विषयांची विरक्ति आपल्या हातीं कशी येईल, म्हणून साधकानें वैराग्य उत्पन्न होण्याचा उपाय योजावा. ४३ अंतःकरणांत वासनांचें मूळ रुतलेलें असतें, त्यामुळें विषयरूपी शाखा प्रबल होतात. करितां त्या वासना समूळ तोडून टाकण्यासाठीं तीव्र वैराग्य साध्य करावें. ४४ वैराग्यप्राप्तीचें जें कारण तें सगळें स्वधर्मकर्म मला अर्पण करून कर्माच्या कर्तृत्वाचा अहंकार टाकावा. यालाच मदर्पण म्हणतात. ४५ मदर्पण बुद्धीनें कर्म केलें असतां माझ्याविषयीं प्रीति उत्पन्न होते. माझें नांव, माझी कीर्ति, मनामध्यें माझेंच चिंतन, यांची आवड वाढते. ४६ अशी मजवर परम प्रीति जडली म्हणजे मनांत वैराग्य उत्पन्न होतें. त्यामुळें विषयांची विरक्ति येते व हळूहळू माझ्या सुखाची प्राप्ति होते. ४७ माझ्या सुखानें माझें भजन दृढ होत जातें व सर्व ठिकाणीं माझीच भावना होऊन ब्रह्मत्व पूर्ण ठसतें. ४८ मन असें वासनारहित होईपर्यंत, सर्वत्र ब्रह्मभाव ठेवून आत्मस्वरूपाचें चिंतन करीत पृथ्वीवर फिरत रहावें. १४९.

**भिक्षार्थं पुरग्रामव्रजान् सार्थान् प्रविशन् पुण्यदेशसरिच्छैलवनाश्रमवतीं महीं चरेत्**—भिक्षेसाठीं नगर, ग्राम, गायींचे व्रज व यात्रिकांचे समूह यांत प्रवेश करणाऱ्या यतीनें पुण्यप्रदेश, नदी, पर्वत, वन व आश्रम यांनीं युक्त असलेल्या पृथ्वीवर संचार करावा. [ यतीनें केवल भिक्षेसाठींच नगरादिकांत प्रवेश करून बाकीचा सर्व काल इतर पुण्यप्रदेशीं घालवावा, असा याचा भावार्थ. ] २४.

पृथ्वीवर विचित्र संचार करावा. पवित्र कुरुक्षेत्र, अतिशय पावन मानलेली अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, जगन्नाथपुरी व द्वारका हीं पुण्यक्षेत्रें; पुष्कर, प्रयाग इत्यादि महातीर्थें; १५० कृतमाला, पयस्विनी, पुण्यप्रद ताम्रपर्णी, गोदावरी, नर्मदा, त्रिवेणी, परम पवित्र गोमती, ५१ कृष्णा, वेण्या, तुंगभद्रा, तापी, चंद्रभागा, पयोष्णी, यमुना, भागीरथी, नीरा यांचे नदीतीर; किंवा जेथें गंगा व समुद्र यांचा संगम होतो असे प्रदेश; ५२ ऋष्यमूक,

**॥ ५२ ॥ ऋष्यमूक श्रीशैल व्यंकटाद्री । मूळपीठींचा सह्याद्री । गौतमीतीरींचा ब्रह्मगिरी । जो पापें संहारी यात्रामात्रें ॥ ५३ ॥ हो कां चढतां हिमगिरी । पदीं दुरितातें दूर करी । निःशेष पापातें निवारी । ते यात्रा मुनीश्वरीं अवश्य कीजे ॥ ५४ ॥ दंडकारण्य बृहद्वन । नैमिषारण्य आनंदवन । इत्यादि वनांचें गमन । संन्याशीं जाण करावें ॥ ५५ ॥ च्यवनकपिलव्यासाश्रम । गौतमवामनआश्रमोत्तम । यात्रा श्रेष्ठ बदरिकाश्रम । जो सकळ कर्मदाहकू ॥ ५६ ॥ ऐशीं स्थळें जीं पावन । तेथें संन्याशीं करावें गमन । मार्गीं भिक्षार्थ जें अटन । तेंही निरूपण अवधारीं ॥ ५७ ॥ हाट हाटवटिया उत्तम । त्यातें पुर म्हणती नरोत्तम । हाटहाटवटियाहीन तो ग्राम । भिक्षेचा नेम सारावा तेथें ॥ ५८ ॥ गायी गौळियांचें निवासस्थान । व्रज त्यातें म्हणणें जाण । सार्थ म्हणिजे पव्हा संपूर्ण । भिक्षार्थ अटन करावें तेथें ॥ ५९ ॥ पवित्र भिक्षेचे प्राप्तीकारणें । संन्यासीं अवश्य जाणें । तेचि अर्थीचें निरूपणें । स्वयें श्रीकृष्णें सांगिजे ॥ १६० ॥**

वानप्रस्थाश्रमपदेष्वभीक्ष्णं भैक्ष्यमाचरेत् । संसिध्यत्याश्वसंमोहः सिद्धसत्त्वः शिलान्धसा ॥ २० ॥

**शुद्ध व्हावया अंतर । वानप्रस्थाश्रमीं जो नर । जाऊनि ठाकावें त्याचें द्वार । अति सादर भिक्षार्थ ॥ ६१ ॥ सेविता सात्विकाचे अन्नासी । शुद्ध सत्वता साधकांसी । तत्काळ होय ग्रासोग्रासीं । शुद्ध अन्नासी हा महिमा ॥६२॥ यालागीं वानस्थाचें द्वार । ठाकोनि जावें वारंवार । तेणें सत्वशुद्धि अनिवार । होय साचार साधकां ॥ ६३ ॥ शुद्ध भिक्षेचिये प्राप्ती । सत्वशुद्ध होय वृत्ती । तेणें वासना निःशेष नासती । निजशांती उल्हासे ॥६४॥ वासना नासल्या निलाग । तो सत्यत्वें न देखें जग । विषयासक्ति कैंची मग । सहज विराग उद्भट ॥ ६५ ॥**

---

श्रीशैल, व्यंकटगिरी, मूळपीठीचा सह्याद्री; ज्याच्या नुसत्या यात्रेनेंच सर्व पापांचा नाश होतो असा गौतमतिरींच ब्रह्मगिरी; ५३ किंवा ज्यावर चढत असतां प्रत्येक पावलाला पातकाचें निरसन होऊन जो सर्व पातकांचें पूर्णपणें निवारण करितो, तो हिमालय, अशा पुण्यप्रदेशीं मुनीश्वरानें यात्रा अवश्य करावी. ५४ दंडकारण्य, बृहद्वन, नैमिषारण्य, आनंदवन इत्यादि वनांत संन्याश्यानें गमन करावें. ५५ च्यवन, कपिल, व्यास, गौतम, वामन इत्यादि श्रेष्ठ ऋषींचे आश्रम व सगळ्या कर्मांचा परिहार करणारा वरिष्ठ बदरिकाश्रम, यांची यात्रा करावी. ५६ अशीं जीं पवित्र स्थळें आहेत तेथें संन्याश्यानें अवश्य जावें. मार्गामध्यें भिक्षेसाठीं जें फिरणें, त्याचें निरूपण ऐक. ५७ जेथें बाजार व रहदारीचे रस्ते असतात त्याला विद्वान् लोक 'पुर' असें म्हणतात. असा बाजार व रहदारीचे रस्ते यांनीं रहित असलेला जो गांव असेल, तेथें भिक्षा करावी. ५८ किंवा गायी व गौळी जेथें असतात त्याला गौळीवाडा असें म्हणतात; किंवा जेथें पाणपोयी असेल अशा गांवांत संन्याश्यानें भिक्षेसाठीं फिरावें. ५९ पवित्र भिक्षेसाठीं संन्याश्यानें कोणाच्या दारांत जावें, याचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. १६०.

**वानप्रस्थाश्रमपदेषु अभीक्ष्णं भैक्ष्यं आचरेत्**–वानप्रस्थांच्या आश्रमस्थानामध्यें वारंवार भिक्षाचरण करावें. **शिलान्धसा शुद्धसत्त्वः असंमोहः आशु संसिध्यति**–कारण शीलवृत्तीनें संपादन केलेल्या वानप्रस्थाच्या अन्नानें या यतीचें चित्त शुद्ध होतें, मोह निवृत्त होतो व तो सत्वर मुक्त होतो. २५.

चित्तशुद्धि होण्यासाठीं वानप्रस्थाश्रमी जो मनुष्य असेल त्याच्या दारांत अत्यंत आदरानें जाऊन भिक्षा मागावी. ६१ कारण सात्त्विक मनुष्याच्या घरचें अन्न सेवन केल्यानें प्रत्येक घासाबरोबर साधकाचा सत्त्वगुण वाढत जातो; शुद्ध अन्नाचा असा महिमा आहे. ६२ यास्तव वरचेवर वानप्रस्थाच्या दारांत भिक्षेसाठीं जाऊन उभें रहावें; त्यामुळें साधकाची अत्यंत चित्तशुद्धि होते. ६३ पवित्र माणसाकडून मिळालेल्या भिक्षेनें चित्तशुद्धि होते, त्यायोगें वासनांचा पूर्णपणें नाश होतो आणि आत्मशांतीचा आनंद प्राप्त होतो. ६४ याप्रमाणें वासना निःशेष नाहींशा झाल्या म्हणजे तो हें जगत् मिथ्या समजूं लागतो; मग तेथें विषयासक्ति कोठची ! त्याला सहजच तीव्र विरक्ति प्राप्त होते. १६५,

नैतद्वस्तुतया पश्येद्दृश्यमानं विनश्यति । असक्तचित्तो विरमेदिहामुत्र चिकीर्षितात् ॥ २६ ॥

**जेथ जें जें दिसे तें तें नासे । हें सर्वांसी प्रत्यक्ष आभासे । परी अज्ञान भुलले कैसे । विषयवशें विगुंतोनी ॥ ६६ ॥ यालागीं शुद्ध भिक्षेचिये प्राप्ती । ज्यासी शुद्धसत्व झाली वृत्ती । त्यासी विषय सत्यत्वें न दिसती । मा विषयासक्ती मग कैंची ॥ ६७ ॥ ऐसें मिथ्या विषयाचें भान । त्याचें विषयासक्त नव्हे मन । यालागीं भवस्वर्गसाधन । दोन्ही तो जाण स्पर्शेना ॥ ६८ ॥ ऐसा जो विषयीं विरक्त । त्याचें परमार्थीं लागलें चित्त । तो जगीं विचरे अनासक्त । परमार्थयुक्त निजबोधें ॥ ६९ ॥ त्याच्या निजबोधाचें लक्षण । स्वयें सांगताहे नारायण । प्रपंचाचें मिथ्यापण । समाधान निजात्मता ॥ १७० ॥**

यदेतदात्मनि जगन्मनोवाक्प्राणसंहतम् । सर्वं मायेति तर्केण स्वस्थस्त्यक्त्वा न तत्स्मरेत् ॥ २७ ॥

**मनसा वाचा प्राणप्रवाहीं । अहंकारकृत उभयदेहीं । जग आत्म्याच्या ठायीं । मिथ्या मायिक पाहीं आभासे ॥ ७१ ॥ दोराअंगीं सर्पाभास । शुक्तिकेमाजीं रजतप्रकाश । उखरीं मृगजळाचा विलास । तैसा जगदाभास चिन्मात्रीं ॥ ७२ ॥ जैसा स्वप्नींचा व्यवहार । तैसें भासे चराचर । ऐसे मिथ्या जाणोनि साचार । पुढती स्मरणादर स्फुरेना ॥ ७३ ॥ जो जागा झाला इत्थंभूत । तैं स्वप्नभोग न वांछी चित्त । तेवीं स्वरूपीं सुनिश्चित । तो प्रपंचजात स्मरेना ॥ ७४ ॥ त्रिदंडी बहुदकांचें कर्म । तुज म्यां सांगीतलें**

---

—अहोपण, मिष्टान्न टाकून रूक्ष शिलान्नाकडे प्रवृत्ति कशी होईल ! उत्तर—

**एतत् दृश्यमानं वस्तुतया न पश्येत्**—हें दिसणारें मिष्टान्नादिक वस्तुत्वानें पाहूं नये. ( **यतः** ) **विनश्यति**—कारण तें विनाश पावतें. **अतः इह अमुत्र असक्तचित्तः चिकीर्षितात् विरमेत्**—यास्तव ऐहिक व पारलौकिक फलामध्यें चित्ताला आसक्त न होऊं देतां त्याविषयींच्या कर्तव्यापासून निवृत्त व्हावें. २६.

या सृष्टींत जेवढें म्हणून दिसतें तेवढें सगळें नाशिवंत आहे, याचा सगळ्यांना प्रत्यय येतो. परंतु लोक विषयांत गुंतून अज्ञानानें कसे भाळतात तें प्रसिद्ध आहे. ६६ यास्तव सात्विक भिक्षेच्या प्राप्तीनें ज्याची चित्तशुद्धि झाली, त्याला विषय सत्य भासत नाहींत. तेव्हां मग त्याला विषयासक्ति कोठची ! ६७ याप्रमाणें विषय मिथ्या आहेत अशी भावना झाली म्हणजे त्याचें मन विषयासक्त होत नाहीं, त्यामुळें तो संसार व स्वर्ग या दोहोंच्याहि प्राप्तीच्या साधनांना स्पर्शहि करीत नाहीं. ६८ असा जो विषयांविषयीं विरक्त होतो, त्याचें चित्त परमार्थाकडे लागतें आणि तो आसक्तिरहित होऊन परमार्थयुक्त आत्मबोधानें जगांत फिरत असतो. ६९ आतां त्याच्या आत्मज्ञानाचें लक्षण, प्रपंचाचें मिथ्यात्व आणि आत्मस्वरूपानें प्राप्त होणारें समाधान स्वतः नारायण सांगत आहे. १७०.

—'अहोपण विनाश होईपर्यंत मिष्टान्नादि दृश्य वस्तु सुखाला कारण होते, तेव्हां त्याविषयीं चिंतन करणाऱ्या पुरुषाला विरक्ति कशी येणार ! ' उत्तर—

**यत् एतत् मनोवाक्प्राणसंहतं सर्वं जगत् आत्मनि माया इति तर्केण त्यक्त्वा स्वस्थः तत् न स्मरेत्**—ममतेचें व अहंकाराचें आस्पद—स्थान असें मन वाक् व प्राण यांसह हें शरीर व तज्जन्यसुख इत्यादि सर्व जगत् आत्म्यामध्यें मायामात्र म्ह० कल्पित आहे असें स्वप्नादि दृष्टान्तानें कल्पून त्यांचा त्याग करावा व आत्मनिष्ठ होऊन त्यांचें पुनः चिंतन करूं नये. २७.

मन, वाणी व प्राण यांच्या प्रवाहांत व अहंकारानें केलेले जे स्थूल व सूक्ष्म असे दोन देह त्यांत हें जगत् आत्म्यावर मिथ्या भासत आहे. ७१ दोरीवर सर्पाचा भास होणें किंवा शिंपीमध्यें रुपें भासणें किंवा माळजमिनीवर मृगजल दिसणें, तसाच हा चित्स्वरूपावर जगाचा आभास आहे. ७२ स्वप्नांतील व्यवहार जसा मिथ्या, तसेंच हें सर्व चराचर जगत् मिथ्या आहे; हें जाणल्यावर मग स्मरणाविषयीं आदर वाटत नाहीं. जाग्या झालेल्या मनुष्याचें मन जसें स्वप्नांत पाहिलेल्या भोग्यवस्तूंची इच्छा करीत नाहीं, त्याप्रमाणें आत्मस्वरूपांत मन स्थिर झाल्यावर

**सुगम । आतां हंसपरमहंसांचे धर्म । यथानुक्रम अवधारीं ॥ ७५ ॥ संन्यास चतुर्विध देख । हंस परमहंस एक । एक तो बहूदक । कुटीचक तो भिन्न ॥ ७६ ॥ कर्म त्यागोनि झाला संन्यासी । ज्ञान ध्यान नाहीं मानसीं । अन्नालागीं स्वग्रामवासी । कुटीचक तयासी बोलिजे ॥ ७७ ॥ वार्धक्कीं कुटीचकाची परी । अग्निहोत्र स्त्रियेचा त्याग करी । परी शिखासूत्र न अव्हेरी । गायत्रीमंत्रीं अधिकारू ॥ ७८ ॥ नित्य भिक्षा पुत्राचे घरीं । पर्णकुटी बांधी त्याचे द्वारीं । मठिका सांडोनि न वचे दूरी । कुटीचक निर्धारीं या नांव ॥ ७९ ॥ शिखासूत्र त्यागोनि जाण । करूनि त्रिदंडाचें ग्रहण । केवळ करी कर्माचरण । ज्ञानाचें लक्षण जाणेना ॥ १८० ॥ नाहीं वैराग्य वरिष्ठ । न दिसे ज्ञाननिष्ठा श्रेष्ठ । अतिशयेंसीं जो कर्मिष्ठ । बहूदक ज्येष्ठ त्यासी म्हणती ॥ ८१ ॥ जो कां वैराग्याच्या निर्धारीं । ज्ञानसाधनार्थ विचारी । शिखासूत्रकर्मत्याग करी । आत्मचिंतनावरी निजनिष्ठा ॥ ८२ ॥ ऐसा जो त्यागविलास । या नांव विविदिषासंन्यास । ऐशिया निष्ठें वर्ते तो हंस । एक परमहंस हा म्हणती ॥ ८३ ॥ ऐक परमहंसाचें लक्षण । ज्ञानपरिपाकें परिपूर्ण । अतएव शांति वोळंगे आंगण । देखे तिन्ही गुण मिथ्यात्वें ॥ ८४ ॥ मिथ्या जाणे कर्माची वार्ता । आपुली देखे नित्य निष्कर्मता । कर्मक्रिया जे कर्तव्यता । ते प्रकृतीचे माथां प्रारब्धें ॥ ८५ ॥ ऐशिया स्थितीं सावकाश । त्या नांव जाण परमहंस । नाहीं मठ मठिका विलास । नित्य उदास निराश्रयी ॥ ८६ ॥ आतां हंसपरमहंसांचे धर्म । स्वयें सांगताहे पुरुषोत्तम । त्या धर्मांचें विशद वर्म । ऐक सुगम उद्धवा ॥ ८७ ॥**

---

साधक प्रपंचांतील कोणत्याच वस्तूचें स्मरणहि करीत नाहीं. ७४ त्रिदंडी व बहूदक यतीचें कर्म मीं तुला स्पष्ट करून सांगितलें; आतां हंस व परमहंस यांचें धर्म क्रमानें सांगतों, ते ऐक. ७५ संन्यास चार प्रकारचा आहे. हंस व परमहंस हे दोन, बहूदक व कुटीचक हे दुसरे दोन त्यांहून भिन्न मिळून चार प्रकार आहेत. ७६ जो कर्म सोडून संन्यासी होतो, पण मनांत ध्यान किंवा ज्ञानहि नाहीं, अन्नासाठीं आपल्या गांवांतच रहातो त्याला कुटीचक असें म्हणतात. ७७ किंवा जो म्हातारपणामुळें अग्निहोत्र व स्त्री यांचा त्याग करितो, परंतु यज्ञोपवीत व शिखा काढून टाकीत नाहीं, गायत्री मंत्र जपत असतो, ७८ नित्य पुत्राच्या घरीं भिक्षा मागतो, त्याच्याच दाराशीं पर्णकुटी बांधून रहातो व आपली कुटी सोडून कोठें दूर जात नाहीं, त्यालाहि कुटीचक म्हणतात. ७९ जो यज्ञोपवीत व शिखा यांचा त्याग करून कायिक, वाचिक व मानसिक अशा त्रिदंडांचें ग्रहण करितो, केवळ कर्माचरण करितो, पण ज्ञानाचें नांवहि नसते, १८० तीव्र वैराग्य नसतें, श्रेष्ठ ज्ञाननिष्ठा नसते, पण अतिशय कर्मठ मात्र असतो त्याला उत्तम बहूदक म्हणतात. ८१ जो पूर्ण विरक्तीनें युक्त होऊन ज्ञानसाधनाचाच विचार करीत असतो, शिखा, सूत्र, कर्म या सर्वांचा त्याग करितो आणि केवळ आत्मचिंतनांतच तत्पर होतो, ८२ असा जो त्यागाचा प्रकार त्याला विविदिषा-संन्यास म्ह० परमात्मतत्त्व जाणण्याच्या इच्छेनें केलेला सर्वस्वत्याग असें म्हणतात. अशा रीतीनें जो वागणारा तो हंस. यालाच कोणी परमहंसहि म्हणतात. ८३ आतां परमहंसाचें लक्षण ऐक. जो ज्ञानाच्या परिपाकानें परिपूर्ण असतो, ज्याच्या दारांत शान्ति राबत असते, जो सत्त्व-रज-तम हें तीन्ही गुण मिथ्या मानितो, ८४ कर्मगति मिथ्या समजतो, स्वतःचें कर्महि जो निष्कर्मच पहातो, कर्माची क्रिया व जें इतर कर्तव्य घडतें तें प्रारब्धाप्रमाणें घडतें असें समजून जो तें सर्व मायेच्या माथीं मारितो, ८५ अशा स्थितींत समाधान वृत्तीनें रहाणाराला परमहंस म्हणतात. त्याला मठ नाहीं, मठी नाहीं, तो सर्वांविषयीं उदास व कसलाहि आश्रय न करणारा असतो. ८६ आतां श्रीकृष्ण हंस व परमहंस यांचे धर्म सांगत आहे. तरी हे उद्धवा, त्या धर्मांचें स्पष्ट व सुगम वर्म ऐक. १८७.

ज्ञाननिष्ठो विरक्तो वा मद्भक्तो वाऽनपेक्षकः । सलिङ्गानाश्रमांस्त्यक्त्वा चरेदविधिगोचरः ॥ २८ ॥

विषयांची नावडे मातू । ज्ञानप्राप्तीलागीं उद्यतू । यापरी जो अतिविरक्तू । तो संन्यास बोलिजेतू मुख्यत्वें ॥ ८८ ॥ जो ज्ञाननिष्ठ अतिसंपन्न । सदा स्वरूपीं रंगलें मन । कदा न मोडे अनुसंधान । परमहंसासमान हा हंस ॥ ८९ ॥ ज्यासी करितां भगवद्भक्ती । अपेक्षामात्राची झाली शांती । मोक्षापेक्षा नुपजे चित्तीं । हे संन्यासपद्धती अतिश्रेष्ठ ॥ १९० ॥ ज्ञाननिष्ठ कां मद्भक्त । इहीं आश्रमधर्म दंडादियुक्त । त्याग करावा हृदयीं समस्त । बाह्य लोकरक्षार्थ राखावे ॥ ९१ ॥ येचि अर्थीचें निरूपण । पुढें सांगेल श्रीकृष्ण । प्रस्तुत त्यागाचें लक्षण । ऐकें संपूर्ण हरि बोले ॥ ९२ ॥ आश्रमधर्म समस्त करी । परी विधिकिंकरत्व तो न धरी । प्रतिबिंब कांपतां जळांतरीं । आपण बाहेरी कांपेना ॥ ९३ ॥ तेवीं स्वधर्मकर्तव्यता । करी परी नाहीं कर्मठता । आपुली कर्मातीतता । जाणे तत्त्वतां निजकर्मीं ॥ ९४ ॥ यापरी स्वधर्मकर्म करी । परी विधीचें भय तो न धरी । विधिनिषेध घालून तोडरीं । कर्मे करी अहैतुकें ॥ ९५ ॥ जो नातळे स्वाश्रमकर्मगती । दंडादिलिंग न धरी हातीं । ऐसिया सर्वत्यागाची स्थिती । पुढें श्रीपति सांगेल ॥ ९६ ॥ प्रस्तुत हेंचि निरूपण । लोकरक्षणार्थ लिंगधारण । अंतरीं जो निष्कर्म जाण । त्याचें लक्षण हरि बोले ॥ ९७ ॥

---

—याप्रमाणें बहूदकादि यतींचे धर्म सांगून परमहंसाचे धर्म पुढील साडेसहा श्लोकांनीं सांगतात—

विरक्तः ज्ञाननिष्ठः वा अनपेक्षकः वा मद्भक्तः–बाह्य विषयांविषयीं विरक्त मुमुक्षु होऊन ज्ञाननिष्ठ झालेला किंवा मोक्षाविषयींहि निरपेक्ष असलेला जो माझा भक्त, त्यानें, सलिङ्गान् आश्रमान् त्यक्त्वा अविधिगोचरः चरेत्--त्रिदंडादि चिन्हांसह असलेल्या आश्रमांचा व त्यांच्या धर्मांचा त्याग करून म्ह० त्यावरील आसक्ति सोडून विधीचा विषय न होतां संचार करावा. [ म्ह० यथोचित् धर्माचरण करावें असा याचा भावार्थ. येथें त्यांचा सर्वथा त्याग विवक्षित नाहीं. कारण पुनः त्याच्या धर्मांचें विधान केलें आहे. पुढच्या अध्यायांत कर्मयागी पुरुषाचें वर्णन करावयाचें आहे. तर मग पूर्वोक्त बहूदकादिकांहून त्यांच्यामध्यें विशेष कोणता ! तें ' अविधिगोचरः ' या पदानें सांगितलें आहे. म्ह० त्यानें विधीचा किंकर होऊं नये, हाच त्यांतील विशेष आहे. शौच, आचमन व स्नान यांच्या विधीनें प्रेरित होऊन करूं नये, हेंच पुढें स्पष्ट करतील. २८.

ज्याला विषयांची गोष्ट आवडत नाहीं व जो ज्ञानप्राप्तीसाठीं उत्सुक असतो अशा अति विरक्ताला मुख्यत्वेंकरून संन्यास म्हणतात. ८८ जो ज्ञाननिष्ठेंत संपन्न असतो, ज्याचें मन आत्मस्वरूपांत रंगलेलें असतें, ज्याचें आत्मचिंतन कधीं सुटत नाही, तो हंस परमहंसासारखाच होय. ८९ तो भगवद्भक्ति करीत असतां कसलीच इच्छा करीत नाहीं. मोक्षाची इच्छाहि त्याच्या मनांत उद्भवत नाहीं. ही सर्वांत श्रेष्ठ संन्यासपद्धति होय. १९० ज्ञाननिष्ठ किंवा माझा भक्त यांनीं दंडांनीं युक्त असलेल्या सर्व आश्रमधर्मांचा अंतःकरणांतून पूर्ण त्याग करावा व लोकसंग्रहासाठीं ते धर्म केवल बाह्यतः पाळावेत. ९१ या अर्थाचें निरूपण पुढें श्रीकृष्ण सांगणार आहे. प्रस्तुत त्यागाचें लक्षण हरि सविस्तर सांगत आहे. ९२ तो सगळे आश्रमधर्म पाळतो, पण शास्त्रविधीचा किंकर होत नाहीं. पाणी हालतांच त्यांतील प्रतिबिंब हालूं लागतें; पण त्यामुळें खरें बिंब कांहीं चंचल होत नाहीं. ९३ त्याप्रमाणें तो स्वधर्मानुसार वागतो, पण त्याला कर्मठपणा नाहीं. तो स्वकर्म करीत असतांहि आपली कर्मातीतता जाणतो. ९४ अशाप्रकारें तो स्वधर्मरूप कर्म आचरीत असतो; पण विधींचें भय बाळगीत नाहीं. तो विधि-निषेधांस पायांखालीं तुडवून हेतुरहित कर्में करीत असतो. ९५ तो आश्रम व कर्मगति यांस स्पर्शहि करीत नाहीं. दंड, कमंडलु इत्यादि व त्रिदंडादि बाह्यचिन्हें हातीं धरीत नाहीं. अशा सर्वत्यागाचें लक्षण श्रीकृष्ण पुढें सांगेल. ९६ आतां लोकसंग्रहासाठीं बाह्य चिन्हें धारण करून अंतःकरणांतून जो निष्काम असतो, त्याचें लक्षण श्रीकृष्ण सांगत आहे. १९७.

बुधो बालकवत्क्रीडेत्कुशलो जडवच्चरेत् । वदेदुन्मत्तवद्विद्वान् गोचर्यां नैगमश्चरेत् ॥ २९ ॥

**विवेकज्ञान शुद्ध आहे । परी बाळकाच्या परी पाहे । मानापमान सुखें साहे । सांडोनि सोये दहाभिमाना ॥ ९८ ॥ निजनैष्कर्म्यें अतिकुशल । परी कर्मजडाऐसा केवळ । कर्मं आचरे तो सकळ । कोठेंही विकळ दिसों नेदी ॥ ९९ ॥ जाणे धर्माधर्मलक्षण । सर्वार्थीं अतिसज्ञान । परी न करी प्रश्नसमाधान । अप्रामाणिक जाण स्वयें बोले ॥ २०० ॥ करितां प्रश्नसमाधान । लौकिकीं वाढेल सन्मान । यालागीं साक्षेपें जाण । उन्मत्त वचन स्वयें बोले ॥ १ ॥ वेदतत्त्वार्थे विहित जाणे । तें लौकिकीं नाहीं मिरवणें । सकळिकीं मूर्खचि म्हणणें । तैशीं पशुलक्षणें स्वयें दावी ॥ २ ॥ यालागीं वेदवादसंवाद । न करी वाद अतिवाद । येचि अर्थीं अतिविशद । स्वयें गोविंद सांगत ॥ ३ ॥**

वेदवादरतो न स्यान्न पाषण्डी न हैतुकः । शुष्कवादविवादे न कंचित्पक्षं समाश्रयेत् ॥ ३० ॥

**धरोनियां मीमांसकमत । कर्मकांडींचे शास्त्रार्थ । नानावादकर्मार्थ । न करी निश्चित निजबोधें ॥ ४ ॥ तार्किकाचे अतितर्क । तर्क वितर्क कुतर्क । हेही वाद करीना देख । निजात्मसुख जो जाणे ॥ ५ ॥ बाहेरीं ब्रह्मज्ञानें गर्जे तोंड । भीतरीं विषयवासना वितंड । ऐसे महावादी प्रचंड । अतर्क्य पाखंड त्या नांव ॥ ६ ॥ नसोनि ब्रह्मानुभव साचार । जो उच्छेदी निजाचार । तो केवळ पाखंडी नर । उदरंभर दुःशील ॥ ७ ॥ ऐशिया वादाचा विटाळ । ज्याचे वाचेसी नाहीं अळुमाळ । न लगे असत्याचा**

---

—त्यानें विधिकिंकर न होतां कसें आचरण करावें तें सांगतात—

**बुधः बालकवत् क्रीडेत्**—त्या विवेक्यानेंहि बालकाप्रमाणें मानापमानशून्य होऊन रहावें. **कुशलः जडवत् चरेत्**—निपुण असूनहि फलाभिसंधानशून्य होऊन त्यानें जडाप्रमाणें वागावें. **विद्वान् उन्मत्तवत् वदेत्**—पंडित असूनहि लोकानुरंजन सोडून उन्मत्ताप्रमाणें भाषण करावें. **नैगमः गोचर्यां चरेत्**—वेदार्थनिष्ठ असूनहि वृषभाप्रमाणें अनियत आचारवान् व्हावें. २९.

आत्मज्ञानी यती शुद्ध विवेकानें युक्त असला तरी बालकासारखी वृत्ति ठेवितो. तो देहाभिमान सोडून मानापमान सुखानें सहन करितो. ९८ तो आपल्या नैष्कर्म्यानें अति प्रवीण असतो. परंतु कर्मठासारखा कर्मं आचरीत असतो. कोठेंहि न्यून दिसूं देत नाहीं. ९९ तो धर्म-अधर्मांचें सर्व लक्षण जाणतो. सर्व अर्थ जाणण्यांत पटु असतो. परंतु त्याला जर कोणीं प्रश्न विचारिले, तर तो समाधानकारक उत्तर देत नाहीं. अज्ञ माणसासारखें कांहीं तरी प्रमाणरहित बोलतो. २०० आपण जर प्रश्नांचीं समर्पक उत्तरें देऊन शंकेचें समाधान केलें, तर आपला लौकिक वाढेल; यास्तव तो जाणून-बुजून कांहीं तरी वेड्यासारखें बोलत असतो. १ तो वेदाचा तत्त्वार्थ व विहित शास्त्रार्थ जाणत असतो; परंतु त्याला लौकिकांत मिरवणें आवडत नाहीं. सर्वांनीं आपल्याला मूर्ख समजावें, म्हणून तो पशुपक्ष्यांसारखा अज्ञपणा दाखवीत असतो. २ याच कारणानें तो कधीं वेदाविषयीं संवाद किंवा वाद-विवाद करीत नाहीं. हेंच आतां गोविंद स्पष्ट करून सांगत आहे. २०३.

**वेदवादरतः न स्यात्**—कर्मकांडाचें व्याख्यान करणें इत्यादिकांमध्यें आसक्त होऊं नये. **पाषण्डी न**—श्रुति-स्मृतिविरुद्ध धर्माचें अनुष्ठान करूं नये. **न हैतुकः**—केवल तर्कनिष्ठ होऊं नये. **शुष्कवादविवादे कंचित्पक्षं न समाश्रयेत्**—निष्प्रयोजन गोष्टींमध्यें कोणत्याहि पक्षाचा आश्रय करूं नये. ३०.

तो आत्मज्ञानानें युक्त असल्यामुळें मीमांसकाचें मत स्वीकारून यज्ञयागादि कर्मकांडाचा पुरस्कार करीत नाहीं. ४ किंवा कर्मांचें समर्थन करण्यासाठीं नाना प्रकारचे वाद व अनेक शास्त्रार्थांचा खल करीत नाहीं, किंवा तार्किकांचा पक्ष घेऊन अनेक तर्क, वितर्क, कुतर्क असे अतितर्क करीत नाहीं; तो केवल एक आत्मसुख जाणत असतो. ५ बाहेरून तोंडानें ब्रह्मज्ञानची मोठी गर्जना करावयाची व अंतःकरणांत प्रचंड विषयवासना ठेवावयाच्या; असे जे प्रचंड वाद करणारे महावादी असतात त्यांना पाखंड असें म्हणतात. ६ ब्रह्मसाक्षात्काराचें नांवहि नाहीं; पण आपल्या आचारांचा उच्छेद करून वागणारा जो पाखंडी मनुष्य तो पोटभरू दुर्जन होय. ७ ज्याच्या वाणीला

**समूळ मळ । तो नित्य निर्मळ निजबोधें ॥ ८ ॥ शुष्कवाद ज्या वृथा गोष्टी । त्यांतही वाग्वाद उठी । होय नव्हे कपाळपिटी । मिथ्या चावटी करीना ॥ ९ ॥ ऐशिया विवादाची कथा । दृष्टीं न पाहे निजज्ञाता । मा स्वयें करील ऐशा वार्ता । हें सर्वथा घडेना ॥ २१० ॥ होतां शास्त्रार्थमहावाद । देतां युक्तीचे प्रतिबाध । तेथ न करी पक्षपात । जाणे परी शब्द बोलेना ॥ ११ ॥ श्रुतिस्मृतींसीं विरुद्ध । होतां देखे अतिवाद । स्वयें जाणे शास्त्रार्थ शुद्ध । परी पक्षपात करीना ॥ १२ ॥ वाग्वादीं बोलतां जाण । दुखवेल पुढिलांचें मन । कां क्षोभेल स्वांतःकरण । यालागीं वचन बोलेना ॥ १३ ॥**

नोद्विजेत जनाद्धीरो जनं चोद्वेजयेन्न तु । अतिवादांस्तितिक्षेत नावमन्येत कंचन ॥ ३१ ॥

**जनापासोनि उद्वेगगती । ज्ञान न पवे सर्वथा चित्तीं । निंदा अवगणना अपमानिती । ते आत्मस्थिती स्वयें साहे ॥ १४ ॥ जन जे जे उपद्रव देती । ज्ञाता साहे ऐशिया रीतीं । मीचि आत्मा एक सर्व भूतीं । यालागीं खंती मानीना ॥ १५ ॥ आपुलिया अवयवविकारता । उद्वेग न पवे निज-चित्ता । तेवीं सर्वांभूतीं एकात्मता । जाणून तत्त्वतां उबगू न मनीं ॥ १६ ॥ तैसेंचि ज्याचिया स्थिती । भूतें उद्वेग न मानिती । ज्याचिया निजाचारगती । सुखी होती जीवमात्र ॥ १७ ॥ सर्व भूतीं भगवंत आहे । म्हणे त्यासी उपद्रव होये । यालागीं वागवितां हातपाये । सावध राहे निजदृष्टीं ॥ १८ ॥ थोर देतां आरोळी । म्हणे दचकेल वनमाळी । कां नेटें भवंडितां जपमाळी । देवाचे कपाळीं म्हणे लागे ॥ १९ ॥ यालागीं करचरणांच्या चेष्टा । आवरोनियां निजात्मनिष्ठा । भूतीं लागों नेदी म्हटा । म्हणे वैकुंठा उपद्रव लागे ॥ २२० ॥ ऐसऐसिया निजात्मगती । उद्वेग उपजों नेदी भूतीं । तेथ**

---

असल्या वादानें यत्किंचित्‌हि विटाळ होत नाहीं व ज्याला असल्याचा मल कधीं स्पर्शहि करीत नाहीं, तो आत्मज्ञानानें नित्य निर्मल असतो. ८ निरर्थक व पोकळ बडबड करून तो वाणी शिणवीत नाहीं व डोकेंफोड करीत नाहीं. व्यर्थ भाकडकथा सांगत नाहीं. ९ तो अशा शुष्कवादाकडे कधीं नजरहि टाकीत नाहीं; मग तो स्वतः त्या गोष्टी करील हें कसें संभवतें !२१० शास्त्रार्थाविषयीं कडाक्याचे वाद चालत असतां व युक्तीनें प्रतिपक्षाचें खंडन चाललें असतां तो तटस्थ रहातो. कोणत्याच पक्षाचें समर्थन करीत नाहीं. तो मनांत सर्व जाणतो, पण बोलत नाहीं. ११ श्रुति-स्मृतींच्या विरुद्ध जोराचा वाद चाललेला तो पहातो व स्वतः खरा शास्त्रार्थहि जाणतो; पण कोणत्याच पक्षाला मिळत नाहीं. १२ या वाद-विवादांत बोललें असतां एकाचा पक्ष घेतल्यास दुसऱ्याचें मन दुखावेल किंवा आपल्या अंतःकरणाचा क्षोभ होईल या भीतीनें तो मौन स्वीकारितो व एक शब्दहि बोलत नाहीं. २१३.

**धीरः जनात् न उद्विजेत-धीर यतीनें लोकांपासून उद्विग्न होऊं नये. जनं च न तु उद्वेजयेत्—आणि लोकांना केव्हाहि उद्विग्न करूं नये. अतिवादान् तितिक्षेत—लोकांचीं दुरुत्तरें सहन करावीं. कंचन न अवमन्येत-कोणाचाहि अवमान करूं नये. ३१.**

अशा लोकांपासून ज्ञान तर प्राप्त होत नाहींच, पण उलट मनाला उद्वेग मात्र होतो. शिवाय कोणी निंदा तर कोणी अपमान करितात. परंतु आत्मज्ञानी तें सर्व सहन करितो. १४ लोक जेवढा उपद्रव देतील तेवढा ज्ञानी सहन करितो. 'सर्व प्राण्यांच्या हृदयांत मीच एक आत्मा भरून राहिलों आहें' असें समजून तो त्याचा खेद मानीत नाहीं. १५ आपल्या शरीरांतील इंद्रियांकडून प्रमाद घडला असतां मन जसें त्याचा खेद मानीत नाहीं, त्याप्रमाणें योगी सर्व भूतांमध्यें एकच आत्मा आहे, असें जाणून खिन्न होत नाहीं. १६ त्याच्यापासून इतर प्राण्यांना उपसर्ग पोंचत नाहीं. उलट त्याच्या वागणुकीनें सगळे प्राणिमात्र सुखी होतात. १७ सर्व भूतांत ईश्वर आहे, त्यांस पिडा होऊं नये म्हणून हात-पाय हलवितें वेळींहि तो आत्मदृष्टीनें मोठा सावधपणा ठेवितो. १८ मोठ्यानें आरोळी मारिल्यास श्रीहरि दचकेल; किंवा जपमाळ सारखी फिरवीत बसल्यास देवाच्या कपाळाशीं कटकट होईल, असें त्याला वाटत असतें. १९ म्हणून तो आपल्या हातांपायांनीं होणाऱ्या चेष्टा आंवरून केवळ आत्मनिष्ठ होऊन रहातो. वैकुंठाधिपतीला उपद्रव होईल, म्हणून प्राण्यांना मुळींच त्रास होऊं देत नाहीं. २२० ज्याची आत्मनिष्ठा इतकी वाढलेली असते व जो प्राण्यांच्या मनाला

**वाग्वादाची गती । कैशा रीतीं संभवे ॥ २१ ॥ सर्वभूतीं भूतात्मा ईश्वर । यालागीं उंचें न बोले उत्तर । तेथ अतिवाद्यासी समोर । सर्वथा अधर उचलीना ॥ २२ ॥ पडल्या जीवसंकट प्राणांतीं । अपमान न करवे कोणे व्यक्ती । अपमानीना भूताकृती । सर्वांभूतीं हरि देखे ॥ २३ ॥ जनास्तव उद्वेगता । कदाकाळीं न पवे ज्ञाता । ज्ञात्यापासोनि उद्वेगता । नव्हे सर्वथा जनासी ॥ २४ ॥ ऐशी निजात्मस्थिती साचार । तो कोणासीं न करी वैर । येचि अर्थी शारंगधर । विशद उत्तर सांगत ॥ २५ ॥**

देहमुद्दिश्य पशुवद्वैरं कुर्यान्न केनचित् । एक एव परो ह्यात्मा भूतेष्वात्मन्यवस्थितः ॥ ३२ ॥
यथेन्दुरुदपात्रेषु भूतान्येकात्मकानि च । अलब्ध्वा न विषीदेत काले कालेऽशनं क्वचित् ।
लब्ध्वा न हृष्येद्धृतिमानुभयं दैवतन्त्रितम् ॥ ३३ ॥

**केवळ पशूचियापरी । होऊनियां देह अहंकारी । कोणासीं वैर न करी । तेही परी परियेसी ॥ २६ ॥ प्रकृति पर चिदात्मा आहे । तोचि सर्वांभूतीं भूतात्मा पाहें । मजमाजींही तोचि राहे । ऐशी सर्व भूतीं वाहे । एकात्मता जो ॥ २७ ॥ त्यासी कोण आप्त कोण इतर । कोणासीं करावें वैर । सर्वभूतीं मीचि साचार । निरंतर निजात्मा ॥ २८ ॥ एक आत्मा सर्व भूतांत । येचि अर्थीचा दृष्टांत । स्वयें सांगे श्रीकृष्णनाथ । श्रोता सावचित उद्धव ॥ २९ ॥**

**सहस्र घटीं भरल्या जळ । बिंबे एकचि चंद्रमंडळ । तेवीं निजात्मा एक केवळ । भूतीं सकळ भूतात्मा ॥ २३० ॥ देखसी भूताकृति भिन्ना । त्याही परमकारणीं अभिन्ना । जेवीं अळंकारीं सुवर्णा ।**

---

यत्किंचितूहि दुःख देत नाहीं, तो वाद-विवादांत लक्ष घालील हें कसें संभवतें! २१ सर्व प्राण्यांच्या हृदयांत असलेला आत्मा ईश्वरच आहे, असें जाणून जो कोणाला कठोर शब्दानें उत्तर करीत नाहीं व अतिवाद्याच्या पुढें ओंठहि हलवीत नाहीं. २२ त्याच्यावर प्राणान्ताचा प्रसंग आला, जीवावर बेतलें तरी तो कोणाहि व्यक्तीचा अपमान करीत नाहीं, किंवा कोणाच्या कृतीचा अवमान करीत नाहीं. तो सर्व भूतांत हरि पहात असतो. २३ लोकांच्या कृतीनें तो कधीं उद्विग्न होत नाहीं किंवा त्याच्यापासून लोकांना उद्वेग होत नाहीं. २४ (सु. गी. १२-१५ पृ. २३९) अशा आत्मज्ञानामुळें तो कोणाबरोबरहि वैर करीत नाहीं. आतां श्रीकृष्ण याविषयीं सविस्तर सांगत आहे. २२५.

देहं उद्दिश्य पशुवत् केनचित् **वैरं न कुर्यात्**–स्वदेहाला उद्देशून पशूप्रमाणें कोणाशीं वैर करूं नये, यथा उदपात्रेषु इंदुः तथा हि एकः एव परः आत्मा भूतेषु आत्मनि अवस्थितः–ज्याप्रमाणें जलामध्यें चंद्र त्याप्रमाणें एकच परमात्मा सर्व भूतांतील आत्म्यामध्यें अवस्थित आहे. [ आत्मदृष्ट्या वैराचें कांहीं कारण नाहीं, असें 'एक एव' इत्यादि भागानें सांगितलें. आतां देहदृष्ट्याहि वैराचें कारण नाहीं असें सांगतात– ] **भूतानि च एकात्मकानि**–आणि देहहि कारणरूपानें एकात्मरूप आहेत, **क्वचित् काले काले अशनं अलब्ध्वा न विषीदेत**–कदाचित् भोजनाच्यावेळीं अन्न जरी न मिळालें तरी खिन्न होऊं नये. **धृतिमान् लब्ध्वा न हृष्येत्**–आणि धीर यतीनें इष्टान्न मिळालें तर हृष्ट होऊं नये. **उभयं दैवतंत्रितं**–कारण अन्न मिळणें किंवा न मिळणें हीं दोन्हीं दैवाधीन आहेत. ३२-३३.

केवल पशूप्रमाणें देहाभिमानी होऊन योगी कोणाबरोबरहि वैर करीत नाहीं. तोहि प्रकार आतां ऐक. २६ प्रकृतीहून पलीकडे असलेला जो चिदात्मा, तोच सर्व भूतांच्या शरीरांत आहे व माझ्या देहांतहि तोच आहे, अशी एकात्मता जो सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं ठेवितो, २७ त्याला आप्त कोण व परकें कोण! सर्व भूतांत मीच निरंतर आत्मस्वरूपानें रहात आहें, असें मानल्यावर मग तो वैर तरी कोणाशीं करणार! २८ आतां सर्व भूतांत एकच आत्मा आहे, याविषयीं श्रीकृष्णनाथ दृष्टान्त सांगणार आहे व सावधान चित्तानें ऐकणारा उद्धव श्रोता आहे. २२९.

पाण्यानें भरलेल्या हजारों घागरींमध्यें जशी एकाच चंद्राचीं अनेक प्रतिबिंबें पडत असतात, तसा आत्मा केवळ एकच असून तोच सर्व भूतांच्या शरीरांत जीवरूपानें भासतो; २३० सर्व प्राणिमात्रांचीं शरीरें जरी भिन्न-भिन्न

**आकारींही जाण। भिन्नत्व नाहीं ॥ ३१ ॥ जेवीं मृत्तिकेचीं गोकुळें केलीं । नानाकारीं पूज्य झालीं । परी ते मृत्तिकाचि संचली । तेवीं भूतें भासलीं भगवंतीं ॥ ३२ ॥ कां विणोनियां सुतें सुत । शेला परकाळा पातळ म्हणत । तैशी वस्तूचि वस्तुत्वें येथ । साकार भासत भवरूपें ॥ ३३ ॥ एवं साकार निराकार । उभयतां ब्रह्मचि साचार । ऐसा ज्याचा ज्ञाननिर्धार । त्याचा आहार तूं ऐक ॥ ३४ ॥ आहार न मिळे जिये काळीं । दुःखी नव्हे तिये वेळीं । अन्नालागीं न तळमळी । धारणाबळी बलिष्ठ ॥ ३५ ॥ आहार मिळाल्या उत्तम । हरिखेजेना मनोधर्म । दैवाधीन जाणे वर्म । निजकर्मप्राप्तीसी ॥ ३६ ॥ एवं प्राप्ताप्राप्ताची कथा । जाणे दैवाधीन तत्त्वतां । यालागीं हर्षविषादता । त्याचे चित्ता स्पर्शेना ॥ ३७ ॥ दैवाधीन प्राप्ती प्राणियांसी । ऐसें सत्य कळलें त्यासी । तैं भिक्षेसी कां हिंडणें म्हणसी । तेंचि हृषीकेशी सांगत ॥ ३८ ॥**

आहारार्थं समीहेत युक्तं तत्प्राणधारणम् । तत्त्वं विमृश्यते तेन तद्विज्ञाय विमुच्यते ॥ ३४ ॥

**पाळावया आश्रमधर्मासी । अवश्य हिंडावें भिक्षेसी । मधुकरी संन्याशांसी स्वधर्मासी अतिविहित ॥ ३९ ॥ साधकां तरी आहारार्थ । अवश्य हिंडावें लागे येथ । आहारेंवीण त्यांचें चित्त । विक्षेपभूत हों पाहे ॥ २४० ॥ तिहीं रसासक्ति सांडून । भिक्षेसी करावा प्रयत्न । आहारेंवीण त्यांचें मन । अतिक्षीण सर्वार्थीं ॥ ४१ ॥ साधकांसी आहारेंवीण । न संभवे श्रवण मनन । न करवे ध्यान चिंतन । अनुसंधान राहेना ॥ ४२ ॥ संन्याशांसी ध्यान न घडे । तैं आश्रमधर्माचें तारूं बुडे । यालागी भिक्षेसीं रोकडें । हिंडणें घडे हितार्थ ॥ ४३ ॥ मिळावें मिष्टान्न गोड । हें सांडोनि रसनाचाड । करावें भिक्षेचें कोड ।**

---

भासत असलीं तरी तींहि मूळ मायेमध्यें एकरूपच आहेत. ज्याप्रमाणें अलंकाराच्या आकारामुळें सोन्यामध्यें भेद होत नाहीं, ३१ किंवा मातीचीं गोकुळें केलीं व तीं निरनिराळ्या आकारामुळें पूज्य झालीं तरी तीं सर्व मातीचींच बनविलेलीं असतात. त्याप्रमाणें भगवंतामध्येंच सर्व भूतें भासतात; ३२ किंवा सुतांत सूत विणून त्याचें वस्त्र बनलें म्हणजे मग त्याला शेला, पागोटें, पातळ असें म्हणतात. त्याप्रमाणें ब्रह्मच आपल्या आत्मस्वरूपांत असतें, तें संसाररूपानें साकार भासतें. ३३ तेव्हां साकार व निराकार दोन्हीं वास्तविक ब्रह्मच आहे, असा ज्याचा ज्ञाननिश्चय असतो, त्याचा आहार कसा असतो, तें सांगतों, ऐक. ३४ अशा आत्मज्ञानी योग्याला खावयाला जरी कांहीं मिळालें नाहीं, तरी तो त्यावेळीं दुःखी होत नाहीं. तो ध्यानानें दृढ झालेल्या बुद्धीसामर्थ्यानें भुकेनें तळमळत नाहीं. ३५ किंवा उत्तम आहार मिळाला तरी त्याच्या मनाला हर्ष होत नाहीं. आपल्या कर्माप्रमाणें सर्व गोष्टी दैवाधीन आहेत, हें वर्म तो जाणतो. ३६ याप्रमाणें प्राप्ति व अप्राप्ति दैवाधीन आहे हें तत्त्वतः जाणून त्याविषयीं हर्ष किंवा विषाद त्याच्या मनाला स्पर्शहि करीत नाहीं. ३७ ' प्राण्यांना अन्नादिकांची प्राप्ति होणें दैवाधीन आहे, हें तत्त्व त्याला कळलें असतां तो भिक्षेसाठीं कां हिंडतो ! ' असें जर म्हणशील तर त्याचेंहि उत्तर श्रीकृष्ण सांगत आहे. २३८.

—तर मग भिक्षेसाठींहि प्रयत्न करावयास नको, असें म्हणशील तर सांगतों—

**आहारार्थं समीहेत**–केवल आहारासाठीं यत्न करावाच. **तत्प्राणधारणं युक्तं**–कारण त्याच्या प्राणाचें धारण होणें सर्वथा युक्त आहे. **तेन तत्त्वं विमृश्यते**–त्या प्राणधारणेच्या योगानें तत्त्वाचा विचार केला जातो. **तद्विज्ञाय विमुच्यते**–व तें जाणून मुक्त होतो. ३४.

यतीनें आश्रमधर्म पाळण्यासाठीं भिक्षा मागण्यास अवश्य हिंडावें. कारण संन्याशाच्या स्वधर्मास मधुकरी अत्यंत विहित आहे. ३९ साधकालाहि आहारासाठीं अवश्य हिंडावें लागतें. कारण आहारावांचून त्याचें मन अस्थिर होऊं लागतें. २४० त्यानें अन्नरसांतील आसक्ति सोडून भिक्षा मिळविण्याचा प्रयत्न करावा. कारण आहारावांचून त्याचें मन दुर्बल होईल. ४१ साधकाला आहारावांचून श्रवण, मनन, ध्यान चिंतन कांहीं करण्याचें सामर्थ्य रहात नाहीं व चित्ताची एकाग्रताहि होत नाहीं. ४२ संन्याशानें जर ध्यान केलें नाहीं, तर त्याचें आश्रमधर्मरूपी तारूं बुडून जाईल. यास्तव त्यानें आपल्या हितास्तव भिक्षेसाठीं अवश्य हिंडावें. ४३ गोड मिष्टान्नाची भिक्षा मिळावी, असे जिभेचे लाड

**परमार्थ दृढ साधावा ॥ ४४ ॥ आहार घेतलिया जाण । साधकांसी घडे साधन । साधन करितां प्रकट ज्ञान । ज्ञानास्तव जाण निजमोक्ष लाभे ॥ ४५ ॥ सर्वथा न वांछावें मिष्टान्न । तरी भिक्षा मागावी कोण । ऐसें कांहीं कल्पील मन । तेंचि श्रीकृष्ण सांगत ॥ ४६ ॥**

यदृच्छयोपपन्नान्नमद्याच्छ्रेष्ठमुताऽपरम् । यथा वासस्तथा शय्यां प्राप्तं प्राप्तं भजेन्मुनिः ॥ ३५ ॥

**सहज भिक्षेसी आलें जाण । शुष्क अथवा मिष्टान्न । तेणें करावें प्राणधारण । रसनालालन सांडोनी ॥ ४७ ॥ निद्रालस्याचें न ये प्रस्थान । तैसें करावें प्राणधारण । दृढ ठसावे आसनध्यान । युक्ताहार जाण या नांव ॥ ४८ ॥ वल्कल अथवा अजिन । नवें अथवा वस्त्र जीर्ण । सहजें प्राप्त झाल्या जाण । करीं प्रावरण यथासुखें ॥ ४९ ॥ कंथा हो कां मृदु आस्तरण । तृणशय्या कां भूमिशयन । स्वभावें प्राप्त जाल्या जाण । तेथही शयन करी मुनी ॥ २५० ॥ मी एक भोक्ता शयनकर्ता । हेंही नाहीं त्यासी अहंता । स्नानादि कर्मीं तत्त्वतां । त्याची निरभिमानता हरि सांगे ॥ ५१ ॥**

शौचमाचमनं स्नानं न तु चोदनया चरेत् । अन्यांश्च नियमान् ज्ञानी यथाऽहं लीलयेश्वरः ॥ ३६ ॥

**आचमन स्नान शौचाचार । करितां नव्हे विधिकिंकर । कर्माभिमानाचा मोडला थार । जैसा मी अवतार तैसा तो ॥ ५२ ॥ जैसा मी लीलावतार धरीं । अलिप्तपणें कर्मे करीं । तैसीचि जाण योग्याची परी । सर्व कर्मचारी अलिप्त ॥ ५३ ॥ ज्यासी विधीचें भय नाहीं पोटीं । तो कर्मे करावया कदा नुठी । तेचिविखींची विशद गोठी । कृष्ण जगजेठी सांगत ॥ ५४ ॥**

---

न पुरवितां त्यानें भिक्षा मागावी आणि दृढ परमार्थ साधावा. ४४ साधकानें आहार केला कीं, त्याच्या हातून साधन घडतें, साधनानें ज्ञान प्रकट होतें आणि ज्ञानानें मोक्षप्राप्ति होते. ४५ ‘ मिष्टान्नाची जर मुळींच इच्छा करावयाची नाहीं, तर मग भिक्षा तरी कसली मागावी ! ’ असा जर कोणाच्या मनांत विकल्प येईल तर श्रीकृष्ण त्याचेंहि निरसन करीत आहे. २४६.

—तर मग मिष्टान्नादिकांचें ग्रहण करूं नयेच कीं काय ! नाहीं, तसा माझा आशय नाहीं—

**यदृच्छयोपपन्नान्नं श्रेष्ठं उत अपरं अद्यात्**—न मागतां जें उत्तम किंवा अधम अन्न प्राप्त होईल, तें खावें. **तथा वासः तथा शय्यां**—तशींच वस्त्रें व तशीच शय्या, **मुनिः प्राप्तं प्राप्तं भजेत्**—तात्पर्य यतीनें प्रसंगीं जे प्राप्त होईल त्याचा उपयोग करावा. ३५.

भिक्षेमध्यें जें कांहीं सरस किंवा नीरस भिक्षान्न मिळेल, तें जिभेच्या आवडीची उपेक्षा करून सेवन करावें व त्यावर जिवंत रहावें. ४७ निद्रा व आळस यांचा ताबा न बसेल अशा बेतानें आहार करून प्राण धारण करावेत व आसनावर बसून दृढ ध्यान करावें. यालाच युक्ताहार म्ह० नियमित भोजन म्हणतात. ४८ वल्कल किंवा मृगचर्म, जुनें किंवा नवें वस्त्र, सहज जें कांहीं प्राप्त होईल त्यानें देह झांकावा. ४९ गोधडी असो किंवा मऊ बिछाना असो, सहज वेळेवर जें मिळेल त्यावर मुनि सुखानें निजतो. २५० मी भोक्ता किंवा शयन करणारा असा अभिमान त्याला नसतो. स्नानादि कर्मांतहि त्याची निरभिमानवृत्ति कशी असते, तेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. २५१.

**यथा अहं ईश्वरः लीलया करोमि तथा ज्ञानी शौचं आचमनं स्नानं अन्यान् च नियमान् चरेत् न चोदनया**—ज्याप्रमाणें मी ईश्वर लीलेनें सर्व करितों, त्याचप्रमाणें ज्ञाननिष्ठ पुरुषानें शौच, आचमन, स्नान व अन्य नियम अनासक्त राहून करावें. विधिकिंकर होऊन ते करूं नयेत. [ कारण विधिकिंकर होऊन स्नानादि करणें ज्ञाननिष्ठेच्या विरुद्ध आहे. ] ३६.

आचमन, स्नान किंवा प्रातर्विधि करितेवेळीं ज्ञानी विधि-निषेधांचा दास बनत नाहीं. तो कर्माभिमानाचा आधारच मोडून टाकितो. मी जसा अवतार तसाच तो. ५२ मी जसा लीलेनें अवतार घेऊन अलिप्तपणें कर्मे करितों, तसाच योगीहि अलिप्त राहून सर्व कर्मे आचरितो. ५३ त्याच्या मनांत विधीचें भय नसतें. म्हणून तो कर्मे करावयास कधींहि उठत नाहीं. त्याविषयींचें गूढ जगजेठी श्रीकृष्ण स्पष्ट करून सांगत आहे. २५४

न हि तस्य विकल्पाख्या या च मद्वीक्षया हता । आदेहान्तात्क्वचिख्यातिस्ततः संपद्यते मया ॥ ३७ ॥

**कर्म करणें न करणें । ऐंशिया संदेहाचें ठाणें । पळालें माझेनि दर्शनें । संकल्पाचें जिणें निमालें ॥ ५५ ॥ संकल्पू निमतांचि पोटीं । विराली लिंगदेहाची गांठी । भेदाची हारपली त्रिपुटी । मी परमात्मा दिठीं देखतां ॥ ५६ ॥ ज्यासी नाहीं भेदाचें भान । त्याचे देहाचें भरणपोषण । स्नानभोजन शयन । गमनागमन केवीं घडे ॥ ५७ ॥ जो जिणोनियां विकल्पभ्रांती । त्रिशुद्धीं मिसळला अद्वैतीं । त्याचे देहाची स्थितिगती । प्रारब्धाहातीं निश्चित ॥ ५८ ॥ वृक्ष समूळ उपडलिया पाहें । परी सार्द्रता वृक्षीं राहे । तांबूल खाऊनियां जाये । तरी अधरीं राहे सुरंगता ॥ ५९ ॥ हो कां कन्यादान केल्या पाहें । वरू कन्याही घेऊनि जाये । तरी उगा मान उरला राहे । रुसणें फुगणें न जाय देहांत॥ २६० ॥ तैसा अभिमानाचेनि सळें । मी कर्मकर्ता म्हणवी बळें । ते अहंता निमे ज्ञानप्रबळें । तरी शरीर चळें प्रारब्धें ॥ ६१ ॥ कुलाल दंड भांडें घेऊनि जाये । पूर्वभवंडीं चक्र भंवत राहे । तेवीं अभिमान गेलिया पाहें । देह वर्तताहे प्रारब्धें ॥ ६२ ॥ त्या देहाचें भरणपोषण । प्रारब्धचि करितें जाण । ज्ञात्यासी प्रपंचाचें भान । सत्यत्वें जाण असेना ॥ ६३ ॥ जैशी मिथ्या छाया देहापाशीं । तैसा देह दिसे सज्ञानासी । यालागीं देहबुद्धी त्यासी । सत्यत्वेंसीं उपजेना ॥ ६४ ॥ छाया सुखासनामाजीं बैसे । कां विष्ठेवरी पडली दिसे । त्या छायेचे अभिमानवशें । सुखदुःख नसे पुरुषासी ॥६५॥ तेवीं देहाची ख्यातिविपत्ती । बाधीना सज्ञानाचे स्थितीं । प्रारब्धक्षयाचे अंतीं । विदेह पावती कैवल्य ॥ ६६ ॥ जैशी जळाची लहरी । निश्चळ होय सागरीं ।**

---

—ज्ञाननिष्ठाला विधिकिंकरतेचा अभाव कां ? उत्तर—

**तस्य हि विकल्पाख्या न**—कारण त्याला भेदप्रतीति येते. [ अहोपण, ज्ञाननिष्ठाला सुद्धां भेदप्रतीति होते ] **या च मद्वीक्षया हता**—त्याला ज्ञान होण्यापूर्वीं भेदप्रतीति होत होती, पण ती आतां माझ्या ज्ञानानें बाधित झाली आहे. [ अहोपण, ती पुनः दिसते; तेव्हां बाधित कशी होईल ? ] **आदेहान्तात् क्वचित् ख्यातिः**—देहाचा अंत होईपर्यंत केव्हां केव्हां ती बाधित प्रतितीच होते. **ततः मया संपद्यते**—त्यामुळें तो मद्रूप होतो. ३७.

माझ्या दर्शनानेंच ‘ कर्म करावें कीं न करावें ’ या संशयाचें ठाणें उठून जातें व संकल्पाचें अस्तित्व संपतें. ५५ संकल्प जागच्याजागीं जिरला म्हणजे वासनांचें बंधन, अशी जी शरीराची ग्रंथि ती तुटते व मज परमात्म्याला दृष्टीनें पहातांच भेदाची त्रिपुटी नाहींशीं होते. ५६ ज्याच्या मनाला भेदाचेंच भान नाहीं, त्याच्या देहाचें पोषण, स्नान, भोजन, शयन, जाणें-येणें हें कसें घडणार ! ५७ ज्यानें विकल्पभ्रांतीला जिंकिलें तो अद्वैतांत सर्वस्वी मिळून गेला; मग त्याच्या देहाची हाल-चाल केवळ प्रारब्धानुसार होत असते. ५८ वृक्ष जरी मुळापासून उपटून टाकिला, तरी त्यांत ओलावा रहातोच; किंवा विडा खाऊन संपल्यावरहि ओंठावर त्याचा तांबडा रंग असतोच; ५९ किंवा कन्यादान होऊन त्या कन्येला जांवई घरीं घेऊन गेला, तरीहि पाठीमागें मान-पान चालतच असतात. देहांतील रुसणें फुगणें कांहीं जात नाहीं. २६० त्याप्रमाणें अभिमानाच्या मिषानें तो स्वतःला बळेंच कर्मकर्ता म्हणवून घेत असतो, तो अहंकार ज्ञानाच्या सामर्थ्यानें नष्ट होतो; परंतु त्याचा देह मात्र प्रारब्धानुसार वागत असतो. ६१ घट तयार झाला म्हणजे कुंभार चक्रावरून त्याला काढून घेतो व त्या चक्रांतील दांडीहि काढितो; परंतु पूर्वी मिळालेली गति संपेपर्यंत तें चक्र जसें फिरतच असतें तसें हें शरीर अभिमान गेल्यावरहि प्रारब्धाप्रमाणें वागत असतें. ६२ त्या शरीराचें रक्षण व पोषण प्रारब्धच करीत असतें. कारण आत्मज्ञान्याला प्रपंचाचें भान खरोखरच नसतें. ६३ शरीराबरोबर असणारी त्याची छाया जशी मिथ्या, तसाच ज्ञानी माणसाला देह मिथ्या दिसतो. त्यामुळें त्याच्या मनांत देहाभिमान सत्यत्वानें उपजत नाहीं. ६४ आपली छाया सुखासनावर बसलेली दिसली किंवा घाणींत पडलेली दिसली तर छायेवर अभिमान ठेवून जसा कोणीहि मनुष्य त्याबद्दल सुख किंवा दुःख मानीत नाहीं, ६५ त्याप्रमाणें ज्ञानी पुरुषावर देहाच्या उत्कर्षअपकर्षापासून कांहीं परिणाम होत नाहीं. प्रारब्ध क्षीण झालें, म्हणजे तो देहाचा त्याग करून ब्रह्मस्वरूपाला प्राप्त होतो. ६६ समुद्रांतील पाण्याच्या लाटा जशा पाण्यांत लीन होतात, तसा ज्ञानी देहबुद्धींतून निघून मज शुद्ध परमात्म्यामध्यें

**तैसा ज्ञाता मजमाझारीं। विदेह करी समरसें ॥ ६७ ॥ उगम संगम प्रवाहगती। सरितेची नामरूप-ख्याती। जेवीं प्रळयोदकीं हारपती। तेवीं समरसती मजमाजीं ज्ञाते ॥ ६८ ॥ अपरोक्षसाक्षात्कार संन्यासी। त्याची स्थितिगति स्वधर्मेंसीं। उद्धवा सांगीतली तुजपाशीं। आतां मुमुक्षु संन्यासी ते ऐक ॥ ६९ ॥**

दुःखोदर्केषु कामेषु जातनिर्वेद आत्मवान्। अजिज्ञासितमद्धर्मो गुरुं मुनिमुपाव्रजेत् ॥ ३८ ॥

**शेंडा धरूनि समूळ। ज्याचें उत्तरोत्तर दुःख फळ। अतिबाधक विषयजाळ। त्यासी केवळ जो अनासक्त ॥ २७० ॥ माझे प्राप्तीलागीं चित्त। सदा ज्याचें आर्तभूत। स्वधर्मकर्मीं वर्तत। जो वेद-शास्त्रार्थ विवंची ॥ ७१ ॥ इहामुत्रभोगीं निश्चित। त्रासलें असे ज्याचें चित्त। ऐसा जो कां नित्य विरक्त। अतिविख्यात मुमुक्षू ॥ ७२ ॥ तेणें साधावया ब्रह्मज्ञान। तेचि साधनीं लावितां मन। स्वकर्म झालिया विलक्षण। आली नागवण प्रत्यवायाची ॥ ७३ ॥ तेणें कर्म संन्यासोनि जाण। करावें संन्यासग्रहण। सद्गुरूसी रिघावें शरण। तेणें ब्रह्मज्ञानपरप्राप्ती ॥ ७४ ॥ एक केवळ भावार्थी। नेणे स्वधर्मकर्मगती। नेणे शास्त्रश्रवणव्युत्पत्ती। परी माझी प्रीती अनिवार ॥ ७५ ॥ तेणेंहि संन्यासूनि जाण। गुरूसी रिघावें शरण। त्यासीही गुरुकृपा जाण। ब्रह्मज्ञानअवाप्ती ॥ ७६ ॥ गुरु करावा अतिशांत। शास्त्रार्थपरमार्थपारंगत। त्याचे सेवेचा भावार्थ। स्वयें श्रीकृष्णनाथ सांगत ॥ ७७ ॥**

तावत्परिचरेद्भक्तः श्रद्धावाननसूयकः। यावद्ब्रह्म विजानीयान्मामेव गुरुमादृतः ॥ ३९ ॥

---

एकरूप होतो. ६७ नदीचे उगम, संगम, प्रवाह, नामें व रूपें हीं सर्व प्रलयकालच्या जलांत जशीं बुडून जातात, तसे ज्ञानी मजमध्यें समरस होतात. ६८ हे उद्धवा! याप्रमाणें अपरोक्ष आत्मसाक्षात्कार झालेल्या संन्याशांची स्थिति, त्यांचा स्वधर्म व त्यांची गति मीं तुला सांगितली. आतां मोक्षाची इच्छा करणारे संन्याशी कसे असतात, तें ऐक. २६९.

—याप्रमाणें विरक्त परोक्ष ज्ञानी पुरुषाचा संन्यास व धर्म सांगून केवळ विरक्त विविदिषूचे धर्म सांगतात—

**दुःखोदर्केषु कामेषु जातनिर्वेदः आत्मवान् अजिज्ञासितमद्धर्मः–**दुःख हें ज्याचें फळ आहे अशा कामाविषयीं विरक्त झालेल्या, अप्रमत्त, पण ज्यानें माझ्या प्राप्तीच्या साधनाचा विचार केलेला नाहीं अशा जिज्ञासूनें, **मुनिं गुरुं उपाव्रजेत्–**तत्त्वज्ञ गुरूला शरण जावें. ३८.

जो यती आरंभापासून अखेरपर्यंत वाढतें दुःख देणाऱ्या विषयांमध्यें मुळींच आसक्ति ठेवीत नाहीं, २७० ज्याचें मन माझ्या प्राप्तीसाठीं सर्वकाल उत्सुक असतें, जो आपल्या आश्रमधर्माप्रमाणें वागत असतो, शास्त्रार्थांचें विवेचन करितो, ७१ ऐहिक व पारलौकिक सुखाविषयीं ज्याचें मन खात्रीनें त्रासलेलें असतें, अशा नित्य विरक्त व अति प्रसिद्ध मुमुक्षूनें ७२ ब्रह्मज्ञान मिळविण्यासाठीं साधनांकडे मन लाविलें व तीं कर्में जर यथासंग झालीं नाहींत, तर त्याला दोष लागतो. ७३ यास्तव त्यानें विधिपूर्वक कर्म टाकून संन्यास घ्यावा व सद्गुरूला शरण जावें, म्हणजे ब्रह्मज्ञान व परब्रह्माची प्राप्ति होते. ७४ एखादा जो केवळ भावार्थी असतो, पण स्वधर्मकर्म, शास्त्रश्रवणाचा प्रकार इत्यादि कांहीं जाणत नाहीं, परंतु ज्याची माझ्यावर अत्यंत भक्ति असते, ७५ त्यानेंहि सर्वांचा त्याग करून गुरूला शरण जावें. त्यालाहि गुरुकृपा होतांच तत्काल ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होते. अतिशय शांत व परोक्ष आणि अपरोक्ष ज्ञानांत निष्णात असा गुरु करावा. त्याच्या सेवेचा प्रकार आतां श्रीकृष्ण सांगत आहे. २७७.

**यावत् ब्रह्म विजानीयात् तावत् भक्तः श्रद्धावान् अनसूयकः आदृतः मां एव गुरुं परिचरेत्–**मुमुक्षूनें जोंवर ब्रह्माचा साक्षात्कार होई तोंवर भक्तिमान्, श्रद्धावान्, असूयाशून्य व आदरवान् होऊन माझ्याच दृष्टीनें गुरूची उपासना करावी. ३९.

अचळ अमळ अविनाश । परात्परतर परेश । गुरु तो परब्रह्म ईश । हा दृढ विश्वास धरावा ॥ ७८ ॥ त्या विश्वासाच्या पडिपाडीं । नवल गुरुचरणीं आवडी । नित्य नूतन नवी गोडी । चढोवढी भजनार्थ ॥ ७९ ॥ ऐशिया भजनपरवडीं । हृदयीं श्रद्धा उथळे गाढी । गुरुआज्ञेची नुलंघी काडी । आळस तोडी समूळ ॥ २८० ॥ गुरुवाक्याचेनि श्रवणें । विकल्पाचें खत खाणणें । संकल्पासी सुळीं देणें । जीव घेणें अभिमाना ॥ ८१ ॥ तेथ असूया कैंची उठी । धाकेंचि निमाली उठाउठी । ऐशी गुरुचरणीं श्रद्धा मोठी । परब्रह्मदृष्टीं गुरु पाहे ॥ ८२ ॥ निर्गुण जो निर्विकारू । तोचि मूर्तिमंत माझा गुरू । करूनि अकर्ता ईश्वरू । तोचि साचारू गुरु माझा ॥ ८३ ॥ नित्य निर्विकल्प देख । ज्यासी म्हणती समाधिसुख । तें माझ्या गुरूचें चरणोदक । ऐशा भावें नेटक भावार्थी ॥ ८४ ॥ गुरुतें पाहतां ब्रह्मदृष्टीं । शिष्य ब्रह्मत्वें आला पुष्टी । ब्रह्मरूप देखे सृष्टी । निजऐक्य मिठी गुरुचरणीं ॥ ८५ ॥ ऐसें ब्रह्मरूपीं ऐक्य घडे । तैं गुरुसेवा करणें पडे । ऐक्य झाल्याही पुढें । सेवा न मोडे अखंडत्वें ॥ ८६ ॥ कापूर घातलिया जळीं । स्वयें विरोनि जळीं परमळीं । तेवीं अहं जाऊनि सेवा सकळी । सर्वी सर्वकाळीं गुरुचरणीं ॥ ८७ ॥ ऐशी अवस्था न येतां हाता । केवळ मुंडूनियां माथा । संन्यासीं म्हणवी पूज्यता । त्याची अनुचितता हरि बोले ॥ ८८ ॥ स्वयें संन्यास अंगीकारी । ब्रह्मसाक्षात्कार जो न करी । त्यालागीं स्वयें श्रीहरी । अतिधिक्कारीं निंदित ॥ ८९ ॥

यस्त्वसंयतषड्वर्गः प्रचण्डेन्द्रियसारथिः । ज्ञानवैराग्यरहितस्त्रिदण्डमुपजीवति ॥ ४० ॥
सुरानात्मानमात्मस्थं निह्नुते मां च धर्महा । अविपक्वकषायोऽस्मादमुष्माच्च विहीयते ॥ ४१ ॥

---

आपला गुरु स्थिर, निर्मल, शाश्वत, प्रकृतीच्या पलीकडे असलेला परमेश्वर, परब्रह्म ईश्वर आहे, असा दृढविश्वास धरावा. ७८ अशा दृढविश्वासामुळें गुरुचरणांची अपूर्व आवड उत्पन्न होते व भजनांत नित्य नवीन अधिकाधिक गोडी चढते. ७९ अशा भजनाची आवड उत्पन्न झाली म्हणजे अंतःकरणांत गाढ श्रद्धा उद्भवते. तो गुरूची आज्ञा रेसभरहि उल्लंघन करीत नाहीं व आळसाला समूळ घालवितो. २८० गुरुवाक्याच्या श्रवणानें विकल्पाचें खत खणतो, संकल्पाला सुळीं देतो व अभिमानाला ठार मारितो. ८१ तेव्हां त्याच्यापुढें मत्सर कसला उठणार ! तो भीतीनें जागच्याजागींच नाहींसा होतो. अशी त्याची गुरुचरणांवर मोठी श्रद्धा असते. तो गुरूला परब्रह्मदृष्टीनेंच पहात असतो. ८२ माझा गुरु निर्गुण, निर्विकार व मूर्तिमंत ब्रह्मच आहे. जो करून अकर्ता असणारा ईश्वर तोच माझा गुरु आहे. ८३ ज्याला नित्य, निर्विकल्प समाधिसुख म्हणतात, तेंच माझ्या गुरूचें चरणतीर्थ आहे, अशा दृढ श्रद्धेनें ८४ गुरूकडे ब्रह्मदृष्टीनें पाहिलें असतां तो शिष्य ब्रह्मत्वानें पूर्ण संपन्न होतो. तो सर्व सृष्टीला ब्रह्मरूपच पाहूं लागतो आणि ब्रह्माशीं तादात्म्य पावून गुरुचरणाला मिठी घालितो. ८५ असें ब्रह्मरूपाचें ऐक्य होईपर्यंत गुरुसेवा करावी लागते व ब्रह्माशीं एकरूप झाल्यावरहि गुरुसेवेंत खंड पडत नाहीं. ८६ कापूर पाण्यांत घातला असतां तो स्वतः त्यांत विरघळतो व पाण्याला सुवासिक करितो. त्याचप्रमाणें शिष्याचा अहंकार जाऊन त्याची सगळी सेवा सर्वकाळ गुरुचरणीच समर्पण होते. ८७ अशा अवस्थेला प्राप्त न होतां जे केवळ मस्तकाचें मुंडन करून, संन्याशी बनून, स्वतःची महती वाढवितात, त्याचा अनुचितपणा हरी सांगत आहे. ८८ ब्रह्मसाक्षात्कारावांचून जो स्वतः संन्यास घेतो, त्याचा अतिशय धिक्कार करून हरि स्वतः त्याची निंदा करीत आहे. २८९.

—पुढील दोन श्लोकांनीं अनधिकारी संन्याशाची निंदा करितात—

**यः तु असंयतषड्वर्गः**–पण ज्यानें पांच ज्ञानेंद्रियें व मन यांना जिंकलेलें नसतें, **प्रचण्डेन्द्रियसारथिः**–ज्याचा इंद्रियसारथि म्ह० बुद्धि विषयासक्त असते, **ज्ञानवैराग्यरहितः**–जो ज्ञान-वैराग्यरहित असतो, **त्रिदण्डं उपजीवति**–जो संन्यासावर उपजीविका करितो, **सुरान् आत्मानं आत्मस्थं मां च निह्नुते**–जो देवता, स्वात्मा व बुद्धिस्थ मी ईश्वर यांच्याशीं प्रतारणा करितो, **अविपक्वकषायः**–ज्याचे रागादि मल निवृत्त झालेले नसतात, **सः धर्महा अस्मात् अमुष्मात् च विहीयते**–तो धर्माचा घात करणारा भ्रष्ट संन्याशी या लोकापासून परलोकापासून च्युत होतो. ४०-४१.

नाहीं वैराग्याची स्थिती । नसतां विषयविरक्ती । देखोदेखी संन्यास घेती । केवळ वृत्ति अन्नार्थ ॥ २९० ॥ संन्यास नेघतां पूर्वदृष्टीं । जें वैराग्य होतें पोटीं । तें संन्यास घेतल्यापाठीं । उठाउठी पळालें ॥ ९१ ॥ ज्ञानेंद्रियें पांच सहावें मन । हेचि अरिषड्वर्ग जाण । यांचें न करितां निर्दळण । संन्यासपण तो विटंबू ॥ ९२ ॥ अवैराग्यें सकाम मन । तेणें विषयाकुलित बुद्धि जाण । नाहीं ज्ञान ध्यान साधन । दंडग्रहण उदरार्थ ॥ ९३ ॥ नुपजेच अनुताप जाण । न करीच श्रवण मनन । आदरें न साधीच साधन । त्यासी ब्रह्मज्ञान नव्हे ॥९४॥ त्याचा व्यर्थ संन्यास जाण । व्यर्थ त्याचें दंड मुंडण । व्यर्थ काषायवस्त्रग्रहण । वेषधारण नटाचें ॥ ९५ ॥ संन्यास घेतलियापाठीं । काम उचंबळे उठाउठीं । क्रोधलोभांची धुमे आगिठी । चौगुण पोटीं अभिमान ॥ ९६ ॥ आसक्ति अधिकाधिक उठी । सदा ग्रामणी चावटी । करणें पैशुन्याच्या गोष्टी । दंड कासोटी दंभार्थ ॥ ९७ ॥ अनधिकारीं दंडग्रहण । तेणें संन्यासरूपें जाण । केवळ आली नागवण । आपल्या आपण नाडिलें ॥ ९८ ॥ नाडिले यज्ञाधिकारी सुरगण । नाडिले स्वधाधिकारी पितृगुण । नाडिले ऋषि भूतगण । बळितर्पण उरकेना ॥ ९९ ॥ जीवरूपें मी परमात्मा आपण । त्या मज हृदयस्था ठकिलें जाण । जीवोद्धारीं संन्यासग्रहण । तेंचि दृढबंधन मज झालें ॥ ३०० ॥ संन्यासग्रहण दृढबंधन । व्हावया कोण कारण । तेचि विषयींचें निरूपण । स्वयें नारायण बोलिला ॥ १ ॥ पूर्वश्लोकींचे तिनी चरण । तेथील हें निरूपण । श्रोतां द्यावें अवधान । झणें विलक्षण कोणी म्हणे ॥२ ॥

निह्नुते मां च धर्महा । अविपक्वकषायोऽस्मादमुष्माच्च विहीयते ॥

करोनियां संन्यासग्रहण । न करी ज्ञानध्यानसाधन । न करी प्रणवउच्चारण । अविरक्त जाण विषयार्थी ॥ ३ ॥ तेणें दारादिअभिलषण । करिती द्रव्याचें संरक्षण । आणि गोदानादि ग्रहण । पचन

---

अंगीं वैराग्य बाणलेलें नाहीं, विषयांची विरक्ति आलेली नाहीं अशा स्थितींत जे लोक एकाएकीं केवळ लहरीनें संन्यास घेतात, त्यांची वृत्ति निव्वळ पोट भरण्यासाठीं असते. २९० त्यांना संन्यास घेण्यापूर्वी जें क्षणिक वैराग्य आलेलें असतें तेंहि संन्यास घेतांच तत्काल पळून जातें. ९१ पांच ज्ञानेंद्रियें व सहावें मन हेच सहा मोठे रिपु आहेत. त्यांना जिंकिल्यावांचून संन्यास घेणें म्हणजे केवळ विटंबना आहे. ९२ विरक्ति नसल्यामुळें मन सकाम असतें. त्यायोगें बुद्धि विषयभोगाच्या इच्छेनें व्यापिलेली असते. अशा साधकाला ध्यान नाहीं, ज्ञान नाहीं व साधनहि नाहीं, तो केवळ पोट भरण्यासाठीं दंडग्रहण करून संन्याशी होतो. ९३ ज्याच्या मनांत वैराग्य उत्पन्न होत नाही, तो कधीं श्रवणमनन करीत नाहीं व आदरानें कधीं साधनें आचरीत नाहीं, त्याला ब्रह्मज्ञान होत नाहीं. ९४ त्याचा संन्यास व्यर्थ आहे त्याचें शरीर, दंड, मुंडन व त्याचीं भगवीं वस्त्रें हीं सर्व व्यर्थ होत. त्याचा हा बाह्य वेष नटाच्या वेषासारखाच समजावा. ९५ त्यानें संन्यास घेतल्यावर लागलाच काम उठतो, क्रोध-लोभांची धुनी धुमसत असते आणि मनांतील अभिमान चौपट वाढतो. ९६ आसक्ति अधिकाधिक जडते. तो सर्वकाळ गांवकुटाळी व टारगेपणाच्या ग्राम्य गप्पा किंवा निर्दयतेच्या गोष्टी करीत बसतो. दंड व कौपीन केवल दंभासाठीं धारण करीत असतो. ९७ असा संन्याशी दंड धारण करण्यास खरोखर अनधिकारी होय. तो संन्यासाच्या निमित्तानें आपली आपणच फसवणूक करून स्वतःलाच नागवितो; ९८ यज्ञाचे अधिकारी जे देव व स्वधेचे अधिकारी जे पितृगण यांना टाळितो; ऋषि, भूतगण यांचेंहि बळितर्पण करीत नाहीं. ९९ जीवरूपानें हृदयांत राहणारा मी जो परमात्मा त्या मलाहि तो फसवितो. त्यामुळें जीवाच्या उद्धारासाठीं असलेलें संन्यासग्रहण त्याच्या दृढबंधाला मात्र कारण होतें. ३०० संन्यासग्रहणच दृढबंधनाचें कारण कसें ? याचेंच निरूपण आतां स्वतः नारायण करीत आहे. १ हें बोलणें विलक्षण आहे, असें जर कोणी म्हणेल तर मागल्या श्लोकांतील ( ४०-४१ ) तीन चरणांच्या अर्थाचेंच हें निरूपण आहे. यास्तव श्रोत्यांनीं सावधान चित्तानें ऐकावें. ३०२.

जो संन्यासग्रहण करून ज्ञान व ध्यान यांचें साधन किंवा ओंकाराचा जप यांतील कांहीं करीत नाहीं, त्याला विषयांची विरक्ति आलेली नसते; ३ त्यामुळें तो स्त्री-पुत्रादिकांवर आसक्ति ठेवून द्रव्याचा संग्रह करीत

पाचन करविती ॥ ४ ॥ मठाधिपत्याचिये उपाधीं । धनधान्यस्नेहसमृद्धीं । नाना वाढवितां उपाधी । जीवात्मा त्रिशुद्धी नाडिला ॥ ५ ॥ ऐसें करितां अधर्मपण । जीवासी लागलें दृढबंधन । इहलोकपरलोकसाधन । त्या नरदेहा जाण नाडला ॥ ६ ॥ चौऱ्यायशीं लक्ष योनींप्रती । जैं असंख्य फेरे होती । तैं नरदेहाची प्राप्ती । अवचटे पावती सभाग्य ॥ ७ ॥ त्या नरदेहासी जाण । स्वयें नागवला आपण । करितां अधर्माचरण । नरक दारुण संन्याशा ॥ ८ ॥ ज्या नांव गा आश्रम चौथा । जो देव म्हणे माझे माथां । तेथेंही अधर्म करितां । नरकपाता पाविजे ॥ ९ ॥ ज्या नरकाचे ठायीं । कोटि वर्षें बुडतां पाहीं । ठावचि न लगे कांहीं । तैसे ठायीं बुडाले ॥ ३१० ॥ मुख्य चतुर्थाश्रमीं हे स्थिती । तैं इतर आश्रमां कैंची गती । त्यालागीं आश्रमधर्मयुक्ती । स्वयें श्रीपती सांगत ॥ ११ ॥

भिक्षोर्धर्मः शमोऽहिंसा तप इज्या वनौकसः । गृहिणे भूतरक्षेज्या द्विजस्याऽचार्यसेवनम् ॥ ४२ ॥

संन्याशासी मुख्य शम । सबाह्य इंद्रियनेम । अहिंसा त्याचा स्वधर्म । हा परमधर्म संन्याशासी । वानप्रस्थाचा स्वधर्म । तपप्राधान्य मंत्र होम । आतां गृहस्थाचा नेम । तिहीं आश्रमां विश्राम दीनदाता ॥ १३ ॥ गृहस्था मुख्य अग्निहोत्र जाण । संन्यासीब्रह्मचाऱ्यां द्यावें अन्न । करावें भूतसंरक्षण । तेंही लक्षण अवधारीं ॥ १४ ॥ असिलेनि सामर्थ्यें जाण । अन्न धन वस्त्र जीवन । तृण पर्ण निवासस्थान । देऊनि दीन रक्षावें ॥ १५ ॥ ब्रह्मचाऱ्याचे स्वधर्मीं जाण । श्रद्धायुक्त गुरुसेवन । एवं आश्रमधर्मलक्षण । मुख्यत्वें हें जाण उद्धवा ॥ १६ ॥ गृहस्थाश्रमीं जो धर्म आहे । तो इतर आश्रमीं करूं नये । इतराश्रमींचा धर्म पाहें । गृहस्थाश्रमीं होये करणीय ॥ १७ ॥

---

असतो. गोप्रदानादिक स्वीकारून यज्ञ-याग करवीत असतो. मठाधिपतित्वाच्या निमित्तानें धन-धान्यादिकांचा लोभ वाढतो व अनेक उपाधि त्याच्या मागें लागतात; त्यामुळें तो बिचारा जीवात्मा खरोखर नाडला जातो. ५ अशा अधर्माचरणानें जीवाला दृढबंधन प्राप्त होतें व इहलोक आणि परलोक यांच्या साधनाला हा नरदेह पारखा होतो. ६ चौऱ्यायशी लक्ष योनींमध्यें जीवाचे जे असंख्य फेरे होतात, त्यांत एखादे वेळीं मोठ्या भाग्यानें अकस्मात् मनुष्यजन्म प्राप्त होतो. ७ असा मनुष्यजन्म आपणच अधर्माचरणानें वायां घालविणाऱ्या संन्याशाला दारुण नरकाची प्राप्ति होते. ८ ज्याला चतुर्थाश्रम म्हणतात व देव जो आश्रम 'माझें मस्तकच आहे' असें म्हणतो, त्या आश्रमांत अधर्म केला असतां नरकांत पडतात. ९ ज्या नरकांत कोट्यवधि वर्षें बुडलें तरी त्याचा थांग लागत नाहीं, अशा जागीं ते बुडतात. ३१० मुख्य जो चतुर्थाश्रम त्याची ही स्थिति, मग इतर आश्रमांची काय कथा! यास्तव श्रीकृष्ण आश्रमधर्मांच्या युक्ति सांगत आहे. ३११.

— चार आश्रमांचे प्रधानधर्म सांगतात —

शमः अहिंसा भिक्षोः धर्मः—शम व अहिंसा हे यतीचे प्रधानधर्म आहेत, तपः इज्या वनौकसः—तप व याग हे वानप्रस्थाचे धर्म आहेत. भूतरक्षा इज्या गृहिणः—सर्व भूतांचें रक्षण व याग हे गृहस्थाचे धर्म, आचार्यसेवनं द्विजस्य—गुरूची शुश्रुषा हे ब्रह्मचारी द्विजाचे धर्म आहेत. ४२.

संन्याशाला शांति, अंतर्बाह्य इंद्रियांचा निग्रह व अहिंसा हा मुख्य स्वधर्म आहे. हाच संन्याशाचा परम धर्म आहे. १२ ज्यांत तप मुख्य आहे असा मंत्रहोम, हा वानप्रस्थाचा स्वधर्म आहे. तीन्ही आश्रमांची विश्रांति व दीनाचा आश्रय होणें हा गृहस्थाचा धर्म आहे. १३ गृहस्थानें मुख्यतः अग्निहोत्र करावें. संन्यासि-ब्रह्मचाऱ्यांस अन्न द्यावें व प्राण्यांचें संरक्षण करावें. त्याचेंहि लक्षण आतां सांगतों. ऐक. १४ गृहस्थानें याचकाला यथाशक्ती अन्न जल, वस्त्र, द्रव्य, रहाण्याला जागा व पशु-पक्ष्यांना तृण, पानें व निवारा देऊन दीन प्राण्यांचें रक्षण करावें. १५ ब्रह्मचाऱ्यानें गुरूची श्रद्धायुक्त सेवा करून आपला स्वधर्म पाळावा. याप्रमाणें आश्रमधर्मांचीं हीं मुख्य लक्षणें आहेत. हे उद्धवा! १६ गृहस्थाश्रमाचे धर्म इतर आश्रमांत आचरूं नयेत, परंतु गृहस्थाश्रमांत मात्र इतरांचेंहि धर्म आचरणें अयोग्य नाहीं. ३१७.

ब्रह्मचर्यं तपः शौचं सन्तोषो भूतसौहृदम् । गृहस्थस्याप्यृतौ गन्तुः सर्वेषां मदुपासनम् ॥ ४३ ॥

**गृहस्थें व्हावया निष्पाप । ठाके तों करावा जप तप । उभय शौचांचें स्वरूप । अतिसाटोप करावें ॥ १८ ॥ पोटींची सांडूनि कुसमुस । यथालाभें अतिसंतोष । परोपकारी अतिहव्यास । सुहृद सर्वांसी स्वात्मत्वें ॥ १९ ॥ गृहस्थीं ब्रह्मचर्यलक्षण । ऋतुकाळीं स्वदाराभिगमन । मुख्यत्वें करावें माझें भजन । हा स्वधर्म जाण सर्वांचा ॥ ३२० ॥ सर्व आश्रम सर्व वर्ण । त्यांसी हाचि स्वधर्म जाण । सांडूनि विकल्पाचें भान । माझें भजन करावें ॥ २१ ॥ करितां स्वधर्में माझी भक्ती । भक्तांसी होय जे प्राप्ती । तेचि सांगताहे श्रीपती । उद्धवाप्रती स्वानंदें ॥ २२ ॥**

इति मां यः स्वधर्मेण भजन्नित्यमनन्यभाक । सर्वभूतेषु मद्भावो मद्भक्तिं विन्दतेऽचिरात् ॥ ४४ ॥

**सर्व भावें अनन्यगतीं । करितां स्वधर्में माझी भक्ती । माझा भावो सर्वांभूतीं । शीघ्रगती उल्हासे ॥ २३ ॥ मद्भावो जोडल्या सर्व भूतीं । तेणें प्रकटे माझी चौथी भक्ती । जिच्या पायीं चारी मुक्ती । सदा लागती स्वानंदें ॥ २४ ॥ अनिवार अन्यगती । सर्वस्वें ज्यासी माझी प्रीती । तो लाहे माझी परमभक्ती । जेथोनि कल्पांतीं च्यवेना ॥ २५ ॥**

भक्त्योद्धवानपायिन्या सर्वलोकमहेश्वरम् । सर्वोत्पत्त्यप्ययं ब्रह्म कारणं मोपयाति सः ॥ ४५ ॥

---

—गृहस्थाला इतर आश्रमांचे काहीं धर्म सांगतात—

**ऋतौ गंतुः गृहस्थस्य अपि ब्रह्मचर्यं तपः शौचं सन्तोषः भूतसौहृदं**–ऋतुकालीं स्त्रीगमन करणाऱ्या गृहस्थाचें ब्रह्मचर्य लुप्त होत नाहीं. अर्थात् अशाप्रकारचें ब्रह्मचर्य, तप व रागादिराहित्य हें शौच, संतोष व भूतप्रीति हे गृहस्थाचे धर्म आहेत. **सर्वेषां मदुपासनं**–आणि माझें उपासन हें सर्वांनाच विहित आहे. ४३.

गृहस्थानें निष्पाप होण्यासाठीं शक्य तेवढें जप-तप आचरावें. शरीराची व अंतःकरणाची अशा दोन्ही शुद्धि करण्यांत दक्ष रहावें. १८ मनांतील तळमळ टाकून मिळेल त्यांतच समाधान मानावें सर्वांवर सुहृद्भावानें परोपकार करण्याची आवड ठेवावी. १९ ऋतुकाळींच फक्त स्वस्त्रीगमन करणें हें गृहस्थाश्रमांतील ब्रह्मचर्य आहे. मुख्यत्वें माझें भजन करणें हाच सर्वांचा स्वधर्म आहे. ३२० सर्व आश्रम व सर्व वर्ण यांनीं विषयांचें भान टाकून माझें भजन करावें, हाच त्यांचा स्वधर्म आहे. २१ अशा स्वधर्मांत राहून माझी भक्ति केली असतां माझ्या भक्तांना जी प्राप्ति होते, तीच आतां श्रीकृष्ण उद्धवाला आनंदानें सांगत आहे. ३२२.

—अशाप्रकारच्या वर्णाश्रमाचें फल सांगतात—

इति **सर्वभूतेषु मद्भावः यः स्वधर्मेण अनन्यभाक् मां नित्यं भजन् अचिरात् मद्भक्तिं विंदते**–याप्रमाणें सर्व भूतांमध्यें माझी भावना करणारा जो स्वधर्मानें अनन्य चित्तानें सतत माझें भजन करितो त्याला माझी दृढ भक्ति सत्वर प्राप्त होते. ४४.

सर्व भावानें एकनिष्ठ होऊन, स्वधर्मांत राहून माझी भक्ति केली असतां सर्व प्राणिमात्र मद्रूप असल्याची भावना सत्वर दृढ २३ होते व सर्व भूतें मद्रूपच आहेत ही भावना दृढ झाली म्हणजे माझी चौथी ज्ञानभक्ति प्रकट होते व चारी मुक्ति आनंदानें तिच्या पायीं लागतात. २४ ज्याची माझ्यावर अन्यय भक्ति असते व ज्याची सर्वस्वी माझ्यावरच प्रीति असते त्याला माझी परम भक्ति लाधते व तो तिच्यापासून केव्हांहि च्युत होत नाहीं. ३२५.

—मग पुढें काय काय होतें ? उत्तर—

**उद्धव**–हे उद्धवा ! **सः अनपायिन्या भक्त्या सर्वोत्पत्त्यप्ययं सर्वलोकमहेश्वरं मा ब्रह्म कारणं उपयाति**–तो अपायशून्य भक्तीनें सर्वांची उत्पत्ति व लय ज्याच्यापासून होतात त्यामुळेंच सर्व भूतांचें कारण, सर्व लोकांचा महेश्वर ब्रह्मरूप वैकुंठवासी अशा मला प्राप्त होतो. [ किंवा 'ब्रह्मकारणं' असें एक पद घेऊन वेदाचें कारण मला अशा सामीप्यानें प्राप्त होतो, असा अर्थ करावा.] ४५.

सकळ सच्चिदानन्दस्थिती । जीमाजीं सांपडें मी सहजगती । ती नांव माझी परम भक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २६ ॥ विपरीत संसाराचें भान । दिसे दृश्यविलक्षण । तेथ सदा स्वानन्दपूर्ण । ते चौथी जाण भक्ति माझी ॥ २७ ॥ जेथ देव भक्त एक होती । एकपणें भजनस्थिती । ऐशी साधकांसी प्राप्ती । ते परम भक्ती उद्धवा ॥ २८ ॥ माझी प्रकटल्या परम भक्ती । पतन नाहीं प्रळयांतीं । साधक मद्रूपा येती । स्वरूपस्थितिसमसाम्यें ॥ २९ ॥ त्या स्वरूपाचें लक्षण । सांगताहे श्रीनारायण । उत्पत्ति स्थिति निधन । कारणाकारण जो चिदात्मा ॥ ३३० ॥ जो सकळ नियंता ईश्वरू । जो विश्वात्मा विश्वंभरू । जो उपनिषदांचें सारू । जो महेश्वरू जगाचा ॥ ३१ ॥ त्या पदाची पदप्राप्ती । भक्त पावले परम भक्तीं । तेंचि पुढती उद्धवाप्रती । स्वानंदें श्रीपती सांगत ॥ ३२ ॥

इति स्वधर्मनिर्णिक्तसत्त्वो निर्ज्ञातमद्गतिः । ज्ञानविज्ञानसम्पन्नो न चिरात्समुपैति माम् ॥ ४६ ॥

ऐशिया पदाची पदप्राप्ती । साधक पावले स्वधर्मस्थितीं । ते स्वधर्मप्रयोजनगती । यथानिगुतीं सांगत ॥ ३३ ॥ करितां स्वधर्मानुष्ठान । रजतमें नाशती जाण । शुद्धत्व अंतःकरण । तेथ माझें ज्ञान प्रकाशे ॥ ३४ ॥ प्रकाशल्या माझें ज्ञान । तेणें उल्हासे माझें भजन । भजनास्तव मन । विकल्पपण पैं त्यागी ॥ ३५ ॥ विकल्पत्यागाचिये गतीं । वैराग्यें उचंबळे विरक्ती । भासे परमात्मा सर्व भूतीं । तेणें परम भक्ती उल्हासे ॥ ३६ ॥ उल्हासल्या परम भक्ती । भक्तांसी माझी स्वरूपप्राप्ती । तेचि स्वरूपाची स्वरूपस्थिती । यथानिगुतीं सांगत ॥ ३७ ॥ परमात्मा परंज्योती । परब्रह्म परंज्ञप्ती । परात्परतर प्रकृतीं । परावर जो ॥ ३८ ॥ अज अव्यय अक्षर । अरूप अनाम अगोत्र । अलक्ष्य अतर्क्य अपार । परात्पर-

---

हे उद्धवा ! जी पूर्ण सच्चिदानंदमय स्थिति, तिच्यामध्यें मी सहज सांपडतों. तिचेंच नांव माझी परम भक्ति. २६ ज्या अवस्थेंत प्रपंचाचें स्वरूप उलटें दिसूं लागतें, दृश्य विलक्षण दिसतें व सर्वकाल परिपूर्ण स्वानंदाचा अनुभव येतो ती माझी चौथी भक्ति जाण. २७ हे उद्धवा ! ज्यांत देव आणि भक्त एक होतात व ऐक्यरूपानें भजन घडतें, अशी जी साधकाची प्राप्ति तीच माझी परम भक्ति समज. २८ अशी माझी परम भक्ति प्रकट झाली असतां, प्रलय-कालींहि तेथून पडण्याची भीति नाहीं. कारण साधक मद्रूपाला प्राप्त होऊन स्वरूपस्थितीमध्यें समसाम्यानें रहातो. २९ उत्पत्ति-स्थिति-लय यांच्या कारणाचें कारण असलेला जो चिदात्मा त्याच्या स्वरूपाचें लक्षण श्रीनारायण आतां सांगत आहे. ३३० जो सर्वांचा नियंता ईश्वर, जो विश्वात्मा, विश्वंभर, जो वेदान्तशास्त्राचें सार व जो सगळ्या जगाचा मुख्य स्वामी ३१ त्याच्या पदाची प्राप्ति भक्तांना केवळ एकनिष्ठ भक्तीनेंच झाली आहे. तोच वृत्तांत श्रीकृष्ण उद्धवाला पुढें आनंदानें सांगत आहे. ३३२.

—त्यामुळें तो मुक्तच होय, असें आतां सांगतात—

इति स्वधर्मनिर्णिक्तसत्त्वः निर्ज्ञातमद्गतिः ज्ञान-विज्ञानसंपन्नः न चिरात् मां समुपैति—आशाप्रकारच्या स्वधर्मानें ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे, ज्यानें माझें ऐश्वर्य पूर्णपणें जाणलें आहे व जो ज्ञान-विज्ञानानें संपन्न आहे, तो मला सत्वर प्राप्त होतो. ४६.

साधक स्वधर्माचरणानें अशा श्रेष्ठ पदाला प्राप्त होतात. त्याच स्वधर्माचें चांगल्याप्रकारें प्रयोजन सांगतात, ३३ स्वधर्माचरण केलें असतां रज व तम या गुणांचा नाश होतो. अंतःकरण शुद्ध झालें कीं, त्यांत माझें ज्ञान प्रकट होतें. ३४ माझें ज्ञान प्रकाशित झालें कीं, माझ्या भजनाचा उल्हास वाढतो व भजनाच्या योगानें मन विक-ल्पाचा त्याग करितें. ३५ विकल्प टाकिला कीं, विरक्ति उचंबळते. सर्व भूतांमध्यें परमात्मा भासूं लागतो व त्यामुळें परम भक्तीला ऊत येतो ३६ परम भक्तीला ऊत आला असतां भक्तांस माझी स्वरूपप्राप्ति होते. त्याच स्वरूपाचें यथार्थ लक्षण भगवान् सांगत आहे. ३७ जो परम तेजोमय परमात्मा, परब्रह्म, परमज्ञान, प्रकृतीहून अत्यंत परात्पर,

स्वरूप ॥ ३९ ॥ ऐशी निजस्वरूपीं निजप्राप्ती । भक्त पावले स्वरूपस्थिती । जेथूनि परतलिया श्रुती । नेति नेति निजनिष्ठा ॥ ३४० ॥ ऐसें मद्रूप पावल्यापाठीं । संसाराची काढिली कांटी । नांवरूपांची बुडाली गोठी । पडली तुटी जन्ममरणां ॥ ४१ ॥ एवं स्वधर्माचेनि धर्मवशें । मीतूंपणाचें नांवचि पुसे । मद्रूपाचें सामरस्यें । अनायासें मीचि जाहलों ॥ ४२ ॥ पूर्वी होतों मी जीव । आतां झालों सदाशिव । हाही बुडाला आठव । ऐसा माझा अनुभव मद्भक्तां ॥ ४३ ॥ शून्य पडिलें संसारस्थिती । तेथ कैंची पुनरावृत्ती । ऐशी मद्भक्तां माझी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४४ ॥ एवं स्वधर्मे मत्प्राप्ति जाण । तया स्वधर्माचें महिमान । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । सावधान परियेसा ॥ ४५ ॥

वर्णाश्रमवतां धर्म एष आचारलक्षणः स एव मद्भक्तियुतो निःश्रेयसकरः परः ॥ ४७ ॥

अनादि जो स्वधर्माचार । जो कां मोक्षकर साचार । तेणें स्वधर्मे सकाम नर । लोकांतर वांछिती ॥ ४६ ॥ झालिया लोकांतरप्राप्ती । तेथूनि होय पुनरावृत्ती । न करूनियां माझी भक्ती । स्वधर्म नाशिती सकाम ॥ ४७ ॥ ब्राह्मणा आला भद्रजाती । आम्हां न पोसवे निश्चितीं । मग तो देऊनियां घेती । वाहावया पोथी वृद्ध ढोर ॥ ४८ ॥ यापरी स्वधर्म जाण । उपेक्षिती गा ब्राह्मण । मग लोकांतरीं कोरान्न । मागवया कण धांवती ॥ ४९ ॥ घरीं आणोनि दिधली कामधेनू । आम्हां न पोसवे म्हणूनू । ताकासाठीं देती हेळसूनू । आली नागवणू ते नेणे ॥ ३५० ॥ तेवीं म्यां जाण गायत्रीमंत्र । दीधला ब्राह्मणांसी स्वतंत्र । तो उपेक्षूनियां मंत्रतंत्र । शूद्राचार आचरती ॥ ५१ ॥ सौर शाक्त गाणपत्यादि

---

पराहून भिन्न, ३८ अज, अव्यय, अक्षर, नाम-रूप-गोत्ररहित, अलक्ष्य, अतर्क्य, अपार, परात्पर स्वरूप, ३९ ज्याला जाणण्यास निघालेल्या श्रुतीहि 'नेति नेति' म्हणून परत फिरल्या, त्या परमपदाला माझे भक्त प्राप्त होतात. ३४० अशा मद्रूपास पोंचल्यावर संसाराचा प्रतिबंध निघून जातो, नांव-रूपाची गोष्टच बुडून जाते व जन्म-मरणाची ताटातूट होते. ४१ याप्रमाणें स्वधर्माच्या योगानें 'मी-तूं' पणाचें नांव नाहींसें होतें. मद्रूपाच्या साम्यत्वानें अनायासें मीच होतों. ४२ पहिल्यानें मी जीव होतों व आतां सदाशिव झालों. याचेंहि माझ्या भक्तांना स्मरण रहात नाहीं. असा माझ्या भक्तांना माझा अनुभव येतो. ४३ अशा रीतीनें संसारशून्य झाल्यावर मग पुनर्जन्म कोठचा ! उद्धवा, माझ्या भक्तांना अशी प्राप्ति होते. ४४ अशाप्रकारें ज्या स्वधर्मानें माझी प्राप्ति होते त्या स्वधर्माचा महिमा श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे, तो सावधान चित्तानें ऐक. ३४५.

—वरील उक्त अर्थच संक्षेपतः सांगतात—

एषः वर्णाश्रमवतां आचारलक्षणः धर्मः-हा जो आचाररूप, पितृलोक हें फल देणारा वर्णाश्रमवानांचा, धर्म, स एव मद्भक्तियुतः परः निःश्रेयसकरः-तोच माझ्या भक्तीनें युक्त म्ह० मदर्पण करून आचरिलेला धर्म श्रेष्ठ मोक्षसाधन होतो. ४७.

अति प्राचीन, मोक्ष देणारें जें स्वधर्माचरण, तें आचरून सकाम पुरुष स्वर्गादिकांची इच्छा करितात. ४६ स्वर्गादि लोक जरी प्राप्त झाले, तरी पुनः तेथून मृत्युलोकीं यावेंच लागतें. याप्रमाणें माझी भक्ति न केल्यानें सकाम लोक स्वधर्माचा नाश करितात. ४७ ब्राह्मणांना चांगला सुलक्षण हत्ती दान मिळाला असतां 'आम्हांला हा पोसवणार नाहीं' असें म्हणून त्यांनीं तो देऊन आपल्या पोथ्या वाहून नेण्यासाठीं जसा म्हातारा बैल घ्यावा, ४८ त्याप्रमाणें ते स्वधर्माची उपेक्षा करितात व मग स्वर्गांत कोरड्या भिक्षेचे कण मागावयास धांवतात; ४९ किंवा घरीं आणून दिलेली कामधेनु 'आम्हांला पोसवत नाहीं' असें म्हणून ताकाच्या मोबदल्यांत ती देऊन आपण आपलीच केवढी हानी करून घेतों हें जसें त्यांस कळत नाहीं, ३५० त्याचप्रमाणें मी ब्राह्मणांना दिलेल्या स्वतंत्र गायत्रीमंत्राची उपेक्षा करून ते मंत्र-तंत्र इत्यादिकांनीं शूद्राचा धर्म आचरितात. ५१ ब्राह्मण, सूर्योपासक, शाक्त,

जाण । नाना मंत्रदीक्षा घेती ब्राह्मण । परी गायत्रीचें अनुष्ठान । एकही जाण न करिती ॥ ५२ ॥ नाहीं गायत्रीचें अनुष्ठान । परी विपरीत झालें आन । गायत्रीचें श्रेय जाण । देती ब्राह्मण द्रव्यार्थू ॥ ५३ ॥ गायत्री-मंत्र असोनि घरीं । तिचा भावार्थ कोणी न धरी । दीक्षेलागीं मूर्खाचे द्वारीं । लोळिजे द्विजवरीं ऐसें झालें ॥ ५४ ॥ शस्त्रास्त्रीं रथसुदृढू । त्यावरी बैसविला भेडू । सांडूनि पळणें मानी सुरवाडू । न शके विभांडूं रणांगणीं ॥ ५५ ॥ तेवीं वेदरूप मी नारायण । ब्राह्मणहृदयीं असें जाण । त्याचें नेणोनि महिमान । वेदपारायण विकिती ॥ ५६ ॥ वांछूनियां स्वर्गफळ । नाना याग करिती प्रबळ । कामकल्पना केवळ । स्वधर्म विकळ पाडिती ॥ ५७ ॥ वेदीं प्रतिपाद्य कर्मफळ । तो वेदू मिथ्या नव्हे केवळ । तो वेदवाद समूळ । नेणोनि बरळ हें मानिती ॥ ५८ ॥ घ्यावया वोखदाची वाटी । माता साकर दे चिमुटी । तें फळ मुख्य नव्हे दृष्टी । जावया पोटींचा महारोगू ॥ ५९ ॥ तेवीं वेद बोले जें फळ । तें प्रवृत्तिरोचना केवळ । स्वधर्म विचारितां समूळ । चित्तमळक्षाळक ॥ ३६० ॥ स्वधर्म सांडूनि सर्वथा । सकाम कर्में करूं जातां । तेंही शिणल्यावेगळें तत्त्वतां । क्षुद्रकामता फळेना ॥ ६१ ॥ जेणें द्रव्यें अमृत ये हाता । तें वेंचूनि मद्य घेतां । अधर्म आणि उन्मत्तता । पिशाचता जग थुंकी ॥ ६२ ॥ स्वपतीसीं काम भोगितां । परलोक पावे पतिव्रता । तेचि परपुरुषासीं रमतां । अधःपाता नेतसे ॥ ६३ ॥ जिह्वा दुरुक्ती बोलतां । यमप्रहार वाजती माथां । तिणेंचि 'राम राम' म्हणतां । हरिभक्तां यम कांपे ॥ ६४ ॥ तेवीं पावोनि उत्तम जन्म । कर्म करूनि सकाम । भोगावें दुःख परम । मरण जन्म अनिवार ॥ ६५ ॥ तेणेंचि देहें स्वधर्म । करितां निरसे सकळ कर्म । निवारे मरणजन्म । बहुतां हें वर्म कळेना ॥ ६६ ॥ स्वधर्में घडे भगवद्भक्ती । ऐशी अतिगुह्य आहे व्युत्पत्ती । ते मी सांगेन तुजप्रती । यथानिगुतीं उद्धवा

---

गाणपत्य इत्यादि अनेक पंथांची दीक्षा घेतात. परंतु गायत्रीचें अनुष्ठान मात्र कोणी करीत नाहीं. ५२ जे गायत्रीचें अनुष्ठान तर करीत नाहींतच, पण त्याच्या विपरीत वागतात, ते ब्राह्मण गायत्रीमंत्राचें सर्व श्रेय द्रव्यासाठीं विकतात. ५३ गायत्री मंत्र घरांत असून त्याचा भावार्थ कोणी जाणत नाहीं व दीक्षेसाठीं विद्वान् ब्राह्मणहि मूर्खाच्या दारांत लोळत असतात, अशी स्थिति झाली आहे. ५४ शस्त्र-अस्त्रांनीं सज्ज केलेल्या मजबूत रथांत एखादा भित्रा नेऊन बसविला तर तो रणांगणांत जाऊन युद्ध करण्याऐवजीं रथ सोडून पळून जाण्यांतच जसें भूषण मानितो, ५५ त्याप्रमाणें ब्राह्मणांच्या हृदयांत असलेला जो मी वेदरूपी नारायण त्या माझा महिमा न जाणतां ते वेदपारायण विकतात. ५६ स्वर्गफलाच्या इच्छेनें ते अनेक प्रकारचे प्रचंड यज्ञ करितात व आपल्या लोभाच्या कल्पनेनें स्वधर्म बुडवितात. ५७ ज्या वेदांतच कर्मफलांचें प्रतिपादन केलें आहे तो वेद केवळ मिथ्या नव्हे; पण त्या वेदाचें सर्व प्रतिपादन न जाणतां तें वायफळ बडबड खरी समजतात. ५८ मुलानें वाटींतील औषध प्यावें म्हणून त्याची आई त्याला पहिल्यानें साखरेची चिमुट देत असते; परंतु तें कांहीं मुख्य फल नव्हे, त्याच्या पोटांतील महारोगाचा विकार नाहींसा व्हावा हा जसा मुख्य हेतु असतो, ५९ त्याचप्रमाणें वेदानें जें स्वर्गादि फल सांगितलें आहे, ते स्वधर्म आचरण्याकडे प्रवृत्ति व्हावी म्हणून रुचि उत्पन्न करणारें आहे. कारण स्वधर्माचरणानें चित्तशुद्धि होत असते. ३६० स्वधर्म सोडून सकाम कर्में करूं लागल्यास तीं कर्में करण्याची दगदग तेवढी पदरांत पडते. पण इष्ट फलाची सिद्धि होत नाहीं. ६१ जें द्रव्य खर्च केलें असतां अमृत मिळतें, तें द्रव्य जर मद्य विकत घेण्यांत खर्चिलें तर अधर्म, उन्मत्तपणा व पिशाचपणा पदरीं येतो. शिवाय जगांत 'छी-थू' होते ती वेगळीच. ६२ पतिव्रता स्त्री आपल्या पतीबरोबर रममाण झाल्यास स्वर्गी जाते; पण तीच जर परपुरुषाशीं संग करूं लागली तर तिचा अधःपात होतो. ६३ जिभेनें दुष्ट भाषण केल्यास यमाचे तडाखे सोसावे लागतात; पण त्याच जिभेनें 'राम, राम' असा उच्चार केल्यास त्या हरिभक्ताला यम चळचळां कांपतो. ६४ त्याप्रमाणें मनुष्यदेहासारख्या उत्तम जन्माला प्राप्त होऊन, सकाम कर्में केलीं असतां अनिवार्य जन्म-मरणाचें परम दुःख भोगावें लागतें. ६५ परंतु त्याच देहानें स्वधर्म जर आचरिला तर सगळें कर्म नाहींसें होतें व जन्म-मरण चुकतें. हें वर्म पुष्कळांना कळत नाहीं. ६६ हे उद्धवा ! स्वधर्मानें भगवद्भक्ति घडते, असें हें गूढ रहस्य आहे, तें मी तुला यथार्थ

॥ ६७ ॥ स्वधर्म करणें आवश्यक । तेथें सांडणें फळाभिलाख । तेंचि मदर्पण चोख । न करितां देख संकल्पू ॥ ६८ ॥ हो कां घरिच्याचि रांजणीं । निघती मुक्तफळांच्या श्रेणी । तरी कां ताम्रपर्णी । समुद्र-मिळणीं शोधावी ॥ ६९ ॥ आपुलेच घरींचीं झाडें । फळती कल्पतरूचेनि पाडें । तरी अमरावतीचे चाडे । वृथा वेडे कां शिणती ॥ ३७० ॥ हो कां सद्‌गुरूचें तीर्थ घेतां । पाविजे परम पवित्रता । तरी धांवावया नाना तीर्थां । विशेषता ते कायी ॥ ७१ ॥ कां ईश्वरत्वें पिता पूजितां । निजमोक्ष लाभे आइता । तरी भजावें देवां देवतां । कोण्या अर्था सज्ञानीं ॥ ७२ ॥ तेवीं स्वकर्मचि करितां । लाभे आपली निष्कर्मता । ते स्वधर्मीं काम कल्पितां । जीव निजस्वार्था नाडले ॥ ७३ ॥ निर्विकल्पें स्वधर्माचरण । त्या नांव माझें शुद्ध भजन । तेणें भजनें होऊनि प्रसन्न । विवेकवैराग्यज्ञान भक्तांसी मी दें ॥ ७४ ॥ तेणेंचि ज्ञानें होय शुद्ध मती । चित्तशुद्धी-माजीं परम भक्ती । भक्तीनें माझी परम प्राप्ती । भक्त पावती उद्धवा ॥ ७५ ॥ यालागीं नैराश्यें जें स्वधर्मकर्म । तेंचि माझें भजन परम । तेणें भजनें भक्तोत्तम । स्वयें पुरुषोत्तम होऊनि ठाकती ॥ ७६ ॥ यापरी स्वधर्मस्थितीं । लाभे आपुली निजमुक्ती । तेचि म्यां तुजप्रती । यथानिगुतीं सांगीतली ॥ ७७ ॥

एतत्तेऽभिहितं साधो भवान्पृच्छति यच्च माम् । यथा स्वधर्मसंयुक्तो भक्तो मां समियात्परम् ॥ ४८ ॥

उद्धवा पुसिलें त्वां मजप्रती । स्वधर्में केवीं घडे मुक्ती । भक्तीनें पाविजे निजमुक्ती । तें म्यां तुजप्रती सांगितलें ॥ ७८ ॥ हाता आलिया स्वधर्म । तत्काळ निरसे स्वकर्म । उडोनि जाय भवभ्रम । प्राप्ती परम स्वधर्में ॥ ७९ ॥ माझिया प्राप्तीलागीं स्वकर्म । नैराश्यें आचरावा स्वधर्म । हें ज्यासी कळे वर्म । तया पुरुषोत्तम सदा वश्य ॥ ३८० ॥ स्वधर्माऐसा स्पर्शमणी । सांपडल्या निर्विकल्पपणीं । तो लावितां

---

सांगेन. ६७ स्वधर्माचरण अवश्य करावें व संकल्प न करितां फलाचा अभिलाष टाकावा. तेंच खरें मदर्पण होतें. ६८ घरच्याच रांजणांत मोत्याचे थर सांपडले, तर मग ताम्रपर्णी नदी जेथें समुद्राला जाऊन मिळते, तेथें जाऊन मोत्यें शोधण्याचें काय कारण ! ६९ आपल्याच बागेंतील झाडें जर कल्पतरूपेक्षांहि अधिक फळें देऊं लागलीं, तर त्या-साठीं अमरावतीला जाण्याचें फुकट श्रम घेणारीं माणसें वेडींच नव्हेत का ! ३७० सद्‌गुरूचें तीर्थ घेतलें असतां जर परम पवित्रता येते, तर अनेक तीर्थयात्रांना धांवण्यांत काय अर्थ ! ७१ किंवा ईश्वरभावानें पित्याचें पूजन केलें असतां सहज जर मोक्षप्राप्ति होते, तर मग सज्ञान माणसानें देव-देवतांचें भजन कशाला करावें ! ७२ त्याप्रमाणें निष्कर्मता स्वधर्मानें मिळते; पण त्या स्वधर्मांत फलाची आसक्ति ठेवून स्वार्थाला जीव व्यर्थ मुकतात. ७३ निर्विकल्प मनानें स्वधर्माचरण करणें, यालाच माझें शुद्ध भजन असें म्हणतात. त्या भजनानें प्रसन्न होऊन मी भक्तांना विवेक, वैराग्य व ज्ञान देतों. ७४ त्या ज्ञानानें अंतःकरण शुद्ध होतें. चित्तशुद्धि झाली असतां माझी परम भक्ति उत्पन्न होते व माझ्या परम भक्तीनें भक्ताला माझी प्राप्ति होते. ७५ यास्तव हे उद्धवा ! फलाशा सोडून केलेलें जें स्वधर्माचरण, तेंच माझें श्रेष्ठ भजन आहे. त्या भजनानेंच माझे उत्तम भक्त स्वतः पुरुषोत्तम होतात ७६ अशा स्वधर्मानें अनायासानें मुक्ति लाभते. हीच गोष्ट मीं तुला सविस्तर सांगितली. ३७७.

—आतां प्रकरणार्थाचा उपसंहार करितात—

साधो—हे उद्धवा ! भवान् यत् च मां पृच्छति एतत् ते अभिहितं—तूं मला जें विचारिलें होतेंस, तें सर्व मीं तुला सांगितलें. यथा स्वधर्मसंयुक्तः भक्तः मां परं समियात्—ज्याप्रकारें स्वधर्मानें युक्त असलेला पुरुष भक्त होऊन मज परमा-त्म्याला प्राप्त होईल तें सर्व मीं तुला सांगितलें. ४८.

उद्धवा ! तूं मला विचारिलेंस कीं, स्वधर्मानें मुक्ति कशी मिळेल ! भक्तीनें मुक्ति मिळते, त्याचें उत्तर मीं तुला सविस्तर सांगितलें. ७८ स्वधर्म हातीं आला कीं स्वकर्म तत्काल निवृत्त होतें, संसाराचा भ्रम नाहींसा होतो व स्वधर्मानें परमपदाची प्राप्ति होते. ७९ माझ्या प्राप्तीसाठीं फलासक्ति सोडून स्वधर्माचरण करावें, हें गूढ रहस्य ज्याला कळलें त्याला पुरुषोत्तम सदा वश होतो. ३८० स्वधर्मासारखा परीस निर्विकल्पानें प्राप्त झाला असतां तो दृश्य पदार्थांस

दृश्यस्थानीं । चिन्मात्रसुवर्णीं तें उठी ॥८१॥ स्वधर्माऐसा दिनमणी । नैराश्यें उगवलिया स्वभुवनीं । तो आज्ञान-निशा निरसुनी । स्वप्रकाशपणीं सदा वर्ते ॥ ८२ ॥ स्वधर्माऐसें निजअमृत । जे निर्विकल्पें सेवूं जाणत । त्यासी जन्ममरणांचा आवर्त । मी श्रीअनंत लागों नेदी ॥ ८३ ॥ जे कां स्वधर्मीं विमुख । त्यांसी माझी प्राप्ती नाहीं देख । जन्मकोटी परम दुःख । सकामें मूर्ख भोगिती ॥ ८४ ॥ त्या स्वधर्माची अतर्क्य गोष्टी । न कळे नैष्कर्म्यें निजदृष्टीं । याचिलागीं जन्मकोटी । अतिसंकटीं जीव भोगी ॥ ८५ ॥ स्वधर्में करितां स्वकर्म । जैं नैष्कर्म्यतेचें कळे वर्म । तैं विभांडूनि मरणजन्म । परब्रह्म पावती ॥ ८६ ॥ एवं स्वधर्म या-परी । तारक होय संसारीं । स्वधर्माचे नावेवरी । तरले भवसागरीं निजभक्त ॥ ८७ ॥ संसार तरले हा बोलु कुडा । स्वधर्म करितां माझिया चाडा । होय भवसागरीं कोरडा । मी सांपडें पुढां निजात्मा ॥ ८८ ॥ ऐशी स्वधर्माची थोरी । निष्कामतेच्या निजकुसरी । देवो सांगे आवडीभरीं । नानापरी प्रबोधें ॥ ८९ ॥ भक्तिप्राधान्य भागवत । मुख्य भक्ती ते स्वधर्मयुक्त । येणें स्वधर्मभजनें समस्त । परम भागवत उद्धरले ॥ ३९० ॥ त्या स्वधर्मकर्मांचा एकांत । निजभजनभक्तीचा भावार्थ । उद्धवासी श्रीकृष्णनाथ । स्वयें सांगत एकादशीं ॥ ९१ ॥ त्या एकादशाच्या गोष्टी । स्वधर्मकर्मांची कसवटी । एका जनार्दनकृपादृष्टीं । टीका मराठी हे केली ॥ ९२ ॥ हे करणी केली जनार्दनें । मज अभंगीं घातलें तेणें । शेखीं मी तूंपणाचे ठाणें । येणें निरूपणें उठविलें ॥ ९३ ॥ उडविलें विषयीं विषयपण । उडविलें भेदाचें भान । उडविलें जीवशिवपण । जनीं जनार्दन तुष्टोनी ॥ ९४ ॥ जनार्दनें जनकें तेणें । आम्हां केलें परब्रह्म खेळणें । यालागीं सकळ क्रिया तेणें होणें । स्वधर्मपणें सहजेंचि ॥ ९५ ॥ सहजीं लागल्या स्वधर्म । कर्मचि होय निष्कर्म । संसार होय परब्रह्म । हे कृपा परम जनार्दनीं ॥ ९६ ॥ यालागीं सांड्-

---

लावितांच ते पदार्थ ब्रह्मरूप सुवर्ण बनतात. ८१ स्वधर्मासारखा सूर्य निष्कामतेनें अंतःकरणांत उगवला असतां अज्ञानरूपी रात्र घालवून आपल्या तेजानें प्रकाशत रहातो. ८२ स्वधर्मासारखें अमृत जो निर्विकल्प मनानें सेवन करण्याचें जाणतो, त्यास श्रीहरि जन्म-मरणाच्या भोंवऱ्याचा स्पर्शहि होऊं देत नाहीं. ८३ पण जे स्वधर्मापासून विमुख होतात, त्यांना माझी प्राप्ति होत नाही. ते मूर्ख फलासक्तीनें कोट्यवधि जन्म परम दुःख भोगितात. ८४ त्या स्वधर्माचा प्रभाव अतर्क्य आहे. त्याची निष्कामता डोळ्यांना दिसत नाहीं. त्यामुळें अज्ञ जीव कोट्यवधि जन्म दुःख भोगीत रहातात. ८५ स्वधर्मानेंच स्वकर्माचें आचरण केलें व निष्कामपणाचें वर्म कळलें कीं, ते जन्म-मरणाचा नाश करून परब्रह्माला प्राप्त होतात. ८६ याप्रमाणें स्वधर्म संसारांतून तारणारा आहे. माझे भक्त या स्वधर्मरूपी नौकेंत बसून हा भवसागर तरून गेले. ८७ 'संसाराला तरून गेले' हें बोलणेंहि मिथ्या आहे. कारण माझ्या आवडीनें स्वधर्म आचरिला असतां भवसागर मुळीं कोरडाच होतो व मी परमात्मा त्यांना पुढेंच सांपडतों. ८८ असा स्वधर्माचा महिमा आहे. त्याची श्रीकृष्णाला अत्यंत आवड असल्यामुळें त्यानें तो स्वधर्म नानाप्रकारें समजावून सांगितला. ८९ ज्यांत भक्तीचा श्रेष्ठपणा वर्णन केला आहे असें हें भागवत आहे. त्यांत स्वधर्मयुक्त भक्ति मुख्य सांगितली आहे. त्या स्वधर्मयुक्त भक्तीनेंच सगळे श्रेष्ठ भगवद्भक्त उद्धरून गेले. ३९० या स्वधर्मयुक्त कर्माचें मर्म व आत्मभजनांतील रहस्य श्रीकृष्णानें उद्धवाला अकराव्या स्कंधांत सांगितलें. ९१ त्या अकराव्या स्कंधांतील कथा म्हणजे स्वधर्मकर्माची कसोटीच आहे. त्यावरच एकनाथानें जनार्दनाच्या कृपादृष्टीनें मराठींत ही टीका केली. ९२ वास्तविक जनार्दनस्वामींनींच ही कृति केली आहे. त्यांनीं मला स्वस्वरूपांत घातलें व शेवटीं या निरूपणानें 'मी-तूं'पणाचें ठाणें उठविलें. ९३ जनांतील जनार्दन संतुष्ट होऊन त्यानें विषयांचें विषयपण भेदाचें भान, जीव-शिवपण नाहींसें केलें. ९४ आमच्या जनार्दन पित्यानें 'परब्रह्म' आमच्या हातांतील खेळणें करून टाकिलें, त्यामुळें आमच्या सर्व क्रिया साहजिकच स्वधर्मानें घडूं लागल्या. ९५ स्वधर्म स्वाभाविक झाला कीं, त्यामुळें कर्म सहजच निष्कर्म होतें व संसार परब्रह्मच होऊन रहातो. ही जनार्दनाची मोठी कृपा आहे. ९६

नियां एकपण । एका जनार्दना शरण । स्वधर्मकर्माचें निरूपण । झालें संपूर्ण तया कृपा ॥ ९७ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां वानप्रस्थसंन्यासधर्मनिरूपणं नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे अष्टादशोध्यायः ॥ १८ ॥

---

# अध्याय एकोणिसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु त्र्यंबका । ब्रह्मगिरिनिवासनायका । त्रिगुणात्रिपुरभेदका । कामांतका गिरीशा ॥ १ ॥ तुझा अनाहताचा डमरू । सर्व शब्दें करी गजरू । वेदानुवादें निरंतरू । त्रिकांडीं थोरू गर्जत ॥ २ ॥ तुझे हातींचें खट्वांग । करी जीवाचा जीवभंग । अनंगेंसीं जाळूनि अंग । अंगसंग तैं देशी ॥ ३ ॥ त्रिनयन त्र्यंबकलिंगा । तुजपासोनि प्रवाहे चिद्गंगा । ते पवित्रपणें उद्धरी जगा । प्रकाशगर्भा शंकरा ॥ ४ ॥ प्रत्यक्ष दिसती दोन्ही लोचन । तिसरा गुप्त ज्ञाननयन । यालागीं तूं त्रिलोचन । नयनेंवीण दीसशी ॥ ५ ॥ निजांगें वाहसी बोध चंद्र । यालागीं तूं चंद्रशेखर । चंद्रसूर्यादि चराचर । तुझेनि साचार प्रकाशती ॥ ६ ॥ भव या नांवाची ख्याती । भवप्रकाशक तुझी चिच्छक्ती । तूंचि विष्णु प्रजापती । रुद्र तूं अंतीं संहर्ता ॥ ७ ॥ मोडूनियां नामरूपमुद्रा । जीव आणिशी एकाकारा ।

---

यास्तव एकनाथानें आपला एकपणा टाकून तो जनार्दनाला शरण गेला व त्यांच्या कृपेनें हें स्वधर्मकर्माचें निरूपण शेवटास नेलें. ३९७.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव संवादांतील वानप्रस्थ-संन्यासधर्मनिरूपण नांवाचा अठरावा अध्याय समाप्त झाला.

हे सद्गुरो त्रिनेत्रा, तुला नमस्कार असो. तूं ब्रह्मरूपी पर्वतावर रहाणारा, सत्त्व-रज-तम या तीन गुणांचें जें त्रिपुर त्याचा भेद करणारा, मदनाचा अंत करणारा, पर्वतांचा स्वामी शंकर आहेस. १ तुझा अनाहत डमरु सतत वेदानुवादानें कर्म, भक्ति व ज्ञान याची गर्जना करीत असतो. २ तुझ्या हातांतील खट्वांग (एक आयुध) जीवांच्या जीवपणाचाच नाश करितें. तूं जीवांचा विषयवासनेसह देहभाव नाहींसा करून मग त्याला स्वस्वरूपांत मिळवून घेतोस. ३ हे त्रिनयना स्वयंप्रकाश शंकरा! तुझ्यापासूनच चिद्गंगेचा प्रवाह वहातो व ती आपल्या पवित्रपणानें जगाचा उद्धार करिते. ४ तुझे दोन नेत्र प्रत्यक्ष दिसतात व तिसरा ज्ञानरूपी नेत्र गुप्त असतो. म्हणून तुला त्रिनयन म्हणतात. इंद्रियावांचूनच तुझें ज्ञान होतें. ५ तूं आपल्या मस्तकावर बोधरूपी चंद्र धारण करितोस. म्हणून तुला चंद्रशेखर म्हणतात. चंद्र सूर्यादि सर्व चराचर जगत् तुझ्या प्रकाशानें प्रकाशित होतें. ६ 'भव' या नांवाची मोठी प्रसिद्धी आहे. तुझी चिच्छक्तीच त्या भवाला प्रकाशित करिते. तूंच विष्णु, ब्रह्मदेव व संहारकर्ता रुद्र आहेस. ७ तूं जीवाचा नाम-रूप इत्यादि सर्व आकार मोडून त्याला आत्मरूप करितोस. तूं प्रलयकालीं प्रलय